
# प्रसाद मुखर्जी

१५४३
म. ग्रं. सं. ठाणें
चरित्र
९३०



REFBK-0007949

ठी ग्रंथ संग्रहालय

अमरेन्द्र

मूल्य

# डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी

REFBK-0007949

लेखक : अमरेन्द्र

"राष्ट्रशक्ति" प्रकाशन, रामदासपेठ, नागपूर.

मूल्य ८ आणे

(ही प्रथमावृत्ति सोडून या ग्रंथासंबंधीचे सर्व अधिकार
सौ. मङ्गला गाडगीळ यांच्या स्वाधीन आहेत.)

ऑगस्ट १९५३ : प्रथमावृत्ति

★

:: प्रकाशक ::

प्रा. श्री. भा. वर्णेकर, एम्. ए.

ताहिक 'राष्ट्रशक्ति', रामदासपेठ, नागपूर (म. प्र.)

★

:: मुद्रक ::

नागपूर टाइम्स प्रेस, रामदास पेठ, नागपूर.

५०६३०



१९१०२


| | | | |
|---|---|---|---|
| ‘ चलाव तेरी गोली ! ’ | ... | ... | |
| थोर पित्याचें प्रतिबिंब | ... | .... | ४ |
| कलकत्ता विद्यापीठांत | ... | ... | १० |
| हिन्दु महासभेंत ... | .... | ... | १९ |
| जनसेवेसाठीं मंत्रीपद | .... | .... | २५ |
| एक महान् कार्य ... | .... | ... | ३३ |
| अप्रिय पण पथ्यकर | .... | ... | ३६ |
| केन्द्रीय मंत्रीपदावरून | ... | .... | ४१ |
| इतिहासाची पुनरावृत्ति | ... | .... | ४६ |
| ‘ निर्वासितांचा मित्र ’ | ... | ... | ४९ |
| समसमां संयोग ... | ... | ... | ५२ |
| लोकशाहीचा विश्वासू प्रतिनिधि | | ... | ५५ |
| संग्रामाच्या आघाडीवरून | .... | .... | ५८ |
| आध्यात्मिक अधिष्ठान | ... | ... | ६० |
| अलौकिक व्यक्तिमत्व | .... | .... | ६२ |

## क्षमस्व !

क. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्यासंबंधीं लिहिलेलीं हीं कांहीं पानें आहेत. त्यांचें हें 'चरित्र' असें यांचें वर्णन मी करूं शकत नाहीं; कारण त्यांतील उणीवांची व दोषांची मला पूर्ण कल्पना आहे. हा केवळ त्या महापुरुषाच्या अपार कार्यसागराचा अल्पसा परिचय मात्र.

असें कां ?—कामाची गर्दी, वेळ थोडा, अपुरीं साधनें अशा कित्येक अडचणी याबाबतींत असल्या तरी त्या सांगून याबाबतचें समर्थन मी करूं इच्छित नाहीं.

वाचकांना नम्र विनंती इतकीच—आपण हें सर्व लक्षांत घेऊनच पुस्तकाचें पान उघडावें.

पण, त्याबरोबरच माझी एक लहानशी इच्छाहि ध्यानांत ठेवावी कीं—या थोर पुरुषाच्या जीवनाचा जो परिचय इतक्या जवळून या प्रसंगानें करून घेण्याचें भाग्य लाभलें त्यामुळें त्याचें सार्थ सविस्तर चरित्र आपण लिहावें अशी तीव्र इच्छा मनांत उद्भवली व कायम झाली. ती आपल्या सद्भावनांनीं लवकरच पुरी व्हावी.

सुमारें दहा वर्षांमागें डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या लिखाणाचा व भाषणांचा संग्रह संकलित व संपादित करून प्रसिद्धिण्याचा योग माझ्याकडे चालून आला होता. पण दुर्दैवानें त्यावेळीं तें माझ्या हातून घडलें नाहीं. 'केसरी'च्या संपादक मंडळांत असतांनाहि त्यांचा निकटचा संबंध कारणाकारणानें येऊन गेला, परंतु त्याचा लाभ त्यावेळीं मी घेऊं शकलों नाहीं. याचें अर्थात्‌च वाईट वाटतें.

आभार—प्रथमत: प्रकाशनाची जोखीम पत्करणारे सा. "राष्ट्रशक्ती"चे संचालक, संपादक, व्यवस्थापक आणि त्यासहच प्रस्तावनेच्या विनंतीला मान देणारे श्रेष्ठ पत्रकार व साहित्यिक श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांचे. इतरहि सर्व साहाय्यकांचें सादर आभार.

—लेखक

# प्रस्तावना

येथील 'राष्ट्रशक्ति' साप्ताहिकाचे कार्यकारी संपादक श्री. अमरेन्द्र गाडगीळ यांनीं कै. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचें हें छोटेंच पण चटकदार चरित्र घाईघाईनें लिहून मराठी वाचकवर्गाला सादर केलें आहे. कै. डॉ. मुखर्जी यांचा मृत्यु काश्मीरांत श्रीनगर येथें बंदिवासामध्यें ज्या चमत्कारिक गूढ परिस्थितींत अचानक झाला, त्यामुळें उत्पन्न झालेल्या दुःख शोकाच्या तीव्र ऊर्मिबरोबरच कॉंग्रेस पक्षाच्या प्रबळ सार्वभौम सत्तेला हादरा देणाऱ्या त्यांच्या युयुत्सु जीवनाचें रहस्य जाणून घेण्याचीहि उत्कंठा जनतेच्या हृदयांत साहजिकच उद्भूत झाली. ती हें पुस्तक चांगल्या रीतीनें तृप्त करील, अशी मला आशा वाटते.

श्री. गाडगीळ हे स्वतःच या आपल्या पुस्तकाचें वर्णन 'चरित्र' या व्यापक शब्दानें करावयाला तयार नाहींत. त्याचें कारणहि अगदीं स्पष्ट आहे. चरित्रलेखनाच्या ज्या कांहीं जुन्या नव्या पद्धती आज प्रचलित आहेत, त्यांपैकीं एकाहि पद्धतीच्या सांचांत हें पुस्तक बसूं शकणार नाहीं. चरित्रलेखनाची एक ऐतिहासिक पद्धत अशी कीं, चरित्रनायकाची रोजनिशी, पत्रव्यवहार, भाषणें, संभाषणें, लिखाण वगैरे नाना प्रकारचें अस्सल अधिकृत साहित्य उपयोगांत आणून आणि जरूर तेथें उद्धृतहि करून त्याच्या जीवनाचा संपूर्ण इतिहासपट, सर्व बारीक सारीक तपशीलांसह, वाचकांना विस्तारानें सादर करावयाचा. मोर्ले यांनीं लिहिलेलें ग्लॅडस्टनसाहेबांचें चरित्र किंवा कै. तात्यासाहेब केळकर यांनीं लिहिलेलें कै. लोकमान्य टिळक यांचें चरित्र हे ग्रंथ या पद्धतीचे नमुने म्हणून दाखवितां येतील. दुसरी पद्धत अशी कीं, चरित्रनायकाच्या जीवन-

कार्याची तात्त्विक भूमिका विशद करण्याच्या आणि त्याच्या जीवनाचें रहस्य वाचकवर्गाला समजावून सांगण्याच्या उद्देशानें त्याच्या चरित्रांतील मुख्य घटनांचा अन्वयार्थ उलगडून दाखवावयाचा. मोर्ले यांनीं बर्क, व्हॉल्टेअर, रूसो प्रभृतींवर लिहिलेले प्रबंध किंवा मराठींतील कै. बाळकृष्ण अनंत भिडे, प्रो. न. र. फाटक, प्रो. रा. द. रानडे, प्रो. डॉ. शं गो. तुळपुळे प्रभृतींचे ज्ञानेश्वर–तुकाराम–रामदासादि संतांवरील प्रबंध हे या पद्धतींत मोडतात. चरित्रलेखनाची तिसरी पद्धत अशी आहे कीं, चरित्रनायकाच्या जीवनांतील हर एक घटनेचें विश्लेषण मानसशास्त्राच्या अनुषंगानें करावयाचें आणि त्यांतून चरित्रलेखकाला प्रतीत झालेलें त्याचें व्यक्तित्व वाचकांपुढें उभे करावयाचें. यांपैकीं कोणत्याच पध्दतीला अनुसरून श्री. गाडगीळ यांनीं हें पुस्तक लिहिलेलें नाहीं; तर अलीकडील कांहीं मराठी ललित लेखकांच्या पद्धतीनुसार त्यांनीं डॉ. मुखर्जी यांच्या जीवनांतील प्रमुख प्रसंग धावत्या चित्तवेधक शैलीनें वाचकांना सांगितलेले आहेत. तथापि, डॉ. मुखर्जी यांच्या जीवनकार्याची महाराष्ट्रांतील जनतेला फारशी माहिती नसल्यामुळें, श्री. गाडगीळ यांचें हें पुस्तक त्यांच्या राष्ट्रसेवेची ओळख लोकांना करून द्यावयाला उपयुक्त ठरेल, यांत मात्र शंका नाहीं.

माझ्या मतें डॉ. मुखर्जी यांच्या संघर्षाकुल जीवनानें आणि काश्मीरांतील स्वयंप्रेरित वीरमरणानें आज एकच अत्यंत महत्त्वाचा प्रश्न भारतीय जनतेपुढें उपस्थित करून ठेवला आहे. तो प्रश्न असा कीं, या पुरातन देशांतील राष्ट्रवाद आणि लोकशाही राज्यपद्धति हीं दोन्ही निधर्मी असावींत कीं अध्यात्मिक असावींत ? भारताची अस्मिता, प्रकृति, संस्कृति आणि नियति हीं चारही अध्यात्मिक म्हणजेच व्यापक अर्थानें धर्मप्रवण आहेत, हें सर्वमान्य ऐतिहासिक सत्य आहे; व इंग्रजी सत्ता या देशांत स्थापन होण्यापूर्वीचा हजारों वर्षांचा काळ आणि त्या काळांत बदलत्या परिस्थितिनुसार वेळोवेळीं निर्माण झालेले धर्मपुरुष जरी सोडले, तरी गेल्या दीडशें वर्षांत जे निरनिराळ्या वृत्तींचे आणि श्रेणींचे द्रष्टे आणि नेते या भूमींत उदयाला आले, ते सर्व मूलत: धर्मपुरुष होते, असेंच म्हणावें लागेल. राजा राममोहन राय, दयानंद, रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, रामतीर्थ, दादाभाई नौरोजी, रानडे

टिळक, गोखले, बिपिनचंद्र पाल, अरविंद घोष, लाला लजपतराय, रवींद्रनाथ टागोर, म. गांधी, सुभाषचंद्र बोस प्रभृति गेल्या शीडशें वर्षांतील कोणत्याहि भारतीय नेत्याचें चरित्र तपासून पाहा. तें अध्यात्मिक श्रद्धेनें आणि ऐश्वर्यानें परिपूर्ण होतें, असेंच दिसून येईल. इतकेंच नव्हे, तर चालू काळांतील डॉ. राजेंद्रप्रसाद, श्री. राजगोपालाचार्य, डॉ. राधाकृष्णन्, श्री. काकासाहेब कालेलकर, आचार्य विनोबाजी, श्री. जयप्रकाश नारायण, डॉ. अंबेडकर प्रभृति आधुनिक तत्त्वज्ञ आणि नेते जरी घेतले, तरी त्यांचेंहि जीवन सर्वथैव अध्यात्मिक आणि धर्ममय आहे, असेंच अनुभवाला येतें. याला अपवाद फक्त पं. जवाहरलाल नेहरू यांचा! ते स्वतः मात्र पूर्ण निधर्मी आहेत; व त्यांच्या राजकीय वर्चस्वामुळेंच आज या देशावर अध्यात्मशून्य असा निधर्मी राष्ट्रवाद आणि राज्य हीं दोन्हींहि लादण्याचा प्रयत्न गेली सात वर्षें करण्यांत येत आहे.

वस्तुतः, ‘सेक्युलर’ नसलेलें म्हणजे धर्मप्रवण असें लोकशाही किंवा प्रजासत्ताक सरकार हें असहिष्णु म्हणजे अन्यधर्मीय प्रजाजनांना उपद्रव देणारें असतेंच, असें म्हणणें किंवा मानणें हें इतिहासाला आणि वस्तुस्थितीला सर्वथैव सोडून होईल. भारतांतील सयामचे वकील डॉ. भद्रवादी यांनीं नुकतेंच एका मुलाखतींत असें सांगितलें कीं, “मी स्वतः रोमन कॅथलिक आहें तरीहि ज्या देशांतील शेंकडा ९९ लोक बुद्धधर्मीय आहेत, अशा १,८०,००,००० लोकसंख्येच्या देशाचें प्रतिनिधित्व मी करतों. याचा अर्थ असा कीं, सयामहि, भारताप्रमाणें, धार्मिक बाबतींत उदार आहे. बौद्ध धर्म हा सयामचा राज्यधर्म आहे. पण इतरहि धर्मांना आमच्या देशांत पूर्ण संरक्षण आहे.” [I myself am a Roman Catholic and still I represent a nation of 18 million people of whom 99 percent are Buddhists. This proves that Thailand, like India, is liberal about religion. Buddhism is recognised as the State Religion but all other Faiths are fully protected.] सयामप्रमाणेंच सीलोन आणि ब्रह्मदेश हीं भारताचीं सहोदर असलेलीं बौद्ध राष्ट्रेंहि धर्मप्रवण आहेत म्हणजे त्यांनींहि बौद्ध धर्म

हा आपला राज्यधर्म केलेला आहे. पण याहि देशांवर कोणीहि असहिष्णुतेचा आरोप केल्याचें अद्याप तरी कानांवर आलेलें नाहीं.

पण हे जवळचे आणि अलिकडचे दाखले कदाचित् कोणाला प्रमाण वाटणार नाहींत. म्हणून आपण अत्यंत दूरचा प्राचीन आणि प्रतिष्ठित असा एकच दाखला लक्षांत घेऊं या. इंग्लंड हें जगांतील जुन्यांतलें जुनें आणि लोकशाही संस्थांच्या पद्धतशीर विकासाबद्दल अखिल मानवजातीकडून गौरविलें गेलेलें थोर राष्ट्र समजलें जातें. त्याच्या राजाच्या बिरुदावलींत गेलीं ८०० वर्षें 'धर्मरक्षक' (Defender of Faith) ही पदवी आहे; त्या राजाचा राज्याभिषेक ख्रिस्ती धर्मविधिनुसार होतो; व त्याच्या हातांत त्या वेळीं जो क्रूसचिन्हांकित सुवर्णगोल (Golden Orb) दिला जातो, तोहि "सर्व जग हें आपला तारक जो ख्रिस्त त्याची सत्ता आणि साम्राज्य यांच्या छत्राखालीं आहे," (The whole world is subject to the power and empire of Christ, our Redeemer), हें तत्त्व त्याच्या मनावर बिंबविण्यासाठीं ! तरीहि इंग्रजांच्या जगभर पसरलेल्या साम्राज्यांत धार्मिक जुलूम करण्यांत आल्याचें उदाहरण गेल्या दोन शतकांत तरी सहसा आढळणार नाहीं. उलट, पहिल्या महायुद्धाच्या शेवटीं लॉयड जॉर्ज यांनीं असे उद्गार मोठ्या दिमाखानें काढले होते कीं, "ब्रिटन ही आज जगांतील सर्वांत मोठी मुस्लिम सत्ता आहे !" (Britain is, at present, the greatest Moslem power in the world.) या त्यांच्या उद्गारांतील दर्प आणि उपरोध हीं दोन्ही जरी सोडून दिलीं, तरी ब्रिटिश साम्राज्यांतील ख्रिस्तीतर प्रजाजनांना पूर्ण धर्मस्वातंत्र्य देऊन आपल्या छत्राखालीं गुण्यागोविंदानें नांदविण्याचा जो 'धर्मरक्षक' ब्रिटिश राज्यसत्तेचा बाणा, त्याचा हा उद्गार उत्कृष्ट निदर्शक आहे, यांत मात्र शंका नाहीं. सारांश, एकाद्या राष्ट्रानें आणि त्याच्या सरकारानें त्या राष्ट्रांतील बहुसंख्य जनतेचा पुरातन मान्य धर्म हा त्या देशाचा राज्यधर्म केल्यामुळें त्याच्या राष्ट्रीयत्वाला, लोकशाहीला, प्रगमनशीलतेला आणि परधर्मसहिष्णुतेला बाध येतो किंवा बट्टा लागतो, असें जें खूळ भारतांत अलिकडे हेतुपुरस्सर पिकविण्यांत आलेलें आहे, त्याला इतिहासाचा आणि वस्तुस्थितीचा काडीचाहि आधार नाहीं. उलट, चीनमधील निधर्मी कम्युनिस्ट सरकारानें

मात्र, आपल्या राज्यांतील ख्रिस्ती मिशनरी आणि त्यांच्या धर्मसंस्था यांचा नायनाट करून, राष्ट्ररक्षणाच्या बाबतींत जागरूक असलेलें निधर्मीहि सरकार आक्रमक धर्मप्रचारकांना आळा घालण्याच्या बाबतींत किती कडवें असतें, हें सिद्ध करून दाखविलें आहे. पण, भारत सरकाराच्या निधर्मी धोरणाला ही राष्ट्ररक्षक बाजू सुद्धां नाहीं, हें आसाममधील नागभूमींत खुद्द पं. नेहरू यांना नुकत्याच आलेल्या कटु अनुभवावरून सिद्ध झालें आहे.

तेव्हां, या देशांत निधर्मी राष्ट्रवाद आणि निधर्मी सरकार यांचा जो प्रचार सत्तेच्या जोरावर सध्या केला जात आहे, तो या देशाची अस्मिता, प्रकृति, संस्कृति आणि नियति यांच्याशीं कितपत सुसंगत व म्हणून त्यांना कितपत पोषक आहे, हा खरोखरीच एक अगदीं मूलभूत प्रश्न आहे. डॉ. मुखर्जी यांनीं आपल्या काश्मीरांतील, वीरमरणानें तो प्रश्न एका परीनें आघाडीला आणून ठेवला, यांत शंका नाहीं. डॉ. मुखर्जी यांच्या जीवन-कार्याचें विवरण करतांना, या प्रश्नानें त्यांच्या मनांत आणि राजकीय आयुष्यांतहि जें द्वंद्व कायमचें निर्माण केलेलें होतें, तें त्यांच्या भावी चरित्रकारांना त्यांच्या एकंदर कर्तृत्वाचा प्रेरक मध्यबिंदु म्हणून धरून चालावें लागेल, अशी माझी तरी खात्री आहे.

येथें राष्ट्रवादाचाहि थोडासा विचार केला, तर तो अप्रस्तुत होईल, असें वाटत नाहीं. आधुनिक काळांत कम्युनिस्ट तत्त्वज्ञ आणि नेते यांच्याइतकी राष्ट्रवादाची कठोर चिकित्सा दुसऱ्या कोणीहि केलेली नसेल. पण, आश्चर्याची गोष्ट अशी कीं, जोसेफ मॅझिनीसारखा राष्ट्रवादाचा दार्शनिक उद्‌गाता याच्यापासून तों स्टालिनसारखा राष्ट्रवाद आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या सांचांत यशस्वी रीतीनें बसवून दाखविणारा व्यवहारचतुर राज्यधुरीण याच्यापर्यंत गेल्या दोनशें वर्षांत निरनिराळ्या पाश्चात्य द्रष्टयांनीं, राज्यशास्त्रज्ञांनीं किंवा मुत्सद्यांनीं राष्ट्रवादाच्या ज्या व्याख्या केलेल्या आहेत, त्यांत मूलतः कोणताच फरक आढळत नाहीं. मॅझिनी हा अत्यंत धर्मशील असा काव्यात्म वृत्तीचा मृदुप्रकृति राष्ट्रभक्त. पण, त्यानें जितक्या उत्कटतेनें, राष्ट्रवादाची व्याख्या करतांना,

अध्यात्मिक बाजूवर भर दिलेला आहे, तितकाच भर देवधर्मावर यत्किंचितहि श्रद्धा नसलेल्या अनात्मवादी स्टालिननेंहि दिलेला दृष्टीस पडतो. केवळ समान आर्थिक हितसंबंध किंवा समान राजकीय परिस्थिति यांच्या संहतीच्या जोरावर राष्ट्र निर्माण होऊं शकत नाहीं, या मुद्याचें विवरण करतांना स्टालिननें असे स्पष्ट उद्गार काढले आहेत कीं, "राष्ट्रा-राष्ट्रांत केवळ त्यांच्या जीवनविषयक परिस्थितीमुळेंच फरक पडतो असें नाहीं; तर त्यांचें जें अध्यात्मिक वैशिष्टच त्यांच्या राष्ट्रीय सांस्कृतिक विशेषांतून आविष्कृत होतें, त्यामुळेंहि त्यांच्यांत फरक पडतो. म्हणून राष्ट्रवादाचा विचार करतांना त्याच्या इतर घटकांबरोबरच स्वतःला 'राष्ट्र' म्हणविणाऱ्या लोकांचें अध्यात्मिक वैशिष्टचहि लक्षांत घेतलें पाहिजे." [Apart from the foregoing, one must take into considera- tion the specific spiritual complexion of the people con- stituting a nation. Nations differ not only in their conditions of life, but also in spiritual complextion which manifests itself in peculiarities of national culture.] राष्ट्रवादाचें विवेचन करतांना स्टालिन केवळ या अध्यात्मिक वैशिष्टयाचा निर्देश करूनच थांबलेला नाहीं; तर त्यानें 'राष्ट्रीय स्वभावा'चा म्हणजे राष्ट्रीय प्रकृतीचाहि ( National Character ) उल्लेख केला असून, आपल्या मताच्या समर्थनार्थ समाजवादी लोकशाहीचा पुरस्कर्ता जर्मन राज्यशास्त्रज्ञ बॉयर याचें एक महत्त्वाचें अवतरणहि उद्धृत केलेलें आहे. बॉयरनें असें म्हटलें आहे कीं, "कोणत्याहि लोकांची प्रकृति ही इतर कोणत्याहि गोष्टीपेक्षां त्यांची नियतीच निश्चित करीत असते. राष्ट्र म्हणजे अर्थातच समान नियतीनें निगडित झालेला लोक-समाज. ही नियतीहि लोक ज्या परिस्थितींत आपल्या निर्वाहाचीं साधनें उत्पन्न करतात आणि आपल्या श्रमांची फळें वांटून घेतात त्या परिस्थितीनें निश्चित होत असते." ( The character of people is determined by nothing so much as by their fate........A nation is nothing but a community of fate which in its turn is determined by the conditions under

which people produce their means of subsistence and distribute the products of their labour.) अशा रीतीनें राष्ट्रीयत्वाचे निरनिराळे घटक विशद केल्यानंतर स्टालिननें 'राष्ट्रा'ची अशी व्याख्या केली आहे कीं—

> "राष्ट्र म्हणजे इतिहासांतून विकसित होत गेलेला, भाषा, प्रदेश आणि अर्थजीवन यांची स्थिर संहति असलेला व सांस्कृतिक समानतेंत आपली मानसिक धरणा व्यक्त करणारा लोकसमाज."
> (A Nation is a historically evolved, stable community of language, territory, economic life and psychological make-up manifested in a community of culture)

मी केलेलें स्टालिन आणि बॉयर यांच्या सूत्रांचें हें भाषान्तर कदाचित् सैल आणि क्लिष्टहि असण्याचा संभव आहे. पण इंग्रजी जाणणाऱ्या वाचकांना तरी तें समजावयाला खचित अडचण पडणार नाहीं. स्टालिन आणि बॉयर या दोघांच्याहि विवेचनावरून ही गोष्ट स्पष्ट आहे कीं, त्यांच्यासारख्या आधुनिक समाजवादी लोकशाहीच्या प्रतिपादकांनाहि अध्यात्म आणि संस्कृति हे कोणत्याहि देशाच्या किंवा लोकसमाजाच्या राष्ट्रीयत्वाचे दोन प्रमुख घटक वाटतात. उलट, पं. नेहरू हे मात्र केवळ राजकीय आणि आर्थिक हितसंबंधांची समानता आणि संहति यांच्या जोरावर आज निधर्मी राष्ट्रवाद आणि लोकशाही राज्य हीं या देशांत स्थापन करूं पाहत असून, देशातील ज्या विचारवंतांना आणि कार्यकर्त्यांना हें त्यांचें निधर्मी राष्ट्रवादाचें तत्त्व मान्य नाहीं. त्यांना 'जातीय' म्हणून हेटाळण्याची दुष्ट प्रथाहि त्यांनीं पाडली आहे. पण, भारतीय राष्ट्रवादाची राजा राममोहन राय यांच्यापासून तों आचार्य विनोबा भावे यांच्यापर्यंत निरनिराळ्या द्रष्ट्यांनीं, उद्गात्यांनीं आणि नेत्यांनीं जी परंपरा गेलीं दीडशें वर्षें प्रवर्तित आणि विकसित करीत आणलेली आहे, ती सर्वथैव अध्यात्मिक आणि व्यापक अर्थानें धर्ममय आहे. ती उदात्त परंपरा पुढें चालवून या पुरातन भरत-भूमींत जे भिन्नधर्मीय आणि भिन्नसांस्कृतिक समाज स्थायिक झालेले

आहेत, त्यांना हळुहळु भारतीय राष्ट्रवादाच्या कक्षेंत आणावयाचें कीं ती परंपरा नष्ट करून पं. नेहरू यांनीं केवळ सत्तेच्या जोरावर या देशावर लादलेला स्वत्वशून्य निधर्मी राष्ट्रवाद स्वीकारावयाचा, हा आज भारतांतील सर्व विचारी लोकांपुढें असलेला निर्वाणीचा प्रश्न आहे. डॉ. मुखर्जी यांच्या वीरमरणानें तो प्रश्न आतां निकराला आणलेला असून, त्या प्रश्नाच्या निर्णयावरच या देशांतील जनतेची राष्ट्रीय नियति अवलंबून आहे, याबद्दल मला शंका वाटत नाहीं.

आचार्य विनोबा भावे यांनी 'सेक्युलर' या पं. नेहरू यांच्या शब्दाला 'वेदान्ती' असा पर्याय सुचविला आहे. हा पर्याय त्यांनीं विनोदानें सुचविलेला नसून, अगदीं गंभीरपणानें सुचविलेला आहे, असेंच मी समजतों; व तो एका परीनें अत्यंत मार्मिक आहे, असेंहि मला वाटतें. वैदिक धर्मांत, ख्रिस्ती किंवा इस्लामी धर्मांप्रमाणें, उपास्य आणि उपासनापद्धति या दोहोंच्याहि बाबतींत कोणत्याच प्रकारचा आग्रह नाहीं, हें प्रसिद्धच आहे. आपल्या अनुयायांना वैदिक धर्मानें उपास्य आणि उपासनापद्धति यांच्या बाबतींत हें जें सर्वथैव अनिबंध असें स्वातंत्र्य दिलेलें आहे, त्याचें वर्णन पुष्पदंतानें महिम्नस्तोत्रांतील—

रुचीनां वैचित्र्यादृजुकुटिलनानापथजुषां ।
नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव ॥

या दोन चरणांत अतिशय सुंदर रीतीनें केलें आहे. पण, वैदिक धर्म आपल्या अनुयायांना केवळ एवढेंच स्वातंत्र्य देऊन थांबलेला नाहीं; तर भगवद्गीतेच्या नवव्या अध्यायांतील—

येऽप्यन्यदेवताभक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः ।
तेऽपि मामेव कौंतेय यजन्त्यविधिपूर्वकम् ॥

या श्लोकांत स्वतः भगवंतांनीं आपली "अविधिपूर्वक" उपासना करणाऱ्यांनाहि आपली प्राप्ति होते, अशी ग्वाही दिलेली आहे. हा जो

उपास्य आणि उपासनापद्धति यांच्या संबंधींचा निराग्रह वैदिक धर्मांत दृष्टीस पडतो, त्याची परमोच्च. परिणति वेदान्तदर्शनांत झालेली असून, सर्व भूतांविषयीं आणि सर्व धर्मांविषयीं समभाव आणि समीभूता दृष्टि हें वेदान्ताचें श्रेष्ठ रहस्य आहे. भारतीय तत्त्वज्ञानाचें हें अद्वितीय वैशिष्टय ध्यानांत घेतलें असतां विनोबांनीं 'सेक्युलर' या या शब्दाला 'वेदान्ती' हा पर्याय सुचवून भारताची जगांतील सर्व धर्म आणि सर्व लोकसमाज यांच्याविषयींची परंपरागत समीभूता दृष्टि सूचित करण्यांत जो मार्मिकता प्रकट केली आहे, ती निःसंशय अभिनंदनीय ठरेल. पण, 'वेदान्ती' या शब्दामागें भारतीय धर्म आणि संस्कृति यांच्या वैशिष्टयाची जी अध्यात्मिक परंपरा उभी आहे आणि जी अभिप्रेत असल्यामुळेंच खरोखरी विनोबांनीं हा पर्याय सुचविलेला आहे, ती पं. नेहरू यांना कितपत मान्य होऊं शकेल ? या प्रश्नाचें उत्तर खुद्द विनोबा तरी काय देतील ? वस्तुतः, भारतीय धर्म, संस्कृति आणि तत्त्वज्ञान हीं तिन्ही इतकीं सहिष्णु आणि समावेशक आहेत कीं, त्यांनीं व्यापिलेल्या या देशांत 'सेक्युलॅरिझम्" चें थोताण्ड माजविण्याची कांहीहि गरज नव्हती. ज्या देशाच्या अध्यात्मिक संस्कृतीनें कपिल आणि बुद्ध यांच्यासारख्या स्वतंत्र-प्रज्ञ दार्शनिकांची गणना आपल्या अवतारप्रणालींत केली, कबीर आणि शेख महम्मद यांच्यासारख्या विधर्मीयांवर धर्मांतराचा प्रसंग येऊं न देतां त्यांना आपल्या संतमालिकेंत स्थान दिलें व बेझंट आणि अरुण्डेल यांच्या-सारख्या आपल्या धर्मजीवनाशीं समरस झालेल्या विदेशीयांचा आत्मीयतेच्या उत्कट जिव्हाळ्यानें गौरव केला, त्या देशावर निधर्मी राष्ट्रवाद लादण्याचा प्रयत्न अट्टाहासानें करण्यांत यावा, यापरता त्याच्या परंपरागत धर्मसहि-ष्णुतेचा दुसरा उपमर्द तो कोणता ? मला स्वतःला केवळ राजकीय आणि आर्थिक हितसंबंधांच्या संहतीवर उभारलेल्या निधर्मी राष्ट्रीयत्वाचा हा पुरस्कार यशस्वी होईल, असें वाटत नाहीं. कारण, भारताची ऐतिहासिक नियतीच मुळीं त्याच्या सर्वथैव विरुद्ध आहे, हें कोणालाहि सहज दिसून येईल. त्या दृष्टीनें डॉ. मुखर्जी यांना काश्मीरांत आलेलें वीरमरण हें मला नियतीचे अत्यंत सूचक चेष्टित आहे, असें वाटतें.

असो. श्री. गाडगीळ यांच्या या छोट्या पुस्तकांत अर्थातच या मूलभूत प्रश्नाची चर्चा यावी, अशी अपेक्षा करणें योग्य होणार नाहीं. म्हणूनच मी प्रस्तावनेंत त्याचा विचार इतक्या विस्तारानें केला आहे. त्यांनीं ओघवती आणि ओजस्वी अशा भाषेंत वर्णन केलेलें हें डॉ. मुखर्जी यांचें हें चरित्र महाराष्ट्रांतील विशेषतः विद्यार्थिवर्ग उत्सुकतेनें वाचील, अशी मला उमेद वाटते.

प्रसाद, अभ्यंकर रस्ता,
धंतोली, नागपूर
ता. ४-८-५३

ग. त्र्यं. माडखोलकर

४०६३०

१२९०२

दा. क्र. ७९६१

# श्यामाप्रसाद मुखर्जी

## ‘ चलाव तेरी गोली ! ’

वातावरण तंग होतें. कोणत्या क्षणीं काय घडेल सांगतां येत नव्हतें. अुभय पक्ष सज्ज होते— मात्र त्यांतला अेक चढाअीसाठीं नि दुसरा संरक्षणासाठीं.

कलकत्त्यांतील धरमतल्ला रस्त्यावरील तो देखावा किती भयंकर होता ! तरी पण पाहाणाराच्या अंगावर भीतीबरोबरच स्फूर्तीचेहि रोमांच तो अुभे करीत होता.

१९४५ च्या नोव्हेंबरांतील गोष्ट. युद्ध बंद झालें होतें. आणि त्याच्या पश्चात्-परिणामांखालीं जनता चिरडून-भरडून निघूं लागली होती. ईशान्य आशियांत भारतीय स्वातंत्र्यासाठीं नेताजी सुभाषचंद्रांनीं अुभारलेल्या ‘ आझाद हिंद ’ युद्धालाहि विराम पडला होता व आतां त्या युद्धांतील बंदी झालेल्या पण पूर्वी ब्रिटिशांच्या चाकरींत असलेल्या अधिकाऱ्यांच्या न्यायालयीन चौकशा चालू झाल्या होत्या.

अशाच अेका दिवशीं कलकत्त्यांतील विद्यार्थ्यांनीं अेक मिरवणूक काढली. 'आझाद हिंद' बन्द्यांबद्दल आदर व त्यांना दंडू पाहाणाऱ्या सरकारचा (त्यावेळच्या ब्रिटिश सरकारचा) निषेध हा त्या मिरवणूकीचा अुद्देश. मिरवणूक सरळपणें पुढें चालू देण्याचा पोलिसांचा इरादा नव्हता. त्यांनीं घोषणा करीत येणाऱ्या त्या हजारों विद्यार्थ्यांची वाट अडविली. विद्यार्थीहि मजबूत काळजाचे होते. ते हट्टेलपणें अुभेच राहिले. गोळ्या चालल्या. कांहीं विद्यार्थी पोलिसांच्या त्या पाशवी गोळ्यांचे बळीहि झाले. तरीहि. माघार घ्यावयाची विद्यार्थ्यांची तयारी नव्हती. ते जागचे हालेनात. त्यांनीं तिथें बैठकच मारली. रस्त्यावरच ठाण मांडलें. समोर काळे पोलीस-गोरे अधिकारी बंदुका रोखून नि बागनेटें चढवून अुभेच होते.

परिस्थिती मोठी विचित्र नि तितकीच गंभीर. पोरांच्या जीवाशीं खेळ होता तो. ते दुसरें कांहींहि अैकायला तयार नव्हते. 'आम्ही पुढेंच जाणार—परत नाहीं फिरणार.' हा त्यांचा घोष. ते हट्टाला पेटले होते. येवढ्या कलकत्त्यांत पुढारी कांहीं थोडे नव्हते—पण या पेटलेल्या आगींत अुडी घालतो कोण? अखेर संध्याकाळ झाली. दिवस मावळला. रात्र पडली. पण कोणाचेंच माघार घेण्याचें चिन्ह नव्हतें. पोलिसांना काय? ते तर कामाचे नोकर. ते आपल्या 'कर्तव्यासाठीं' सिद्धच होते बन्दुका झाडायला केव्हांहि.

काय करणार आतां? हा पेंच कसा सुटणार? कोंडी कशी फुटणार ही? त्यांतहि कांहीं कळवळ्याचे होतेच. त्यांना विचार करतां करतां आठवलें—'ह्या भयंकर प्रसंगांत उभा राहील नि उपयोगी पडेल असा अेकच माणूस आतां दिसतो; त्याला बोलवा.'

७७, सर अशुतोष मुखर्जी रस्ता. अुत्तर कलकत्त्यांतील त्या भव्य घरांत वावरणारा तो भव्य पुरुष. पण तो तर बाहेरगांवीं गेला होता. घरीं असता तर बोलवायची गरजच नव्हती त्याला अशा वेळीं. आपण होअूनच तो तिथें धांवत आला असता. तथापि कळवायला म्हणून गेलेले तिथेच थांबले. रात्र पुष्कळच झाली होती. दहा वाजून गेले. आणि अखेर ज्याची

वाट अत्यंत अुत्सुकतेनें व अधीरतेनें ते सारेजण पाहात होते, ती व्यक्ति घरीं येअून पोहोंचली.

'श्यामाबाबू, आतां आपणच कांहीं कराल तर!' पण त्यांना अशी गळ घालण्याचें कारणच नव्हतें. अशा कामासाठीं निमंत्रणाची आवश्यकताच नव्हती त्यांच्यापाशीं. हें तर आपलें कर्तव्यच आहे, अशीच त्यांची भावना होती. त्याच पावलीं ते निघाले. धरमतल्ला रस्त्यावरील त्या भयंकर, तंग, स्फोटक परिस्थितीच्या मध्यावर जाऊन ते उभे राहिले. 'चलाव तेरी गोली' म्हणणाऱ्या निधड्या छातीच्या आपल्या शूर पुत्राची श्रद्धानंदांची आठवण भारतमातेला त्यावेळीं अवश्य झाली असेल.

सारी रात्र डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी त्या मुलांपाशींच उभे होते.—रात्रभर थंडीवाऱ्यांत, पोलिसांच्या बंदुकांच्या टप्प्यांत, मृत्यूच्या दारांत त्यांच्या डोळ्याला डोळा भिडवून.

"डॉक्टर, तुम्हांला ही उघडी थंडी सोसायची नाहीं. इथे उघड्यावर वारा बाधेल तुम्हांला." असें कोणी म्हणाले.

"मग तो काय या मुलांना नाहीं बाधणार? तींहि माझ्यासारखींच हाडामासाचीं आहेत. अशा स्थितींत या मुलांना इथे सोडून मी जाणार नाहीं इथून. माझ्या हातून घडणार नाहीं तें." श्यामाबाबूंनीं वारंवार घरीं परत जाण्याविषयीं आग्रह करणाऱ्या मंडळींना स्पष्ट सांगून टाकलें.

अखेर त्यांच्या थोर व्यक्तित्वाचा प्रभाव पडला. तो भयंकर प्रसंग आणखी कांहीं बरेंवाईट न घडतां निभावून गेला. मग दुसऱ्या दिवशीं पोलिसांच्या गोळ्यांना बळी पडलेल्या विद्यार्थ्यांच्या—हुतात्म्यांच्या मिरवणुकीला श्यामाबाबू उपस्थित होतेच. हा चाळीशी उलटलेला गृहस्थ त्या तरुण विद्यार्थ्यांच्या बरोबरच त्या मिरवणुकींत शेवटपर्यंत—सात मैल चालत गेला. आणि ज्यांनीं आदल्या दिवशीं आपल्यावर विश्वास टाकला होता त्या तरुणांच्या विश्वासाला आपण पूर्ण पात्र आहोंत हें त्यानें सिद्ध करून दिलें.

या बालकाचें नांव श्यामाप्रसाद. श्यामाबाबूंचे वडील सर अशुतोष मुखर्जी (जन्म १८६५) यांचें नांव माहीत नाहीं असा सुशिक्षित बंगाली सांपडणें विरळा. कारण कलकत्ता विद्यापीठ म्हणजे सर अशुतोष मुखर्जी व सर अशुतोष म्हणजे कलकत्ता विद्यापीठ असें समीकरण त्यांच्या बाबतींत होऊन बसलेलें होतें. भारतीय शिक्षणक्षेत्रांत विशेषत: बंगालच्या शैक्षणिक प्रगतींत सर अशुतोष यांचा वांटा अपरिहार्य आहे. कलकत्ता विद्यापीठ तसें पाहिलें तर १८५७ मध्येंच स्थापन झालें. पण सर अशुतोष यांच्या वेळे-पर्यंत तें केवळ परीक्षा घेणारें विद्यापीठ होतें. सर अशुतोष यांनीं आपल्या निष्ठापूर्वक दीर्घोद्योगानें आणि अलौकिक बुद्धिसामर्थ्य व अप्रतिम संघटन-कौशल्य यांच्या बळावर त्याला नामवन्त शिक्षणदायी विद्यापीठांच्या श्रेणींत आणून बसविलें. सर अशुतोष यांचे वडील डॉ. गंगाप्रसाद हे कलकत्त्यांतील भवानीपूर भागांत एक महत्त्वाची व्यक्ति म्हणून गणले जात. त्यांनीं आपल्या मुलाला सुशिक्षणाच्या सर्व सोयी उपलब्ध करून देण्याच्या बाबतींत यत्किं-चितहि कुचराई केली नाहीं. किंबहुना क्रमाक्रमानें त्याला यशाच्या पुढच्या पायरीवरतीं नेऊन पोहोंचविण्यासाठीं ते अत्यंत दक्ष होते. सर अशुतोष यांना त्यांच्या वडिलांचा सांस्कृतिक वारसा जसा उत्तम रीतीनें प्राप्त झाला तसाच तो पुढें त्यांनीं आपले द्वितीय चिरंजिव श्यामाप्रसाद यांच्या-कडे तितक्याच प्रामाणिकपणानें व परिश्रमपूर्वक पोहोंचता केला. श्यामा-प्रसादांनीं तर स्वतःच म्हटलें आहे कीं 'मी काय आहें हें समजून घ्यायचें असेल तर माझ्या वडिलांचें चरित्र वाचा. सर्वार्थानें त्यांनींच मला लहानाचा मोठा केलें.'

श्यामाप्रसादांचें शिक्षण त्यांच्या विद्वान व व्यवहारदक्ष वडिलांच्या खास देखरेखीखालींच झालें. प्रारंभापासून शेवटपर्यंत अति हुशार विद्यार्थी म्हणूनच त्यांचें नांव शाला-प्रशालांच्या, विद्यालय-महाविद्यालयांच्या कागद-पत्रांतून सांपडेल.

एम. ए. ला बंगाली विषय घेऊन पहिल्या श्रेणींत पहिला येण्याचा मान त्यांनीं पटकावला.

भवानीपुरांतील मित्र इन्स्टिटयूटमध्यें त्यांचें शालेय शिक्षण झालें. १९१७ सालीं मॅट्रिक झाल्यावर, प्रेसिडेन्सी महाविद्यालयांतून १९२१ सालीं त्यांनीं बी. ए. ची पदवी घेतली आणि १९२३ त एम. ए. झाल्यावर लगेच बी. एल. ( एलएल. बी. ) हि ते उत्तीर्ण झाले.

इतक्या हुशार विद्यार्थ्याला त्या वेळच्या परिस्थितिप्रमाणें नोकरी करावयाची झाल्यास आय. सी. एस. साठीं इंग्लंडला पाठविण्याचा विचार सहजच कोणाच्या मनांत येऊन गेला असता. श्यामाबाबूंचे वडील सर अशुतोष यांना आर्थिक दृष्टया ती गोष्ट अशक्यच होती असें नव्हे. तसें पाहिलें तर श्यामाबाबूंचें घराणें उच्च मध्यमवर्गीयांतच गणलें जातें. यांचे वडील सर अशुतोष यांनीं वकिलीच्या व्यवसायांत खोऱ्यानें पैसा ओढला खरा, परंतु १९०४ सालीं कलकत्ता हायकोर्टाच्या न्यायाधीशपदावर त्यांची नेमणूक झाल्यापासून पैशाच्या दृष्टीनें पाहिलें तर त्यांचें नुकसानच झालें. तरी पण त्यांनीं श्यामाबाबूंना बॅरिस्टरीसाठीं इंग्लंडला पाठविण्याचें ठरविलेंच.

श्यामाबाबूंच्या मनावर लहानपणीं जे संस्कार झाले ते बहुतेक सर्व त्यांच्या दक्ष पित्याच्या द्वाराच. सर अशुतोष यांचें घर सांपत्तिक दृष्टया संपन्न होतें तसेंच ग्रंथरूपानें उदंड ज्ञानभांडारहि त्यांनीं आपल्या भव्य घरांत भरपूर सांठवून ठेवलें होतें. तें भांडार केवढें अफाट असेल याची कल्पना कलकत्ता येथील पूर्वीच्या ‘ इम्पीरिअल लायब्ररींत ’ म्हणजे आतांच्या ‘ नॅशनल लायब्ररींत ’ ( राष्ट्रीय ग्रंथालय ) असलेल्या सुमारें एक लक्ष ग्रंथांच्या ‘अशुतोष ग्रंथसंग्रहा’वरून येईल. श्यामाबाबूंनीं राष्ट्राला अर्पण केलेली ही वडिलार्जित ग्रंथसंपत्ती समक्ष पाहिली व त्यांतील सर्व विषयांचे बहुमोल ग्रंथ बघितले व त्यांच्या उत्कृष्ट बांधणीपासून त्यांतील विविधतेपर्यंत दृष्टि टाकली आणि त्यांतलें सहज कोणतेंहि एखादें पुस्तक उचलून त्यावर पानोपानीं केलेल्या खुणा, पुस्तकाच्या प्रारंभीं हातांनीं लिहिलेलें ग्रंथसार व व जागजागीं पेन्सिलीनें केलेल्या टीकाटिप्पणी पाहिल्या कीं मन आश्चर्यानें थक्क होऊन जातें. हायकोर्ट-न्यायाधीशाची नोकरी, विद्यापीठाचें जीवनव्यापी काम आणि तसेच इतर अनेक अनेक सार्वजनिक उद्योग

सांभाळूनहि त्या पुरुषानें ही एवढी प्रचंड ज्ञानसंपदा कशी संपादन केली असेल याच विचारानें मन भरून जातें.

विद्वज्जनांची बैठक नि ज्ञानचर्चा हीं तर सर अशुतोष यांच्या कालांत 'मुखर्जी हाऊस' चीं वैशिष्टयें. कोणीहि याचक विमुख जाणार नाहीं, कोणाहि सत्पात्राची योग्य संभावना झाल्याशिवाय राहणार नाहीं, असा तिथला लौकिक. अशा या घरांत श्यामाबाबू वाढले.

वडिलांच्या प्रेमळ पण दक्ष मार्गदर्शनाखालीं ते लहानाचे मोठे झाले. श्यामाबाबूंचें घराणें सुधारक असलें तरी नास्तिक मात्र नाहीं. सर अशुतोष यांनीं आपल्या मुलीचा पुनर्विवाह करून देण्याचें सामाजिक साहस त्या काळांतच केलें होतें. तथापि आपल्या सनातनी आईला वाईट वाटेल म्हणून १९०१ मध्यें इंग्लंडमधील विद्यापीठाची कार्यपद्धती अभ्यासिण्यासाठीं सरकार त्यांना पाठवीत असतांना त्यांनीं परदेशगमन करण्याचें नाकारलें. सर अशुतोष यांचें कुटुंबजीवन तसें सुखी होतें. पांच मुलगे व दोन मुली यांनीं त्यांचें घर भरलेलें दिसे. यांपैकीं श्यामाबाबूंवर म्हणजे आपल्या द्वितीय चिरंजीवावर त्यांचें जसें अलोट प्रेम होतें तसेंच, ते त्यांच्याबद्दल फार मोठ्या आकांक्षाहि बाळगून होते. त्यांनीं श्यामाबाबूंचें गृहजीवन सुखी व्हावें म्हणून सर्वतोपरी काळजी घेतली, तशीच त्यांचें सार्वजनिक जीवन थोर व तेजस्वी व्हावें म्हणूनहि ते अत्यंत काळजीपूर्वक झटत होते.

विद्यापीठांची चौकशी करण्यासाठी गेलेल्या सॅडलर कमिशनवर सर अशुतोष यांची नेमणूक झाली तेव्हां त्यांना देशभर हिंडावें लागलें. या देशपर्यटनाचा लाभ त्यांनीं स्वतःच्या पुत्रालाहि करून देण्यासाठींच त्याला आपल्याबरोबर घेतलें होतें. वडिलांच्या दृष्टींतून श्यामाबाबूंना आपल्या थोर देशाचें दर्शन घडलें हा कांहीं योगायोग नव्हता कीं ती सहज सहल नव्हती तर योजनापूर्वक घडविलेला तो एक संस्कार होता.

अशुतोष मुखर्जी यांनीं वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षीं एम्. ए होऊन एक विख्यात गणितज्ञ म्हणून कीर्ति संपादन केली. इंग्लंडच्या

मॅथॅमॅटिकल सोसायटीच्या (गणिती संस्था) सभासदत्वाचा मान त्यांना यापूर्वींच लाभला होता. प्रेमचंद रायचंद शिष्यवृत्ति ही बंगाल-मधील विलोभनीय शिष्यवृत्तिहि लगेच म्हणजे १८८६ सालीं पटकावणाऱ्या या हुषार विद्यार्थ्याला 'पुढे काय ?' या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर मात्र देणें कठीण होऊन बसलें. तथापि पुष्कळ विचार केल्यानंतर अखेर त्यांनीं आपलें नांव बंगालच्या हायकोर्टांत वकील म्हणून दाखल केलें. या ठिकाणीं त्यांची प्रगति होण्याला जरी त्यांना थोडा अवधी लागला, तरीपण १८९४ मध्यें त्यांनीं 'डॉक्टर ऑफ लॉज' ही पदवी प्राप्त करून घेतली.

१८८९ मध्यें कलकत्ता विद्यापीठानें त्यांची 'फेलो' म्हणून नेमणूक केली. आणि यावेळींच त्यांच्या भावी पराक्रमाची मुहूर्तमेढ रोवली गेली. शैक्षणिक क्षेत्रांत कलकत्ता विद्यापीठाच्या द्वारा त्यांनीं जी संस्मरणीय कामगिरी करून ठेवलेली आहे ती यशस्वीपणें पार पाडण्यासाठीं आवश्यक त्या ज्ञानाचे व अनुभवाचे धडे त्यांना प्रथम येथेंच मिळाले. पुढें कलकत्ता विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून बंगाल कायदे कौन्सिल व नंतर व्हाइसरॉयचें इंपीरिअल कौन्सिल यांवरहि त्यांची निवड लोकांनीं केली. १९०४ मध्यें हायकोर्टाचें न्यायाधीशपद त्यांना प्राप्त झालें, आणि १९०६ सालीं सर गुरुनाथ बॅनर्जी यांनीं नुकत्याच रिकाम्या केलेल्या जागेवर अशुतोष मुखर्जी यांची निवड झाली. ही निवड झाली तो मोठा सुमुहूर्त असला पाहिजे, कारण तेव्हांपासून सतत दहा वर्षेंपर्यंत अशुतोष-बाबूंनीं कलकत्ता विद्यापीठ प्रगतीच्या पायऱ्यांनीं भराभर उज्ज्वल यशो-मंदिराकडेच चढवीत नेलें. आणि त्यांच्या पराक्रमी पुत्रानें त्यावर यशाचा कळस उभारला.

सर अशुतोष यांनीं कलकत्ता विद्यापीठांत जें बहुविध स्वरूपाचें कार्य केलें त्यांतील कांहीं आजहि विशेष महत्त्वाचें वाटण्यासारखें आहे. विद्यापीठाच्या दरभंगा बिल्डिंगमध्यें त्यांचा जो अर्धपुतळा बसविण्यांत आला आहे त्याखालीं इंग्रजींत जो मजकूर कोरला आहे त्याचा आशय त्या विशेष महत्त्वाच्या कामगिरीचें यथार्थतेनें वर्णन करणारा आहे :

"त्यांचें उदात्त नि चिरकालिक कार्य हें कीं त्यांनीं
सापत्न–भाषागृहांत मायाभाषेला आणून बसविलें."

मुखर्जी पितापुत्रांच्या बाबतींत कलकत्ता विद्यापीठाच्या दृष्टीनें विचार करणाराला तुलनेनें त्यांच्यांतील अधिक मोठी कामगिरी कोणाची याचें उत्तर देणें कठिणच पडेल. 'कलकत्ता विद्यापीठाचा प्रमुख निर्माता' म्हणून श्यामाप्रसादांच्या थोर पदावरील अध्यापकांनींच त्यांची प्रकट प्रशंसा केली यांतच सारें कांहीं आलें.

इंग्लंडला जाऊन बॅरिस्टर होऊन १९२७ सालीं श्यामाबाबू स्वदेशीं परतले. येतांना एल्‌एल्. डी. ही आणखीहि एक पदवी ते बरोबर घेऊन आले. तिकडून आल्यावर साहजिकच त्यांनीं वकिली व्यवसाय पत्करला. आणि शारदेचा वरदहस्त असलेला हा तरूण त्या क्षेत्रांतहि चमकला असेल हें वेगळें सांगावयास नको. त्यांचे वडील हायकोर्टांत न्यायाधीश असतांनाच त्यांनीं वकिली व्यवसायाला प्रारंभ केला. हिंदी वकील बारमध्यें कांहीं दिवस काम केल्यानंतर इंग्लिश बारमध्यें ते गेले. तथापि त्यांची योजना परमेश्वरानें निराळ्याच कामासाठीं केलेली होती हें लवकरच स्पष्ट झालें.

## कलकत्ता विद्यापीठांत

कलकत्ता हायकोर्टाशीं असलेला त्यांचा प्रत्यक्ष संबंध पुढें फार काळ टिकला नाहीं. वडील हायकोर्टाचे न्यायाधीश होते यापेक्षां ते कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरु आहेत हेंच लोकांना अधिक माहित होतें. आपल्या मुलालाहि या विद्यापीठाच्या कारभाराचें शिक्षण ते हळू हळू देत आहेत हेंहि जवळच्या मंडळींच्या दृष्टींत येऊन चुकलें होतें. वास्तविक श्यामाबाबू एम्. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले त्या परीक्षेचा अधिकृत

१५१०२

निकाल जाहीर होण्याच्या पूर्वींच कलकत्ता विद्यापीठांत त्यांची 'फेलो' म्हणून नेमणूक करण्याचें ठरलें होतें. वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षीं विद्यापीठाच्या सीनेटवर त्यांना घेण्यांत आलें नि तेंहि त्यांचे अध्यापक (बंगालचे सध्यांचे राज्यपाल) श्री. एच. सी. मुखर्जी यांनीं आपली सीनेटरची खुर्ची स्वखुषीनें रिकामी करून. 'कलकत्ता विद्यापीठाचे आद्य शिल्पकार' म्हणून ओळखले जाणारे त्यांचे वडील यावेळीं विद्यापीठाच्या कुलगुरुपदावर होते. आपण जीवनभराच्या परिश्रमानें नांवारूपाला आणलेलें हें विद्यापीठ आपल्या मुलाच्या हातून उन्नतीच्या शिखरावर चढावें अशी अपेक्षा त्या विद्यापीठावर अपत्यवत् प्रेम करणाऱ्या अशुतोषबाबूंना वाटलें असेल तर नवल नाहीं.

आणि हळूहळू विद्यापीठांतील नवीं नवीं कामें श्यामाप्रसादांच्या अंगावर टाकण्यांत येऊं लागलीं. त्यांच्याहि हें लक्षांत येऊन चुकलें कीं वडिलांच्या पावलावर पाऊल टाकून विद्यापीठाची कार्यधुरा आपल्याला आपल्या शिरावर घ्यावयाची आहे.

कला (Art) व विज्ञान विभागाच्या पोस्ट ग्रॅज्युएट स्टडीज कौन्सिलचें अध्यक्षपद यानंतर त्यांच्याकडे आलें. आणि पुढें कला विभागाचे प्रमुख (Dean of the faculties of Arts) म्हणूनहि त्यांना जबाबदारी सांभाळावी लागली.

१९३४ सालानें तर त्यांच्यावर एक फार मोठी जोखीम आणून टाकली. त्यावेळीं त्यांचें वय सारें ३३ वर्षांचें होतें. मार्गदर्शक वडिलांचें पितृछत्र हरपून आठ वर्षें उलटून गेलीं होती. प्रिय व तरुण पत्नीचा कायमचा विरह झाल्याला तर अजून पुरें वर्षहि लोटलें नव्हतें. कलकत्ता विद्यापीठ दिवसानुदिवस सरकारच्या आसऱ्यामुळें प्रबळ नि उन्मत्त होत चाललेल्या मुस्लिम लीगवाल्यांचें एक द्वेषाचें नि शत्रुत्वाचें केंद्र बनलें होतें. इस्लामी जातीयतेचे वारे वातावरणांत जोरजोरानें घोंघावूं लागले होते. आणि परिपक्व वयालाहि जड वाटणारी ती जोखीम त्यांच्या तरुण स्कंधांवर पडली होती.

गरीब विद्यार्थ्यांना वसतिगृहाचा फायदा घेतां यावा म्हणून त्यांनीं त्यांच्यासाठीं खास कमी शुल्काची सवलतहि चालू केली होती. हा एक उपक्रमहि त्यांच्या सहृदय व्यवहार्यतेवर पुरेसा प्रकाश पाडूं शकेल.

कलकत्ता विद्यापीठानें त्यांना 'डी. लिट्.' पदवी दिली व नंतर बनारस हिंदु विद्यापीठानेंहि त्यांना 'डॉक्टोरेट' अर्पण केली. याशिवाय अन्य अनेक मार्गांनीं जाणत्यांनीं त्यांच्या कार्याचा गौरव केला. अनेक देशी व परदेशी विद्यापीठांनींहि त्यांना सन्मानपूर्वक निमंत्रण दिलें. परंतु कलकत्ता विद्यापीठ हेंच आपलें कार्यक्षेत्र त्यांनीं त्यावेळीं सीमित केलें होतें. त्यांच्या दृष्टीनें तिथेंच इतकें काम करावयाचें होतें, कीं दिवसाच्या चोविस तासांत आणखीहि कांहीं तासांची भर पडती तर ती त्यासाठीं त्यांना हवी होती. कारण विद्यापीठ ही एक स्वतंत्र स्वयमेव संस्था अशीच त्यांची दृढ धारणा होती. या विद्यापीठाबद्दल त्यांच्या अंतःकरणांत किती अलोट प्रेम नि उत्कट अभिमानहि निवसत होता हे त्यांच्या तोंडून बंगाल विधिमंडळाच्या सभागृहांत निनादलेल्या शब्दांतूनहि व्यक्त झालें आहे. "भिकेची झोळी हातांत घेऊन आणि कसलाहि विरोध न होतां माझ्या विद्यापीठाची अशा रीतीनें या सभागृहांत हेटाळणी झालेली मला कधींच सहन होणार नाहीं. माझा तुमच्या विधेयकाला विरोधच राहील-मग तुम्हांला काय करायचें असेल तें तुम्ही करून घ्या." कलकत्ता विद्यापीठांत जातीय विखार कालविणाऱ्या श्री. फझलूल हक्क यांच्या विधेयकाला विरोध करतांनाचे त्यांचे हे उद्गार आहेत. आणि नुकतेंच गेल्या वर्षी १३ डिसेंबरला दिल्ली विद्यापीठाच्या पदवीदान समारंभांत दीक्षान्त भाषण करीत असतांनाहि त्यांनीं सरकारला हेंच बजावलें कीं, "सरकारद्वारा नियुक्त केलेल्या कोणत्याहि शक्तीनें विद्यापीठांचें नियमन करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे भारतांतील इतर सर्व विद्यापीठें निर्जीव करून टाकण्यासारखें होईल."

कलकत्ता विद्यापीठाशीं त्यांचा सतत दहा वर्षें निकटचा संबंध होता. त्या काळांत त्यांनीं शास्त्रीय पद्धतीनें व राष्ट्रीय वृत्तीनें अनेकानेक शैक्षणिक सिद्धान्तांना कार्यरूप दिलें. तो विषय शिक्षणशास्त्रज्ञांच्या अभ्यास-चिंतनाचा

आहे, तसेंच स्वतंत्र भारताच्या राष्ट्रीय नवशिक्षणाचें मार्गदर्शन करण्यासहि तो पुरेसा समर्थ आहे. आणि म्हणून कित्येकदां मनांत येऊन जातें कीं डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी स्वतंत्र भारताचे केंद्रीय शिक्षणमंत्री झाले असते तर ?–

ज्या कलकत्ता विद्यापीठाला त्यांनीं असामान्य स्थानावर आणून बसविलें आणि सेवाभावांतील भिन्नताहि शिल्लक न ठेवतां ज्या संस्थेला संकटाच्या स्थितींतून त्यांनीं आपल्या प्रचंड प्रयत्नांच्या व विलक्षण बुद्धि सामर्थ्याच्या बळावर पार करून नेलें आणि ज्याच्या रक्षणासाठीं सरकार-बरोबरहि दोन हात करण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं, त्या विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून असलेले त्यांचे संबंध ज्या तऱ्हेनें व ज्या कारणासाठीं तुटले–नव्हे तोडण्यांत आले तें कारण अति दुःखद व तितकेंच भारतीयांना लांच्छनास्पद आहे. प्रांतांत त्या वेळीं अधिकारावर असलेल्या "मुस्लीम लीग मंत्रिमंडळाला ते तेथें राहणें नको आहे म्हणूनच मी त्यांची पुनश्च कलकत्ता विद्यापीठाच्या कुलगुरुपदीं नेमणूक करीत नाहीं; अन्यथा या जागेसाठीं त्यांच्याइतका योग्य माणूस आपल्याला दुसरा दिसत नाहीं.—" कलकत्ता विद्यापीठाचे तत्कालीन कुलपति लॉर्ड ब्रॅबोर्न यांनीं तें कारण अशाप्रकारें अगदीं उघडपणें बोलून दाखविलेलें आहे.

आणि मुस्लीम लीगवाल्यांना डॉ. श्यामाप्रसाद एवढे डोळ्यांत सलावेत अशीच राष्ट्रीय कामगिरी त्यांच्या हातून बंगालच्या विधि-मंडळांतून तत्पूर्वीं झालेली होती. विद्यापीठाच्या मतदारसंघातर्फे कायदे कौन्सिलांत सभासद असतांना सरकारच्या मुसलमानी पक्षपाताला जोरदार विरोध करून त्यांनीं विद्यापीठाचें रक्षण केलें होतें. कलकत्ता विद्यापीठांतहि मुसलमानी जातीयतेचें प्राणघातक विष भिनविण्याचा प्रयत्न कायदेमंडळां-तील लीगी सभासदांनीं त्यावेळीं एका विधेयकाच्या द्वारां अगदीं पद्धतशीरपणें पण अत्यंत निकरानें चालविला होता. श्यामाबाबूंनींहि तो हल्ला त्याच मार्गांनीं परतविण्यांत मोठी निर्भयता व पराक्रम प्रकट केला.

१९३४ सालीं म्हणजे वयाच्या अवघ्या ३३ व्या वर्षीं कलकत्ता विद्यापीठासारख्या प्रतिष्ठित विद्यापीठाचें कुलगुरुत्व त्यांच्याकडे आलें

आणि तेव्हांपासून अवघ्या चार वर्षांच्या कार्यकालांत त्यांनीं त्यांत पुढील चार दशकांवर परिणाम करितील अशा प्रकारच्या सुधारणा यशस्वी-पणें करून दाखविल्या. हें श्यामाप्रसादांचें यश खरोखरीच अपूर्व आहे. सरकारकडून सहकार्याचा अभाव व मुसलमानांकडून जातीय विषाराचा सतत वर्षाव या दुहेरी मान्यांत उभें राहून त्यांनीं अत्यंत धीमेरणानें विद्या-पीठाच्या आवाराबाहेर विद्यापीठ आणि पर्यायानें बंगाली जनतेचें शिक्षण-क्षेत्र संरक्षिलें, पवित्र राखलें.

१९२९ पासून १९३७ पर्यंत मधील कांहीं थोडया काळाच्या अंतरानें श्यामाप्रसाद बंगालच्या वरिष्ठ कौन्सिलावर विद्यापीठ मतदारसंघांतून निवडून येऊन बहुतेक शैक्षणिक स्वरूपाचेंच कार्य करीत होते. १९३८ सालीं मात्र त्यांच्या मन:स्थितींत पालट पडला.

आणि त्याला कारण बंगालमधील तत्कालीन राजकीय स्थिति हेंच होतें. १९३७ त नव्या प्रांतिक स्वायत्तता कायद्यानें बंगाल प्रांतांत मुस्लीम लीगचें मंत्रिमंडळ अधिकारावर आलें. आणि त्यानें इतर क्षेत्रांप्रमाणेंच शिक्षणाच्या क्षेत्रांतहि मुसलमानी धिंगाणा घालावयास प्रारंभ केला. कलकत्ता विद्यापीठहि 'काबीज' करण्याच्या कारवाया सुरू झाल्या व तेथें मुसलमानी जातीयता प्रस्थापित करण्यासाठीं श्री. हक्क यांच्याकडून 'सेकंडरी एज्युकेशन बिल' हें एक दुष्ट विधेयकहि पुढें आले. या विधेयकाला विधान-सभेमध्यें विरोध करीत असतां श्यामाप्रसादांनीं केलेलीं भाषणें त्यांतील आत्यंतिक तळमळ व प्रभावी वक्तृत्व यामुळें इतकीं परिणामकारक झालीं कीं शेवटीं हक्कमियांनीं चिडून धमकी दिली— " या विधेयकाला विरोध कराल तर साऱ्या बंगालभर या मुद्यावर आम्ही सार्वजनिक जातीय आन्दो-लन माजविल्याशिवाय राहणार नाहीं "– याचा स्पष्ट अर्थ दंग्याधोप्याच्या नेहमींच्या दंडेलीनें आम्ही त्याला उत्तर देऊं आणि साऱ्या प्रांतभर अत्या-चारांचा भडका उडवून देऊं असाच होता.

परंतु असल्या धमकीला भिण्याचें तत्त्वज्ञान सुदैवानें श्यामाप्रसादांच्या कांणीं नव्हतें. त्यांनीं ठणकावून उत्तर दिलें कीं– 'तुम्हांला काय करायचें

असेल तें करून घ्या. आम्ही या विधेयकाला शेवटपर्यंत विरोधच करीत राहणार.' आणि विधिमंडळांत लीगवाल्यांचें भरपूर बहुमत असतांना सुद्धां हक्कमियाँना आपला हा दुष्ट हेतु साध्य करून घेतां आला नाहीं.

प्रांतिक स्वायत्ततेचा कायदा अमलांत येण्यापूर्वी त्यांनीं बंगालच्या विधिमंडळांत ब्रिटिश सरकारशीं केलेला झगडाहि तितकाच संस्मरणीय आहे. १९३३ मध्यें 'कलकत्ता म्युनिसिपल ॲक्ट अँमेंडमेंट' विधेयक पुढें आलें व त्यानें कलकत्ता महापालिकेंतील सर्व नेमणुका सरकारच्या पूर्व संमतीनेंच केल्या पाहिजेत, अशी सक्ति केली. स्थानिक स्वराज्याच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारा हा उपक्रम हाणून पाडण्यासाठीं श्यामाप्रसादांनीं अत्यंत निर्भयपणें कौन्सिलांत सरकारवर हल्ले चढविले. दहशतवादी क्रांतिकारकांना चिरडून टाकण्याच्या उद्देशानें पुढें आलेलें 'बेंगॉल क्रिमिनल लॉ अँमेंडमेंट' विधेयक, नगरपालिकेच्या निवडणुकीसाठीं मुसलमानांना स्वतंत्र मतदार संघ देणारें 'कलकत्ता म्युनिसिपल अँमेंडमेंट' विधेयक अशा अनेक स्वातंत्र्यद्रोही व देशघातकी विधेयकांना त्यांनीं परिणामकारक विरोध आपल्या प्रभावी भाषणांच्या जोरावर केला. ते स्वतः सनदशीर मार्गाचे भोक्ते आणि शांतिप्रधान चळवळीचे चाहते होते, ही गोष्ट खरी असली तरी क्रांतिकारकांच्या ज्वाज्वल्य देशभक्तिबद्दलहि त्यांच्या अंतकरणांत अनादर नव्हता. १९३२ सालीं त्यांनीं सेनगुप्ता व सुभाषचन्द्र बोस हे स्थानबद्धतेंत आजारी असतांना त्यांच्या प्रकृतीची दखल घेण्याबद्दल तहकुबीची सूचना मांडून आपला देशभक्तीचा कैवारहि सिद्ध केला होता. तसेंच जातीय निवाड्याला त्यांनीं १९३६ मध्यें केलेला कडवा विरोध कौन्सिलांत व बाहेरहि चांगलाच गाजला.

१९३८ मध्यें त्यांनीं कलकत्ता विद्यापीठाचें कुलगुरुपद सोडलें. त्यांचे लक्षावधि चाहते, हजारों विद्यार्थी नि अनेक सहकारी यांच्या इच्छेविरुद्धच त्यांना तें करावें लागलें. पण त्याला इलाज नव्हता. मुसलमानांच्या जातीय कारवायांचें भीषण राष्ट्रघातकी स्वरूप त्यांना स्पष्ट दिसू लागलें होतें. म्हणूनच त्यांनीं प्राणापलीकडे प्रिय असलेलें

कलकत्ता विद्यापीठ सोडलें. दुर्दैवानें या अलौकिक शिक्षणतज्ज्ञानें व प्रकांड पंडितानें भूषविलेल्या आशियांतील श्रेष्ठ विद्यापीठाच्या कुलगुरूच्या या स्पृहणीय स्थानावर तत्कालीन मुस्लीम लीग मंत्रिमंडळाच्या हट्टावरून ज्याला बसविण्यांत आलें तो गृहस्थ मॅट्रिकच्या परीक्षेचीहि पायरी ओलांडू न शकलेला शहाबुद्दीन ( सांप्रत पाकिस्थानांत वायव्य सीमाप्रांताचे राज्यपाल ) हा होता.

परंतु कलकत्ता विद्यापीठापुरतेंच मर्यादित राहावें किंबहुना शिक्षण-क्षेत्रांतच सामावून राहावें इतकें लहान जीवन आतां त्यांचें राहिलें नव्हतें. साऱ्या बंगालचा, त्या दुर्दैवी भूमींतील हिंदूंचा विचार करण्याची आवश्यकता श्यामाप्रसादांच्या आतां पुरेपूर ध्यानांत आली होती.

तत्कालिन बंगालची परिस्थिती म्हणजे तत्रस्थ हिंदूंच्या ससेहोलपटीची परिस्थिति. त्या काळांत देशांत मुसलमानांचे दंगे सर्वत्रच होत होते अन् शेकडों हिंदु त्यांत बळी पडत होते. बंगालमधील खुलना, बारिसाल इत्यादि ऐतिहासिक दंगे त्याच काळांतले. ब्रिटिश साम्राज्यशाही तर हिंदूंच्या शक्तिशोषणासाठीं व तेजोभंगासाठीं हरएक प्रयत्न करीत होती. देशांतील स्वातंत्र्याच्या चळवळीमुळें त्रस्त होऊन गेलेल्या ब्रिटिश नोकरशाहीनें तो चळवळ चिरडण्यासाठीं व विशेषतः ती चळवळ चालविणारे जे येथील राष्ट्रिक हिंदु त्यांना नामशेष करण्यासाठीं मुसलमानांना हाताशीं धरलें होतें. कॉंग्रेसच्या मुसलमानधार्जिण्या वर्तणुकीनें देशांतील मुसलमान पुढारी व मुस्लीम लीग दिवसानुदिवस अधिक चढेल नि अधिक राष्ट्रद्रोही बनत चालली होती. बंगालमध्यें सुभाषचंद्र-शरच्चंद्र यांच्या नेतृत्वाखालीं चाललेल्या कॉंग्रेसी राजकारणांत हिंदुहितदक्षतेला जवळ जवळ स्थानच नव्हतें. मग अशा या परिस्थितींत बंगाली हिंदूंचा त्राता उरला कोण ?

नियतीनें याचें उत्तर देऊन टाकलें होतें.

१९३७ सालीं नव्या प्रांतिक स्वायत्तता कायद्यान्वयें बंगालमध्यें मुस्लीम लीगचें मंत्रिमंडळ अधिकारावर आलें होतें. प्रत्यक्ष अधिकारावर

नसतांनाहि ज्यांनीं देशभर नि विशेषतः त्या प्रांतांत जातीय धुमाकूळ घालून हिंदु समाजाच्या पोखरणीचेंच काम चालविलें होतें, तेथें प्रत्यक्ष राज्यसत्ताच हातीं आल्यावर त्यांनीं काय केलें असेल याची सहज कल्पना करतां येण्यासारखी आहे. ब्रिटिश सरकार तर त्यांच्या पाठीशीं होतेंच. आणि तिसरी त्यांना अनुकूल असलेली गाष्ट म्हणजे कॉंग्रेस पक्षाचें धोरण मुसलमानी अत्याचारांविरुद्ध ब्रहि न काढण्याचें होतें. अर्थात याचा परिणाम हिंदुहिताची होळी होण्यांत झाला असल्यास नवल नाहीं. १९३७ नंतर निर्माण झालेल्या नव्या प्रांतिक विधिमंडळांत (असेंब्लींत) प्रमुख विरोधी पक्ष हा कॉंग्रेस पक्षच होता नि श्री. शरच्चंद्र बोस हे त्या पक्षाचे अधिकृत नेते होते. तरीपण विरोधी पक्षाच्या वतीनें भाषणें करण्याची कामगिरी बोसपक्षानें त्यांच्याकडेच दिली होती म्हटलें तरी चालेल. विद्यापीठाच्या कामाबरोबरच कौन्सिलमधील लोकहिताच्या अन्य कामगिरीमुळें श्यामाप्रसाद ही बंगाल प्रांताच्या सार्वजनिक जीवनांत एक महत्त्वाची व्यक्ति बनत चालली होती. शिक्षणक्षेत्रांतील सेवेच्या रूपानें जशी बरीच मोठी पुण्याई त्यांच्या पाठीशीं उभी केली होती तशीच विधानसभेंत होणारीं त्यांचीं लोकहितदक्ष, विद्वत्ताप्रचुर, ज्ञानसमृद्ध, आकर्षक (नि प्रतिपक्षीयांना बोचक) अशीं एकाहून एक सरस, प्रभावी भाषणें त्या पूर्वार्जित पुण्याईत लौकिकाची नवी भर घालून त्यांचें व्यक्तित्व संपन्न करीत होतीं. विधिमंडळांतील या भाषणांतूनच त्यांच्या त्या जगद्विख्यात "पार्लमेंटेरियन" च्या ख्यातीचा जन्म झाला.

## हिन्दु महासभेंत

आणि त्यानंतर तें महत्त्वाचें १९३९ साल उजाडलें. त्या वर्षीच्या फेब्रुवारींत बंगाल प्रांतिक हिन्दु परिषदेला डॉ. मुखर्जी निमंत्रणावरून

अुपस्थित होते. आणि त्याच ठिकाणीं त्या दोन वीर पुरुषांचा परस्परांशीं संबंध येअून अेकमेकांनीं अेकमेकांना ओळखलें. त्या अधिवेशनानंतर कलकत्त्याला स्वातंत्र्यवीर सावरकरांचें जे संस्मरणीय व्याख्यान झालें त्याचें अध्यक्षपद डॉ. मुखर्जींनीच भूषविलें होतें.

ही त्यांच्या संस्थागत राजकारणाची सुरुवात असली तरी जिला हिंदुत्वनिष्ठ विचारप्रणाली म्हटलें जातें या विशुद्ध राष्ट्रीयत्वाचे समर्थक ते वास्तविक यापूर्वींच बनलेले होते मुस्लिम लीगचें तत्कालीन जातीय राजकारण हें डॉ. मुखर्जींना या तत्त्वज्ञानाकडे वळविण्यास अेक तात्कालिक कारण असेल हें फार तर मान्य करतां येअील. परंतु त्यावरून डॉ. मुखर्जींची एकूण राजकीय विचारसरणीची बैठकच प्रतिक्रियात्मक होती असें भासविण्याचा जो प्रयत्न होत असतो, तो मात्र तर्काला व वस्तुस्थितीलाहि पटण्यासारखा नाहीं. तात्कालिक प्रतिक्रियेच्या कायमचे आहारीं जाण्याइतके श्यामाप्रसाद कांहीं केवळ भावनावश नव्हते. आणि प्रतिक्रियेच्या अपरिहार्यतेचा परिणाम श्यामाप्रसादासारख्या अभ्यासु व बुद्धिनिष्ठ माणसावर पुढील दहाबारा वर्षेंहि सतत टिकून राहिला, असें म्हणणें हें केवळ हास्यास्पद आहे. त्यांनीं हिन्दु महासभेंत प्रवेश केला, तो अेखाद्या भावनाविवश आंधळ्याच्या भूमिकेनें नव्हे, तर देशांतील प्रत्यक्ष वस्तुस्थितीच्या कटु अनुभवानंतर त्यांना जें पटलें त्याचा डोळस समर्थक म्हणूनच. देशांतील व विशेषतः वंगभूमींतील हिंदूंचा निर्भय कैवारी हा जो त्यांचा यथार्थ लौकिक पुढें झाला, त्यासाठीं त्यांची मनोभूमिका या पूर्वींपासूनच अनेक वर्षें तयार होत आली होती. स्वा. सावरकरांच्या प्रभावी विचारसरणीनें तें हिन्दु महासभेकडे आकर्षित झाले, हें कारण तात्कालिक व निमित्तमात्र होतें. परिस्थितीच्या ओघांत विशुद्ध राष्ट्रवादाचा निर्भय पुरस्कर्ता हीच त्यांची भूमिका पूर्वींपासून बनत चालली होती.

१९३९ सालीं हिन्दु महासभेंत प्रवेश केल्यानंतर त्यांनीं सारा हिन्दुस्थान अेकदा आपल्या विवेचक दृष्टीखालीं घातला. आणि त्यावेळीं ब्रिटिशांच्या भेदनीतीनें पोखरून निघालेल्या व कॉंग्रेसी तत्त्वज्ञानानें संभ्रमित झालेल्य

७८४८

लोकस्थितीचें जें केविलवाणें दृश्य त्यांनीं पाहिलें त्यानें त्यांच्या मनावर फार खोल परिणाम केला.

१९३९ ते १९४९ या सतत दहा वर्षांच्या दीर्घ काळांत त्यांनीं हिन्दु महासभेचे पदाधिकारी म्हणून केलेलें कार्य इतिहासाला कधींच डावलतां येण्यासारखें नाहीं. या त्यांच्या कार्याचें स्वरूप साकार दिसत नसलें तरी गांधीवादी मुसलमानधार्जिण्या तत्वज्ञानाला या कामगिरीनें अदृश्य परंतु परिणामकारक प्रतिबंध केलेला आहे, हें कोणाहि प्रांजळ इतिहास-लेखकाला मान्य करावेंच लागेल.

हिन्दु महासभेंतील त्यांच्या कामाचा तपशील या लहानशा पुस्तकांत देतां येण्यासारखा नसला तरी इतकें सांगतां येईल कीं, त्यांच्या नेतृत्वाचे अनेक तेजस्वी पैलू जसे या कालावधींत प्रकट झाले, तसेंच त्यांच्या असामान्य व्यक्तिमत्वाचा ठसा हिन्दु महासभा या संस्थेवर नसला तरी तींतील अनेक कार्यकर्त्यांवर कायमचा उमटून राहिला आहे.

१९३९ मध्यें महायुद्ध सुरू झालें. त्याच सालीं डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनींहि हिन्दु महासभेच्या वाक्पीठावरून भारतांतील मुसलमानी जातीयतेविरुद्ध आपलें वाक्शस्त्र पाजळून संग्राम प्रारंभिला. आणि पूर्वीं जशी शिक्षणक्षेत्रांत कलकत्ता विद्यापीठासाठीं त्यांनीं तनमनधनानें अहर्निश, अविश्रांत सेवा केली तशीच ती त्यांनीं या सालापासून हिन्दु महासभेद्वारा अखिल हिंदु समाजासाठीं सुरू केली. परिस्थितीनेंहि त्यांनीं या हातीं घेतलेल्या कार्यांत त्यांची अशी परीक्षा पाहिली कीं कोणी कच्च्या मातीचा असता तर त्या परिस्थितीच्या खोल पाण्यांत तो कधींच विरघळून गेला असता. पण यामा बाबूंची घडण मऊ मातीची नव्हे तर चांगल्या खणखणीत पोलादाची होती असें पुढील सात-आठ वर्षें ओळीनें झालेल्या त्यांच्या असामान्य कसोटयांनीं सिद्ध करून दिलें.

१९३९ मध्यें हिन्दु महासभेला आपलें युद्धविषयक धोरण ठरवितांना श्यामाप्रसादांच्या बहुमोल विचारांचा फार मोठा उपयोग झाला. महासभेचें १९४० सालचें कलकत्ता अधिवेशनहि पुष्कळसें त्यांच्या निरलस

१४८७४

परिश्रमांमुळेंच यशस्वी झालें. याचवेळीं अ. भा. हिन्दु महासभेच्या कार्यकारिणीचे उपाध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली.

१९४१ त ते हक्क मंत्रिमंडळांत अर्थमंत्रीपदावर असतांना महासभेचें अधिवेशन भागलपूर येथें भरण्याचें ठरलें. परंतु तेथील प्रांतिक सरकारनें त्याला बंदी केली. त्याच गाजलेल्या अधिवेशनांत स्वा. सावरकरांना बंदी मोडून अटक पत्करावी लागली. आणि त्याच अधिवेशनाला हिन्दु महासभेचा पदाधिकारी पुढारी या नात्यानें, बंगालचे अर्थमंत्री असलेले डॉ. मुखर्जी बंदी धिक्कारून भागलपूरकडे येण्यासाठीं निघाले. ब्रिटिश राजवटींत एका प्रांताचा सरकारी मंत्री दुसऱ्या एका प्रांताच्या सरकारकडून पकडला जाण्याचा अपूर्व प्रकार यामुळें जो घडला त्यानें गांधीजीसकट सारेच स्तिमित होऊन गेले.

१९४२ सर्वच दृष्टींनीं धामधुमीचें होतें. महासभेनें या वर्षी एक महत्त्वाचें काम केलें होतें. कॉंग्रेसशीं सहकार्य करण्यासाठीं महासभेनें पुढें केलेला हात झिडकारला गेल्यानंतर इतर पक्षांशीं भारतीय राज्यघटनेची सर्वमान्य योजना तयार करण्यासाठीं हिन्दु महासभेनें जो प्रयत्न केला त्या समितीचे अध्यक्ष श्यामाप्रसादच होते आणि घटनेचीं मूलभूत तत्त्वें सर्व पक्ष-नेत्यांकडून संमत करून घेण्याइतकें यश त्या समितीनें जें संपादिलें त्याचें श्रेय श्यामाप्रसादांनाच द्यावें लागेल. याच सालीं प्रांतांना फुटून निघण्याचा अधिकार देऊं करणारें राष्ट्राच्या अखंडत्वाला सुरुंग लावणारें स्वयंनिर्णयाचें कालकूट घेऊन 'क्रिप्स मिशन' हिंदुस्थानांत आलें. या विषारी तत्त्वाला हिन्दु महासभेतर्फे विरोध करणारीं ज्ीं बोलणीं महासभेच्या शिष्टमंडळानें क्रिप्सशीं केलीं त्यांत डॉ. मुखर्जी प्रमुख होतेच.

१९४३ नें त्यांची एका निराळ्याच दृष्टीनें परीक्षा पाहिली. कानपूरच्या अधिवेशनापूर्वीपासूनच महासभेच्या अध्यक्षपदाबाबत महासभेच्या अनुयायांत दोन पक्ष पडल्यासारखें झालें होतें. अमृतसर येथें – ४३ सालीं महासभेचें जें रौप्यमहोत्सवी अधिवेशन झालें त्याचे अध्यक्षहि स्वा. सावरकर नियोजित झाले होते. परंतु आयत्या वेळीं आजारपणामुळें स्वा. सावरकर

तेथें जाऊं न शकल्यानें अध्यक्षपदाची माळ (अर्थात् जी कांटेरी होती) श्यामाप्रसादांच्या गळ्यांत घालण्याचें ठरलें. त्या प्रसंगाचा बाकीचा बरावाईट तपशील येथें न सांगितला तरी त्या तशा परिस्थितींत अध्यक्ष-पदाचा मानहि स्वीकारणें स्वाभिमानी पुरुषाला अवमानाचें वाटण्यासारखें वातावरण तेथें बनलेलें असावें असें म्हणावयास जागा आहे. तसें असल्यास त्याहि परिस्थितींत तें अध्यक्षपद स्वीकारण्यांत श्यामाप्रसादांनीं निःसंशय शुद्ध कर्तव्यनिष्ठाच व्यक्त केली हें कोणीहि मान्य करील. याच अधिवेशनांत अध्यक्षीय मिरवणुकीला सरकारनें बंदी केली होती. तरी आरक्षकांच्या (पोलिसांच्या) लाठीहल्ल्याची तमा न धरतां ती मिरवणूक निघालीच आणि थोर पुढाऱ्यांवर लाठ्या चालविण्याची लाला लजपतरायांपासूनची आपली परंपरा पंजाबी आरक्षकांनीं येथेंहि पार पाडली.

अमृतसरला त्यांना अध्यक्षपद देऊन हिन्दु महासभेनें फार मोठा लाभ करून घेतला होता. त्या अधिवेशनांत त्यांनीं घडविलेलें परिस्थितीचें सुस्पष्ट दर्शन प्रत्यक्ष कार्यक्रम आंखण्याच्या दृष्टीनें त्यापुढील म्हणजे १९४४ च्या बिलासपूरच्या अधिवेशनांत उपयुक्त ठरलें. बिलासपूरच्या अधिवेशनासाठीं श्यामाप्रसादांचीच निवड अध्यक्ष म्हणून झाली आणि त्याचवेळीं त्यांनीं हिन्दु महासभेला आर्थिक घटनात्मक बैठक देऊन एक पूर्णतया राजकीय संस्था म्हणून तिची उभारणी केली. श्यामाप्रसादांमधील विधायक नियोजनबुद्धीचा प्रकर्ष यावेळीं विशेष उत्कटत्वानें प्रकट झाला.

१९४५ मध्यें निवडणुकींच्या धामधुमीमुळें हिन्दु महासभेचें अधिवेशन होऊं शकले नाहीं. परंतु एका अधिवेशनानेंहि होणार नाहीं एवढें प्रचाराचें कार्य वेव्हेल-योजनेला विरोध करण्याच्या निमित्तानें श्यामाप्रसादांनीं केलेल्या देशव्यापी संचारांतील प्रभावी व्याख्यानांनीं केलें.

१९४६ च्या गोरखपूर अधिवेशनासाठींहि त्यांचीच अध्यक्षपदासाठीं निवड व्हावयाची, पण आदल्या वर्षी अतिश्रमानें उद्भवलेल्या आजारांतून ते अद्यापि पूर्ण बरे झाले नव्हते. त्यामुळें ती जबाबदारी त्यांनीं श्री. ल. ब. भोपटकर यांच्यावर टाकली. तथापि ते त्या अधिवेशनाला

उपस्थित राहिलेच व त्यांनीं उद्‌घाटनाचें भाषण करून महासभेचें मार्गदर्शनहि केलें.

व्हाइसरॉयच्या कौन्सिलमध्यें सवर्ण हिंदु व मुसलमान यांना समान जागा देऊं करणारी वेव्हेल-योजना हिंदुस्थानाच्या मुळावर येईल हें हिंदुत्वनिष्ठांना समजून चुकलें होतें. पुण्याला अ. भा. हिन्दु महासभेच्या कार्यकारिणीची बैठक या योजनेवर विचार करण्यासाठीं भरली होती. अध्यक्ष श्यामाप्रसादच होते. कार्यकारिणीनें आपली भूमिका निःसंदिग्ध स्वरूपांत मांडून वेव्हेल-योजनेला तीव्र विरोध प्रगट केला. आणि त्याच विषयावर पुण्याच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या विस्तृत पटांगणावर लाखानें जमलेल्या जनसागरासमोर त्यांचें जें भाषण झालें त्यांत पाण्डित्य, तर्कशुद्धता आणि आवेश यांचें इतकें प्रभावी मिश्रण होतें कीं वक्तृत्वाचा एक उत्कट आदर्श म्हणूनच तें जागतिक मान्यता पावण्यास कोणतीच हरकत नाहीं. तें भाषण प्रत्यक्ष ऐकण्याचा ज्यांना ज्यांना लाभ झाला (मी स्वतः त्या लाभाचा एक वांटेकरी होतों) त्यांना 'आज आपण कांहींतरी ऐतिहासिक महत्वाची घटना पाहिली' असेंच वाटत राहिलें.

पुण्यापासून प्रारंभ करून म्हैसूर, पाटणा, लखनौ, दिल्ली, लाहोर अहमदाबाद व मुंबई अशा सर्व दिशांना जाऊन त्यांनीं वेव्हेल-योजनेच्या अनुरोधानें लक्षावधि श्रोत्यांसमोर विशुद्ध राष्ट्रीयत्वाचा जो प्रभावी आविष्कार केला त्याचे परिणाम खोलवर उमटलेले आहेत. या संचारांत त्यांनीं केलेला वाग्विलास अधिक विलोभनीय होता कीं विशुद्ध राष्ट्रवादाचा प्रचार अधिक प्रभावी होता असा प्रश्न अनेकांना पडलेला आहे.

वेव्हेल-योजनेसाठींच भरलेल्या पण जिनांच्या अडेलटट्टुपणामुळें बारगळलेल्या सिमला परिषदेंत कॉंग्रेस पक्षाच्या वतीनें सर्वपक्षीय मंत्रिमंडळाची जी यादी सादर व्हावयाची होती तींत श्यामाप्रसादांचें नांव होतेंच. आणि ब्रिटिश त्रिमंत्री शिष्टमंडळाला हिन्दु महासभेची भूमिका समजावून सांगण्यासाठीं महासभेचे जे दोन अधिकारी नेते गेले त्यांपैकीं प्रमुख श्यामाप्रसाद व दुसरे अण्णासाहेब भोपटकर होते.

१९४७ पासून पुढे १९४९ पर्यंत श्यामाप्रसाद पक्ष या दृष्टीनें हिन्दु महासभेंतच होते. परंतु १९४७ मध्यें स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांनीं हिन्दु महासभेंत हिंद्वेतरांनाहि प्रवेश द्यावा असें मत प्रकट केल्यामुळें हिन्दु महासभेंतील कांहीं मंडळींना तें मत न आवडून श्यामाप्रसाद पदाधिकारी या नात्यानें महासभेपासून हळूहळू दूर झाले. ही गोष्ट अगदीं सत्य आहे कीं ते १९४९ पर्यंत स्वतःला हिंदुमहासभेचे म्हणवीत असत. 'मी हिंदुमहासभेचा म्हणूनच मंत्रिमंडळांत येतों' असें त्यांनीं सरदार पटेलांना सांगितलें हेंहि खरेंच आहे. तरीपण महासभेच्या दैनंदिन कार्याशीं त्यांचा संबंध पुढें फारसा आला नाहीं. मात्र त्यांचे संबंध महासभेच्या कार्यकर्त्यांशीं पूर्वीप्रमाणेंच अखेरपर्यंत जिव्हाळ्याचे राहिले होते.

## जनसेवेसाठीं मंत्रीपद

या दहा वर्षांच्या कालावधींत ते हिंदुमहासभेचे या ना त्या नात्यानें पदाधिकारी होते वा तिच्याशीं प्रत्यक्ष संबंधित होते तरी त्यांच्या वाढत्या राजकीय जीवनाला त्यामुळें कांहीं मर्यादा पडली नव्हती. उलट हिन्दु महासभेच्या इतर कोणाहि नेत्याच्या बाबतींत जें कधीं घडलें नसतें तें अघटित श्यामाबाबूंच्या असामान्य व्यक्तिमत्वामुळें वारंवार घडलेलें त्यांच्या देशबांधवांना दिसत होतें.

यापैकीं पहिलें अघटित १९४१ मध्यें घडलें.

बंगालमध्यें श्यामाप्रसादांच्या नेतृत्वामुळें महासभेला लक्षावधी अनुयायी उत्पन्न झाले होते. बंगालमधील मुस्लिम लीगच्या चळवळीलाहि या वेळीं चांगलाच जोर चढला होता. श्री. फझलुल हक्क यांची त्या समाजांतील लोकप्रियता दांडगी होती. आणि याच सुमारास जिना–हक्क

यांचा जाहीर खटका अुडून जिना यांचा हक्कांनीं धिक्कार केला होता. जिनांनीं केलेल्या पाणअुताऱ्यामुळें श्री. हक्क खवळून अुठले होते. लोकमत आपल्या पाठीशीं आहे, याचा त्यांना आत्मविश्वास होता. आणि त्याच जोरावर जिनांशीं फटकून त्यांनीं मुस्लिम लीगचा त्याग केला होता. अर्थातच मुस्लिम लीगनें त्यांना पाण्यांत पाहावें हें अगदीं साहजीकच होतें. परंतु अशा परिस्थितींत काँग्रेसनें लीगच्या हाताला हात लावून हक्कांवर शस्त्र धरावें हें विपरीत होतें. पण तरीहि तें तसें घडलें. श्री. हक्क असल्या वादळाला जुमानणारा माणूस नव्हता. त्यानें लीग आणि काँग्रेस या दोघांनाहि बाजूला सारलें आणि आपल्या अलौकिक व्यक्तिमत्वानें तळपणाऱ्या डॉ. मुखर्जींच्याकडेच सहकार्यासाठीं धांव घेतली. मैत्रीचा हात पुढें करून आलेल्या गजराजाला आपल्या सामर्थ्याची पुरेपूर जाणीव असणारा वनराजच सहकार्य देअू शकेल. त्याच्या कळपांत जाण्याची भीति कोल्ह्या-लांडग्यांनीं वाटलें तर बाळगावी. गजमस्तक फोडून आपलें वर्चस्व स्थापित करण्याची हिंमत असणाऱ्या वनराजाला त्याचें काय !

श्री. हक्क यांच्या हांकेला ओ देअून श्यामाप्रसादांनीं बंगालमध्यें लीगेतर संमिश्र मंत्रीमंडळ बनविण्यास साहाय्य केलें.

श्यामाप्रसादांबद्दल श्री. हक्क यांच्या मनांत नितान्त आदर वसत असला पाहिजे, असें त्यांच्या त्या वेळच्या अुद्गारांवरूनहि म्हणतां येअील. आणि हा आदर श्यामाप्रसादांच्या विलक्षण कर्तबगारीमुळेंच त्यांच्या ठिकाणीं अुत्पन्न झाला असला पाहिजे. हिन्दु महासभेच्या कार्यकारिणीच्या बैठकीलाहि श्यामाप्रसाद श्री. हक्क यांना एकदा बरोबर घेअून गेल्याचें पाहून लीग-वाल्यांच्या तळव्यांची आग मस्तकाला जावी हें अगदीं साहजिकच आहे. श्यामाप्रसादांच्या प्रभावी व्यक्तिमत्वांत हक्कमियाँ विरघळून गेले, असाच लीगवाल्यांचा दावा असे. श्यामाप्रसादांच्या हातचें बाहुलें म्हणूनहि यांनीं त्यांना हिणवावयास कमी केलें नाहीं.

“ डॉ. मुखर्जींना तुम्ही आपल्या मंत्रीमंडळांत कशासाठीं घेतलें ?” असा प्रश्न त्यांना कोणीतरी अुघडपणें विचारलाहि. हजरजबाबी श्री. हक्क

यांनीं त्यावर चटकन प्रतिप्रश्न केला—" सिंहाला पिंजऱ्यांत अडकविणें आणि मोकळा सोडून देणें यांपैकीं अधिक सुरक्षितता कशांत आहे?"

मुसलमानी मुख्य मंत्र्याबरोबर त्याचा सहकारी मंत्री म्हणून हिन्दु महासभेचा एक पदाधिकारी काम करतो, ही गोष्टच आश्चर्य अुत्पन्न करणारी होती. हिन्दु महासभेंतील त्यांच्या कांहीं अनुयायांनाहि ही घटना कशी काय रुचली असेल कोण जाणे! पण मुस्लीम लीग, कांग्रेस पक्ष व ब्रिटिश सरकार या तिघांनाहि ही युती अनिष्ट वाटली यांत कांहीं शंका नाहीं. लीगचें तर यांत नाकच ठेंचलें गेलें होतें. अेक हिन्दु सभावाला सरकार चालवतो आणि तेंहि आपल्या अिच्छेविरुद्ध याचें काँग्रेसवाल्यांना वैषम्य वाटत होतें, आणि ब्रिटिश सरकारला तर ही बलवान युती नकोशी वाटण्याचें कारण अगदीं स्पष्ट होतें. हिन्दूविरुद्ध मुसलमान लढविण्याच्या त्यांच्या पुरातन भेदनीतीला तीमुळें जबरदस्त धक्का बसत होता.

तथापि यांपैकीं कोणाचीहि पर्वा न करतां हक्क–मुखर्जींचे संमिश्र सरकार राज्यकारभाराचा गाडा यशस्वीपणें हांकीत राहिलें होतें.

त्यानंतर लवकरच १९४२ च्या चळवळीचें पडघम वाजलें. श्यामाप्रसाद अेका प्रांतिक सरकारांत मंत्रीपदावर होते तरी त्यांचें लक्ष देशांतल्या राष्ट्रीय चळवळीकडे आणि स्वातंत्र्यासाठीं चाललेल्या आंदोलनाकडे आत्मीय सहानुभूतीनें नित्याचेंच लागलेलें होतें.

ब्रिटिश सरकारला हक्क–मुखर्जींची ही युती अनिष्ट होती हें श्यामाप्रसादांनीं साहजिकच जाणलेलें होतें. त्यामुळें कधीं ना कधीं त्या अरिष्टाला आपल्याला तोंड द्यावें लागेल याची जाणीव त्यांना असावीच. हिन्दुस्थानांतील इतर अनेक प्रांतांप्रमाणें बंगालमध्येंहि ४२ च्या चळवळीचें अुग्र स्वरूप प्रकटलें. बॉम्बचे स्फोट नि पिस्तुलांचे आवाज यांना सरावलेल्या बंगालला यांत सर्वस्वीं अपरिचित असें कांहीं नसलें तरी सार्वत्रिक प्रक्षोभाचा भडका तशा भयंकर रीतीनें होत असतांना पाहून तोहि प्रांत स्तिमित झाला होता.

सर जॉन हर्बर्ट हे त्यावेळीं बंगालचे गव्हर्नर होते. हक्क–मुखर्जी मंत्रीमंडळासंबंधीं ठरलेल्या ब्रिटिश धोरणाप्रमाणें त्यांचीं पावलें पडत होतीं. ४२ ची चळवळ दडपण्यासाठीं त्यांनीं आरंभिलेल्या क्रूर उपायांना मंत्रीमंडळाकडून अर्थातच संमति मिळणार नाहीं, हें त्यांना कळून चुकलें होतें. म्हणून त्यांनीं परस्परच तो उद्योग हातीं घेतला. मंत्रीमंडळाच्या डोक्यावर मिरीं वाटण्याचाहि त्यांत उद्देश होताच; पण अशीं मिरीं वाटून घेण्याची इतर मंत्रीमंडळाची तयारी असली तरी श्यामाप्रसादांची मात्र मुळींच नव्हती.

"चले जाव"चा ("Quit India") घोष देशभर गर्जत होता. कॉंग्रेसचे बहुतेक लहानमोठे पुढारी कारागृहाच्या गजाआड अडकून पडले होते. अर्थातच मोकळ्या असलेल्या देशभक्तांवरच आतां देशाच्या नेतृत्वाचें काम येऊन पडलें होतें. हें समजण्याइतका राजकीय शहाणपणा, त्या गरजेसाठीं उभे राहण्याइतकी सहृदयता आणि त्याकरितां प्रसंग पडेल तर वाटेल तो त्याग करण्याइतकी जाज्वल्य देशभक्ति या साऱ्या गोष्टी श्यामाप्रसादांच्या ठिकाणीं भरपूर प्रमाणांत होत्या.

त्यांनीं गांधीप्रभृतींची कारागृहांत जाऊन भेट घेण्यासाठीं प्रयत्न केले. पण भारतमंत्र्यांनी त्यांना परवानगी दिली नाहीं. तथापि हातीं असलेल्या शक्तिनिशीं शक्य तें तें सर्व ते करीतच होते. आपण हिन्दु महासभा या विशिष्ट संस्थेचे पदाधिकारी यापेक्षां एक कर्तव्यनिष्ठ देशभक्त हीच जाणीव त्याहिकाळीं त्यांच्या अंतःकरणांत सदैव जागृत होती. 'सरकारी मंत्री हा जनतेचा सेवक' असल्याची कोरडी व्याख्यानबाजी जरी त्यांनीं कधीं तेव्हां केली नाहीं तरी प्रत्यक्ष त्यांचें वर्तन मात्र जनतेच्या खऱ्याखुऱ्या सेवकाला साजेसेंच होतें. आणि ब्रिटिश सरकारच्या नियंत्रणाखालीं असलेल्या मंत्रिमंडळांत जरी त्यांनीं अधिकार स्वीकारला होता तरी स्वातंत्र्याच्या लढ्यांतील आपली राष्ट्रीय भूमिका ते कधींच विसरूं शकत नव्हते.

९ ऑगस्ट १९४२ ला "चले जाव"ची घोषणा झाली. १२ ऑगस्टला हिन्दु महासभेच्या कार्याध्यक्षपदावर असलेल्या आणि कॉंग्रेसला डावलून, बनलेल्या हक्क-मंत्रिमंडळांत एका मंत्र्याची जबाबदारी सांभाळणाऱ्या

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचें व्हाईसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांना पत्र रवाना झालें :

"कॉंग्रेसच्या अंतिम प्रस्तावांतील तिची मागणी हीच शब्दशः साऱ्या राष्ट्राची मागणी आहे," असें म्हणून त्या पत्रांत श्यामाप्रसादांनीं लिहिलें कीं, "या आणीबाणीच्या परिस्थितीवर दडपशाही हा कांहीं उपाय नव्हे. स्वातंत्र्यासाठीं झगडणाऱ्या सर्व देशाच्या इतिहासांनीं हेंच दाखवून दिलेलें आहे कीं, राज्यकर्त्यांकडून दडपशाही जितकी अधिक तितकीच स्वतःला दलित व पीडित समजणाऱ्या जनतेची प्रतिकारशक्तिहि तीव्रतर.

"यास्तव मी आपल्याला अशी आग्रहपूर्वक विनंती करतों कीं, वेगानें बदलणाऱ्या जागतिक घडामोडींच्या दृष्टिकोनांतून हिंदी परिस्थितीची खरीखुरी दखल घेतली जावी. हिंदुस्थानांतील सध्यांच्या राज्यकारभारानें कोणीहि संतुष्ट नसून हिंदी पेचप्रसंग सोडविण्यासाठीं ताबडतोब सत्तान्तर हाच खरा उपाय आहे. कॉंग्रेसच्या मागणीचा मतितार्थ यापेक्षां अधिक कांहीं नाहीं."

महात्मा गांधींनीं सन्मान्य तडाजोडीचे सर्व प्रयत्न निष्फळ होईपर्यंत चळवळ सुरू न करण्याचें निश्चित आश्वासन दिलें असतांहि त्यांच्याशीं वाटाघाटी न करण्याचा जो निर्णय ब्रिटिश सरकारनें घेतला, त्याविषयीं तीव्र नापसंती व्यक्त करून श्यामाप्रसादांनीं पुढें लिहिलें,

"ब्रिटिश सरकार व त्यांचे प्रतिनिधी यांनीं सद्यःस्थितींत अंगिकारलेल्या धोरणाशीं मी सहमत नसल्याचें बंगालच्या गव्हर्नरला कळविलेंच आहे. ही आग्रहपूर्वक विनंती मी आपल्याला याच आशेनें करीत आहे कीं, खोट्या इभ्रतीचा कोलदांडा मार्गांत आडवा येऊं देण्यास आपण संमति देणार नाहीं. अर्थात् ब्रिटिश सरकारनें ही कोंडी अशीच चालू ठेवावी असें आपलेंहि मत असेल तर मला माझ्या मंत्रीपदाच्या कर्तव्यांतून मुक्त करा, असें मोठ्या

खेदानें गव्हर्नरला सांगावें लागेल. कारण मग परिस्थितींतून मार्ग काढण्यासाठीं जनमत तयार करण्याकरतां मला पूर्ण मोकळीक घेणें भाग पडेल."

संधीसाधुपणाचा आरोप आणि पक्षनिष्ठ स्वार्थाची चिखलफेक या थोर पुरुषावर करण्याचा प्रयत्न करणारांना हें पत्र पुरेसें उत्तर आहे.

परिस्थिती दिवसेंदिवस चिघळतच चालली होती. युद्ध यशस्वी करण्याच्या दृष्टीनें हिन्दी पुढाऱ्यांच्या हातीं स्वायत्ततेचे अधिकार सुपूर्त करण्यासारखी मूर्खपणाची गोष्ट नाहीं, अशी ठाम समजूत कांहीं ब्रिटिश मुत्सद्यांनीं करून घेतलेली होती. अर्थातच ब्रिटिश सरकारकडून हिन्दी पुढाऱ्यांशीं सन्मान्य तडजोडीसाठीं सहकार्याचा हात पुढें येण्याची शक्यता समीपच्या भविष्यकाळांत तरी दिसत नव्हती.

बंगालमधील मिदनापूर जिल्ह्यावर तर यावेळीं देवच कोपल्यासारखा झाला होता. १६ ऑक्टोबरला त्या जिल्ह्यांत भयंकर वादळानें घातलेलें क्रूर थैमान आणि समुद्रावरील अमर्याद भरतीच्या भीषण लाटांनीं (Tidal wave) केलेला उच्छाद साऱ्या जिल्ह्याला मृत्यूच्या खाईंत लोटून गेला होता. जपानी सेना दाराशीं येऊन उभी होती तिला या प्रतिकूल परिस्थितीचा फायदा मिळूं नये, म्हणून सरकारनें मिदनापूरवरील या निसर्गापत्तीची बातमीहि बाहेर फुटूं न देण्याची पराकाष्ठा चालविली होती. आणि श्यामाप्रसादांना ज्यामुळें असह्य दुःख व भयंकर संताप येईल अशीहि एक घटना तेथें घडत होती.

मंत्रिमंडळाला धाब्यावर बसवून मिदनापूर जिल्ह्यांत पोलिसांनीं व लष्करानें चालविलेल्या धुमाकुळाचें वृत्त त्यांना अस्वस्थ करीत होतें. क्रांतिकारकांच्या इतिहासांत गाजलेल्या त्या जिल्ह्यानें ४२ च्या उग्र आंदोलनांतहि चांगलाच इतिहास केला होता. आणि म्हणूनच त्या जिल्ह्याला वठणीवर आणण्यासाठींच बंगालच्या गव्हर्नरनें मंत्रीमंडळाचा सल्ला न घेतां तिथें अमानुष दडपशाही चालविली होती. वंगभूमीवर दुर्दैवानें वारंवार कोसळणाऱ्या अस्मानी सुलतानी संकटपरंपरेप्रमाणें मिदनापूर

जिल्ह्याला भयंकर वादळानें जो प्राणघातक फटका मारला होता आणि त्यामुळें जीं असंख्य माणसें निराधार झालीं नि अन्नवस्त्रविना उघड्यावर पडलीं होतीं तिचा फायदा घेण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरविलें.

यावेळीं मिदनापूरचा जिल्हाधिकारी–कलेक्टर–कोणी खान नांवाचा आय. सी. एस. होता. ब्रिटिश नोकरशाहीचा एकनिष्ठ सेवक असलेल्या त्या नराधमानें जिल्ह्यांतील चळवळ्या जनतेला निसर्गाच्या या आपत्तीचा फायदा घेऊन स्वातंत्र्याची चळवळ केल्याबद्दल 'चांगला धडा' शिकविण्याचें ठरविलें. श्यामाप्रसाद यावेळीं अखंड बंगालच्या अर्थमंत्रीपदावर होते. त्यांनीं आपल्या अधिकारांत त्या जिल्ह्याचा दौरा सुरू केला. पण त्यांना असें आढळून आलें कीं वादळपीडित जनतेला साह्य करण्याच्या आड स्वतः कलेक्टरच येत असून गव्हर्नरची त्याला आंतून फूस आहे. ही परिस्थिति श्यामाप्रसादासारख्या मानधनाला नि कर्तव्यनिष्ठ देशभक्ताला केवळ असह्य होती.

अखेर, व्हाइसरॉयला तीन महिन्यांपूर्वी पत्रांत लिहिल्याप्रमाणें जनसेवेसाठीं स्वतःची "सपूर्ण मोकळीक" करून घेण्याचें त्यांनीं ठरविलें. लीगमधून स्वाभिमानानें बाहेर पडलेल्या पण जातीनें मुसलमान असलेल्या हक्कांच्या मंत्रिमंडळांतील प्रवेशाइतकाच त्यांचा त्यांतून बाहेर पडण्याचाहि हा निर्णय लोकांना चकित करणारा होता. पण त्यांच्या दृष्टीनें ती सहज घडणारी गोष्ट होती कार्यक्रमांतील ती एक अपरिहार्य घटना होती. जनसेवेसाठींच ते हिन्दु महासभेंत गेले, जनसेवेसाठींच त्यांनीं मंत्रीपदाचा स्वीकार केला आणि जनसेवेसाठीं त्या पदाचा उपयोग होण्याऐवजीं अडथळा होतो आहे असें पाहतांच जनसेवेकरितांच त्यांनीं ती इतरांना विलोभनीय असलेली मंत्रीपदाची सोनेरी बेडी खाडकन तोडूनहि टाकली. जनसेवा हाच त्या महापुरुषाचा जीवनहेतु होता. त्यासाठीं तो महत्पदांवर आरूढहि झाला नि त्यासाठींच त्यानें लीलया तीं बाजूलाहि सारून दिलीं.

१९४२ च्या १७ नोव्हेंबरला त्यांनीं आपल्या मंत्रीपदाचें त्यागपत्र गव्हर्नरला सादर केलें. मंत्रीपदाविषयींची त्यांची धारणा व स्वानुभव या

त्यागपत्रानंतर २० नोव्हेंबरला केलेल्या एका निवेदनांतील खालील वाक्यांत स्पष्ट प्रतिबिंबित झालीं आहेत:

> “ प्रांतिक मंत्री या नात्यानें मला गेल्या ११ महिन्यांत आलेल्या अनुभवावरून मी असें स्पष्टपणें व निश्चितपणें म्हणूं शकतों कीं, जनतेला व विधिमंडळाला जबाबदार असलेल्या मंत्र्यांवर ज्या मोठमोठ्या जोखमांचें ओझें टाकण्यांत आलें आहे त्या मानानें त्यांना अधिकार मात्र अत्यल्प असून लोकांचें स्वातंत्र्य व हक्क या बाबतींत तर ही परिस्थिति विशेषच जाणवणारी आहे. ”

“ परदास्याच्या श्रृंखला, मग त्या ब्रिटिशांच्या का असेनात, झुगारून देऊन आपला देश स्वतंत्र करण्यासाठीं झटणें हा जर गुन्हा असेल तर प्रत्येक स्वाभिमानी हिंदी माणूस हा गुन्हेगारच आहे. हिंदुस्थानांत असे कांहीं राज्यशासक आहेत कीं ज्यांना या देशाच्या शहरांतील नि खेड्यांतील गल्लीबोळांतून पंचमस्तंभी वावरत असल्यांचीं स्वप्नें पडत असतात. वास्तविक हे प्रतिष्ठित गृहस्थ स्वतःच त्या वर्गांत पडतात—जर हिंदुस्थानाच्या खऱ्याखुऱ्या हिताशीं दमलबाजी करणें हेंच हिंदुस्थानांतील पंचमस्तंभीयत्वाचें लक्षण असेल तर असेंच म्हणावें लागेल. ”

असा आपला अभिप्राय स्पष्ट शब्दांत प्रकट करून लोकांवरील निर्घृण अत्याचारांविषयीं आपल्या तीन महिन्यांतील कटु अनुभवांचा दाखला देऊन त्यांनीं पुढें असें विचारलें कीं, “ या तीन महिन्यांत बंदुकांच्या गोळ्यांची भीति लोकांच्या मनांतून नाहींशी झाली आहे. आतां हिंदी लोकांना पारतंत्र्यांत जखडून ठेवण्यासाठीं आणखी कोणत्या साधनांचा अवलंब तुम्ही करूं शकाल ? ”

१९४२ च्या चळवळीनें तापलेल्या देशांतील वातावरणांत सरकारी रोष स्वतःवर ओढवून घ्यावयास आणखी कोणत्या शब्दांची गरज होती ? स्वातंत्र्याचें उद्गान व परदास्याची बेडी जखडणाऱ्या शासकांचा धिक्कार यापेक्षां आणखी कसल्या कडव्या तऱ्हेनें त्या काळींहि करणें शक्य होतें ? परकीय शासन–सत्तेला आव्हान आणि देशांतील स्वबांधवांना आवाहन

१६१०२

याशिवाय अन्य कोठल्या कठीण मार्गानें करणें त्या परिस्थितींतहि संभवनीय होतें ?

यानंतर तनमन सर्वस्वीं त्याच कारणीं लावून मिदनापूर जिल्ह्यांत हा करुणासागर जनतेच्या दुखःनिवारणासाठीं सतत हेलावत राहिला. पीडितांच्या पीडानिवारणासाठीं नि दुःखितांचे अश्रु पुसण्यासाठीं आतां तो अधिकाराचे साजुक सरंजाम नि नाजुक शिष्टाचार दूर भिरकावून देऊन जनतेचा खराखुरा सेवक म्हणून तेथें उभा ठाकला. आणि मग तिथे हा हिंदु तो मुसलमान, हा जवळचा तो दूरचा असले कसलेच भेद त्याच्या त्या सेवाकार्यांत नुसते भासलेहि नाहींत, मग आड येण्याचें दूरच !

१०६३०

## एक महान कार्य

मिदनापूरमधील त्या परिस्थितीला तोंड देऊन पीडितांना साह्य पोहोंचविणें भयंकर कठीण होतें. जपानी आक्रमणाच्या भीतीनें युद्धकालीन निर्बंध सर्वत्र कडक रीतीनें जखडले गेले होते. पोलिसांनीं आणि लष्करानें " क्रांतिकारक " मिदनापूरचा सूड म्हणून जिल्ह्यांतील शेंकडों घरें जाळून भस्मसात् केलीं होतीं आणि तेथील अनेक अबला त्यांच्या पाशवी वासनांच्या बळी झाल्या होत्या. गोळीबार आणि इतर अत्याचार यांना तर परिसीमाच उरली नव्हती.

अशा परिस्थितींत भीषण वादळानें केलेला कहर तेथील जनतेला किती तापदायक ठरला असेल, याची कल्पना करतां येईल. आणि तशांतच खानसारखे जिल्हाधिकारी ब्रिटिश गव्हर्नरला प्रसन्न करण्यासाठीं जिल्ह्यांतील जनतेवर जो अमानुष सूड उगवीत होते, त्याला तर " सुधारलेल्या जगांतील राज्यकारभाराच्या इतिहासांत बहुधा तोडच सांपडणार नाहीं. "

यावर कळस म्हणूनच कीं काय, सरकारी अत्याचारांच्या वार्ता आणि पीडितांनीं साह्यासाठीं फोडलेली आर्त हांक सुद्धां जिल्ह्याबाहेर जाऊन पोहोंचूं नये अशी व्यवस्था त्यानंतर दोन तीन आठवड्यांपर्यंत सरकारनें करून ठेवली होती. ज्या ठिकाणीं वादळाचें प्रत्यक्ष थैमान झालें त्या भागांतहि संचारबंदी लागू असल्यामुळें मनांत अिच्छा असूनहि साह्य-सहकार्य अशक्य होऊन बसलें होतें. सरकार तर कोणती मदत करावयास तयार नव्हतें व, अुलट कलकत्त्यासारख्या परठिकाणाहून आलेल्या कार्यकर्त्यांना, वादळ-ग्रस्तांना साहाय्य करण्याच्या अेवजीं भारत संरक्षण कायद्यान्वयें कारागृहाच्या भिंतीआड जाऊन अडकून पडावें लागलें होतें. अतएव त्या भागांतील त्रस्तग्रस्त जनता असाहाय्यतेनें केवळ दैवावर भार टाकून बसली होती.

अखेर श्यामाप्रसादांच्या रूपानें त्यांचें दैव दैवी स्वरूपांत प्रगटलें आणि त्यानें हजारों अडथळे व शेंकडों विरोध दूर सारून आपल्या बळकट हातांनीं व दयाळू अंतःकरणानें दुःखितांचें दुःख शक्य त्या मार्गांनीं दूर केलें.

त्या केविलवाण्या असाहाय्यतेचें वर्णन श्यामाप्रसादांच्याच शब्दांत वाचण्यासारखें आहे. बंगालच्या गव्हर्नरला लिहिलेल्या त्या चिरस्मरणीय पत्रांत मिदनापूरमधील त्या भीषण व निर्घृण परिस्थितीचें ह्रदयद्रावक नि संतापजनक वर्णन करून श्यामाप्रसादांनीं उपरोधीकपणें म्हटलें होतें:

> " The only chance that people of this province apparently have is to suffer patiently at the hands of the upholders of law and order and wait for the day when nemesis is bound to come !"

पुढील वर्षानें साऱ्या बंगालच्या आधींच त्रस्त झालेल्या दुर्दैवी लोकांना आणखी एका अस्मानी संकटाचा भीषण तडाखा दिला. या संकटाचें दृश्य स्वरूप अस्मानी असलें तरी तें वास्तविक सुलतानीच होतें– ब्रिटिश सुल-तानशाहीनें स्वातंत्र्यप्रिय बंगालवर आपल्या मुसलमानी हस्तकांच्या

साहाय्यानें लोटून दिलेली ती कृत्रिम आपत्तीच होती १९४३ चा बंगालमधील भीषण दुष्काळ ही मानवी इतिहासाला लांछन असलेली दुर्घटना सुमारें चाळीस लक्ष मानवी जीवांचा बळी घेऊन गेली. या आपत्तींतहि श्यामाप्रसादच वंग-जनतेच्या साहाय्यार्थ धांवून आले.

बंगालच्या त्या मानवनिर्मित दुष्काळाचें निवारण करण्यासाठीं आणि मृत्युपंथाला लागलेल्या लक्षावधी जनतेपर्यंत साहाय्याचा हात नेऊन पोहोंचविण्यासाठीं श्यामाप्रसादांनीं, वंगभूमीच्या त्या थोर सुपुत्रानें आणि वंगीय जनतेच्या स्वयमेव पुढाऱ्यानें जी अपूर्व कामगिरी केली तिला उपमा केवळ अपार नि अनंत सागराचीच शोभेल. कॉंग्रेस पक्ष त्यावेळीं बेकायदा ठरलेला होता. हिन्दु महासभेशिवाय नांव घेण्यासारखा दुसरा कोणताहि उपयुक्त राजकीय पक्ष त्यावेळीं बंगालमध्यें अस्तित्वांत नव्हता. श्यामाबाबूंनीं त्वरित एक पक्षातीत संघटना उभारली व बंगालच्या प्राणरक्षणासाठीं आपल्या सर्व शक्तींनिशीं ते उभे राहिले. प्रतिकूल राजकीय वातावरण आणि जीवनाचीहि शुद्ध न उरलेली सामाजिक स्थिती अशा बिकट अवस्थेंत त्यांना हें कार्य करावें लागलें. दुष्काळग्रस्त वंगभूमीच्या रक्षणासाठीं त्यांनीं जीवाचें रान करून आपल्या विशाल अंतःकरणांतील जी अमर्याद मानवता प्रगट केली तिचा गौरव करण्यासाठीं जगांतलें कोणतेंहि महान पारितोषिक कमीच पडेल.

त्यांच्या अकाल मृत्युनंतर त्यांना श्रद्धांजलि समर्पित करीत असतांना एकानें लिहिलें आहेः "प्रत्येक थोर पुरुष इतिहासावर आपल्या खुणा उमटवितो. तींच त्याचीं स्मारकें. मुखर्जींच्या ऐहिक जीवनसमाप्तीनंतर त्यांची चिरस्मृति म्हणून जर कुठली गोष्ट आधीं लक्षांत येत असेल, तर ती म्हणजे त्यांचें १९४३ च्या दुष्काळांतील महान कार्य."

गांधीजी कारावासांतून बाहेर आल्यावर त्यांनीं श्यामाप्रसादांच्या या महान कार्याचा गौरव करतांना कॉंग्रेसच्या अनुपस्थितींत त्यांनीं ही थोर कामगिरी बजावल्याबद्दल त्यांचे आभार मानले. "मी केवळ माझें कर्तव्य केलें" इतकेंच नम्र उत्तर श्यामाप्रसादांच्या तोंडून

त्यावर बाहेर पडलें. त्या भयंकर दुष्काळाशीं झगडण्याकरितां श्यामाप्रसादांनीं महाबोधी सोसायटी, रामकृष्ण मिशन, मारवाडी रिलीफ सोसायटी इत्यादि धार्मिक, सामाजिक संस्थांचा उपयोग करून घेण्यांत योजकता व त्या बरोबरच समयसूचकताहि उत्तम रीतीनें प्रगट केली. महाबोधी सोसायटीचे ते त्या सालींच अध्यक्ष झाले. विशेषत: धार्मिक दृष्टीनें स्थापन झालेल्या या संस्थेलाहि सामाजिक दृष्ट्या कार्यान्वित करण्याचा जो प्रयत्न त्यांनीं केला, ती त्यांची दृष्टी त्यांच्या जीवनांत सर्वत्रच आढळेल. विद्यार्थ्याला द्यावयाचें शिक्षण हें केवळ परीक्षा पास होऊन तो नोकरीसाठीं पात्र व्हावा म्हणून नव्हे, तर त्याची सार्वजनिक उपयुक्तता वाढावी यासाठीं अशी त्यांची धारणा होती. तसेंच हिन्दु महासभा काय किंवा जनसंघहि काय या राजकीय संस्थांनीं समाजाभिमुख होऊन समाजाच्या दुःखहरणाचें व सुखविर्धनाचें प्रत्यक्ष विधायक कार्य करावें असा त्यांचा आग्रह होता.

## अप्रिय पण पथ्यकर

१९४३ मध्यें एका अमानुष मानवी संकटाशीं अतिमानवी हस्तांनीं दोन हात करून श्यामाप्रसाद बाहेर पडतात न पडतांत तोंच त्याहूनहि भयंकर अशा मानवनिर्मित पाशवी महान आपत्तीशीं लढा देण्याची सिद्धता त्यांना करावी लागली.

या पुरातन राष्ट्रशरीराचा आणखी एक अवयव तोडणाऱ्या, या थोर देशाची चिरफाड करणाऱ्या, हिंदुस्थानाच्या विभाजनाच्या ग्रहणाचे वेध लागले होते. 'सी. आर. फॉर्म्युला' या नांवानें कुप्रसिद्ध असलेल्या योजनेनें देशांतील प्रत्येक विचारवंत हादरून गेला होता. या राष्ट्रपुरुषाच्या शरीरांत मुसलमानी जातीयतेचें विष भिनविण्याचा

उद्योग मुस्लीम लीगकडून उघड उघड होत असल्याचें व त्या राष्ट्रघातकी कारस्थानाला दुबळ्या कॉंग्रेसी धोरणामुळें दिवसानुदिवस बळकटी येत असल्याचें श्यामाप्रसादांच्या तत्पूर्वींच लक्षांत आलें होतें. त्यांचा हिन्दु महासभेंतील प्रवेश हा त्याचा प्रत्यक्ष दृश्य परिणाम होता. त्यांच्या दृष्टीनें त्याकाळीं तीच अशी राजकीय संस्था होती कीं जिच्या द्वारां या कारस्थानाला यशस्वी रीतीनें शह देतां येईल. बंगालच्या विधानसभांतील त्यांची केवढी तरी विधायक कार्यशक्ति या विषारी कारस्थानाचीं पाळें खोलवर रुजूं न देण्याच्या प्रयत्नांतच खर्ची पडलेली होती.

त्याच सुमारास बिलासपूर–अधिवेशनांत अ. भा. हिन्दु महासभेचें अध्यक्षपद देण्यांत येऊन स्वा. सावरकरांच्या शब्दांत "हिन्दुजगताला देतां येण्यासारखा सर्वोच्च सन्मान हिन्दुजगतानें त्यांना समर्पित केला." स्वा. सावरकरांनींच म्हटल्याप्रमाणें हा मुकुट कांटेरी असल्यानें तो पेलून अखिल हिन्दुस्थानाच्या राजनैतिक आघाडीवर चपळाईनें हालचाली करणें मोठें कठिण कार्य होतें. तथापि ती परिस्थितीच अशी असाधारण होती कीं आपल्या साऱ्या शक्तिबुद्धिनिशीं राष्ट्रावर येऊं घातलेल्या प्राणघातक आपत्तिविरुद्ध सारा देश उठविणें आवश्यकच होतें. श्यामाप्रसादांनीं त्या दिवसांत केलेलें लोकजागृतीचें कार्य हिन्दुस्थानाला कधींहि विसरतां येणार नाहीं.

जिनांच्या हातावर पाकिस्थानाचें उदक सोडणारी श्री. राजगोपालाचारी यांची योजना वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली होती. लोकसंख्येच्या दृष्टीनें मुसलमानांची किंचित् बहुसंख्या असलेले बंगाल व पंजाब प्रांत त्या नियोजित पाकिस्थानांत ढकलण्याला मद्रासचे राजाजी तयार होते. हें पाहून वंगभूमीवर मातृवत् प्रेम करणाऱ्या सहृदय श्यामाप्रसादांच्या अंतःकरणाची काय स्थिति झाली असेल याची कल्पना त्यांना जवळून पाहिलेल्यांना चांगली आहे. आजवर केवळ कल्पनेंत असलेलें संकट प्रत्यक्षांत उभें होण्याची शक्यता आणि तीहि आपल्या देशांतीलच पुढारी म्हणविण्याऱ्या लोकांच्या हातून उत्पन्न केली जात आहे, याचा तर त्यांना विशेषच

विषाद वाटला. ज्यांनीं भारतमातेसाठीं आपल्या घरांदारांवर परकीय सत्तेकडून खुशाल नांगर फिरूं दिले अशा अनेकानेक देशभक्तांच्या भावनापूर्ण परंपरेंत वाढलेल्या बंगालच्या हृदयाला यामुळें होत असलेल्या भयंकर व्यथा श्यामाप्रसादांनीं पाहिल्या तेव्हां त्यांच्याच्यानें राहवेना. त्यांनीं तशीच तडक सेवाग्रामला धांव घेतली आणि महात्मा गांधींपुढें दुःखसंतप्त वंगवासियांचें काळीज उघडें करून दाखविलें. तें अप्रिय पण अत्यावश्यक असलेलें काम श्यामाप्रसादांनीं निःस्पृहपणें केलें. त्याचा उपयोग काय झाला तें आपल्यासमोरच आहे; परंतु श्यामाप्रसाद आपल्या कर्तव्याला चुकले नव्हते हेंहि तितकेंच स्पष्ट आहे. कॉंग्रेसवाल्यांना अप्रिय परंतु हिन्दुस्थानाच्या राष्ट्रीय आरोग्याला पथ्यकर असलेलें हेंच कार्य त्यांना आयुष्यभर पुढेंहि करीत राहावें लागलें आणि त्यांतच आपले प्राणहि त्यांना समर्पण करावे लागले. एकदा एक सिद्धान्त आपल्याला पटला, एकदा एका कार्याला स्वतःला वाहून घेतलें कीं, वित्तापासून जीवितापर्यंत कशाचीहि क्षिती न बाळगतां त्या तत्त्वाच्या प्रचारासाठीं नि त्या कार्याच्या सिद्धिसाठीं अविश्रान्त श्रमत राहणें हा त्यांचा देहस्वभावच होता म्हटलें तरी चालेल. फाळणीच्या भयानक संकटापासून देशबांधवांना सावध करण्यासाठीं त्यानंतर ते ठिकठिकाणीं हिंडले. त्या दिवसांत त्यांनीं केलेले दौरे नुसते तुफानी नव्हते तर चांगले भरीवहि होते. एका प्रसंगीं तर या अद्वितीय वक्त्यानें एका दिवसांत लागोपाठ आठ व्याख्यानें दिलीं, नवव्यासाठीं ते उभेहि राहिले आणि अखेर छातींत कळ येऊन बेशुद्ध पडल्यामुळेंच केवळ त्यांचा तो कार्यक्रम थांबला. असलीं उदाहरणें आज तरी उदाहरणें म्हणूनच सांगावीं लागत आहेत.

त्या प्रकारानंतर श्यामाप्रसाद चांगलेच आजारी पडले. चारपांच महिने तरी विश्रांतीची गरज असल्याचें त्यांच्या डॉक्टरांनीं त्यांना निक्षून सांगितलें. आणि त्यामुळेंच अखेर नाईलाजानें त्यांनीं महासभेच्या चालू कार्याची जोखीम सांभाळण्यासाठीं श्री. भोपटकर यांच्याकडे महासभेचें कार्यकारी अध्यक्षपद दिलें.

पण सतत काम हाच ज्याचा स्वभाव त्याला घरीं स्वस्थ कसें बसवणार ? आणि देशांतली परिस्थिति स्वस्थ बसण्याइतकी स्वस्थ तरी कुठें होती ?

नवीन उजाडलेल्या वर्षानें भारतविभाजनाच्या नवनव्या कारस्थानां-वर प्रकाश पाडण्यास प्रारंभ केला होता. लॉर्ड वेव्हेल यांची व्हाइसरॉय कौन्सिलांत हिन्दु-मुसलमानांना निम्मेनिम जागा देऊं करण्याची सूचना त्यांपैकींच एक पवित्रा होता. तिचा दंभस्फोट करण्याची पहिली काम-गिरी श्यामाप्रसादांनींच केली. इतकेंच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यांत जाऊन प्रकृतिस्वास्थ्याची साथ नसतांनाहि त्यांनीं आपल्या लक्षावधि देश-बांधवांपुढें या योजनेंतील घातकी गृहीत कृत्यें राष्ट्रीयदृष्टया किती चुकीचीं आहेत यांचा विशुद्ध राष्ट्रवादाच्या भूमिकेंतून उलगडा केला.

हिंदुस्थानांतील राजकारणाचीं पावलें हळूहळू फाळणीच्या रोखानें पडत होतीं. वेव्हेल–योजना यशस्वी करण्यासाठीं धडपडणाऱ्या काँग्रेसी नेत्यांच्या तोंडावर जिनांच्या उद्दाम असहकार्यानें अपयशाचें काळें फांसलें होतें. १९४५ उलटलें नि १९४६ ब्रिटिश मंत्रिमंडळांतील त्रिमंत्री शिष्ट-मंडळाच्या स्वागतासाठीं सज्ज झालें. त्यांच्याहि देकारांतील फोलपणा श्यामाप्रसादांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या बंगाल हिन्दुसभेच्या कार्य-कारिणीनें प्रथम चव्हाटयावर आणला.

परंतु जिनांनीं आपल्या मागणींतील आडपडदा आतां फाडून फेंकून देऊन सरळ पूर्व व पश्चिम अशा दोन्ही पाकिस्थानांची मागणी जाहिरपणें केली होती—आणि मुसलमानेतर पक्षांकडून मात्र कोणतीच संयुक्त मागणी पुढें आलेली नव्हती. काँग्रेसवाल्यांनी सत्तान्तराची घाई सुटली होती आणि त्यासाठीं ते जिनांच्या वाटेल त्या मागणीपुढें मान तुकवावयास तयार झाले होते.

जिनांच्या जबरदस्त नेतृत्वाखालीं मुस्लिम लीगनें 'प्रत्यक्ष (अति) आचारा'ला ( Direct Action ) ठिकठिकाणीं सुरुवातहि केली.

साऱ्या देशाबरोबरच बंगालची शांतताहि भंगून गेली. कलकत्ता मुसलमानी अत्याचारांच्या आगीनें भाजून निघूं लागला. आणि हळूहळू सारेंच पेटलें. आकाशच फाटलें होतें—नव्हे, गांधीजींच्या भ्रष्ट नेतृत्वाखालील कॉंग्रेसनें आपल्या भेकड, आत्मघातकी नि अदूरदृष्टी धोरणानें तें आपण होऊन फाडलें होतें. हिंदुस्थानाची फाळणी होणार हें ठरूनच गेल्यासारखें होतें; प्रश्न फक्त हा दुर्दैवी देश बाकी किती उरतो व मुसलमानांच्या घशांत किती लोटला जातो एवढाच काय तो होता !

बंगालचें मुसलमानी बहुमत तो प्रांत पाकिस्थानांत समाविष्ट करण्याबद्दल होतें, तरी तेथील हिंदु अर्थातच त्या गोष्टीला तयार नव्हते. तेथील कांहीं समंजस मुसलमानहि हिंदूंप्रमाणेंच म्हणूं लागले. तेव्हां तत्कालीन अखंड बंगालचे कुप्रसिद्ध मुख्य प्रधान डॉ. सुऱ्हावर्दी, बंगाल मुस्लिम लीगचे चिटणीस अबुल हशम आणि कॉंग्रेसी वगनेते श्री. शरच्चंद्र बोस या तिघांच्या संगनमतानें एक वेगळीच योजना बंगालबद्दल बाहेर पडली. ‘ संयुक्त सार्वभौम बंगाल ’ ही ती योजना होती. पाकिस्थान, हिंदुस्थान व तिसरा संयुक्त बंगाल अशी वांटणी या योजनेंत अभिप्रेत होती. सकृद्दर्शनीं मोठी गोंडस दिसणारी ही योजना ब्रिटिशांच्या पाताळयंत्री मेंदूतून निघालेली असून सुऱ्हावर्दी हे केवळ तिचे प्रवक्ते आहेत आणि या योजनेला पं. नेहरूंचे जिवलग मित्र लॉर्ड माउंटबॅटन यांचा आशीर्वाद आहे हें सांगण्यासाठीं श्यामाप्रसादांना त्यावेळीं सोदेपुरच्या आश्रमांत येऊन राहिलेल्या गांधीजींकडे स्वतःच जावें लागलें. गांधीजींच्या राजकीय दूरदृष्टीनेंहि ‘संयुक्त बंगाल’च्या या योजनेला तथास्तु म्हटलें असल्याचा त्यावेळीं लोकांचा दृढ समज झालेला होता आणि त्याचा स्फोटहि गांधीजींच्या एका प्रार्थनाप्रसंगीं घडला होता.

त्या आपत्तींतून श्यामाप्रसादांनीं बंगाल वांचविला, तसाच पुढें हिंदुस्थानाच्या प्रत्यक्ष विभागणींत अर्धा बंगाल व पर्यायानें अर्धा पंजाब वांचविण्याचें श्रेयहि श्यामाप्रसादांनाच दिलें पाहिजे. त्यांच्या निधनानंतर त्यांच्याविषयीं बोलतांना कलकत्ता हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश—चीफ जस्टिस श्री. फणिभूषण चक्रवर्ती यांनीं यथार्थपणेंच म्हटलें कीं, “कलकत्ता

हायकोर्ट आज भारतीय संघराज्याचें न्यायालय म्हणून काम करीत आहे याचें श्रेय मुख्यतः डॉ. मुखर्जी यांनाच आहे."

भारताची विभागणी कॉंग्रेसश्रेष्ठींनीं केली; आणि पाकिस्थानाची फाळणी आपण केली, असें जें श्यामाप्रसादांनीं एकदा उत्तर दिलें तें अगदीं बरोबर आहे.

## केन्द्रीय मंत्रीपदावरून

बंगालवरील पहिल्या निसर्गनिर्मित व दुसऱ्या मानवनिर्मित नैसर्गिक संकटांत श्यामाप्रसाद जसे बंगालच्या साहाय्यार्थ उभे राहिले तसेच मानवांनीं उत्पन्न केलेल्या अमानुष आपत्तींतहि ते त्याच्या रक्षणार्थ ठाकले. त्यावेळीं त्यांना भेटलेले लोक सांगतात कीं, स्वतःवरील वैयक्तिक आपत्तींत वज्रासारख्या कठोर राहणाऱ्या या महापुरुषाचे डोळे कलकत्त्यांतील हिंदूवरील तत्कालीन अनचित अत्याचारांनीं पाणावत असत. मुस्लिम लीगच्या 'प्रत्यक्ष आचारां'चे राक्षसी प्रकार आणि त्यांना बळी पडणाऱ्यांना साह्य करण्याबाबतची असाह्यता यामुळें कोणा सहृदयाच्या डोळ्यांतून टिपें गळलीं नसतीं ?

तरी त्याहि परिस्थितींत त्यांना शक्य तें सर्व कांहीं त्यांनीं केलें. इतकेंच नव्हे तर बंगालची जी साहजिक प्रतिक्रिया त्यानंतर लवकरच बिहारमध्यें हिंदूंकडून घडली आणि जी दडपण्यासाठीं आपल्या देशाचे थोर पंतप्रधन हातीं बॉम्ब नि मशीन गन घेऊन धांवल्यानें तेथील हिंदूंचीच स्वदेशीसैनिकांकडून क्रूर हत्या करण्यांत आली तीनंतरहि श्यामाप्रसादांनीं बिहारमध्यें येऊन तेथील त्रस्त हिंदूंना दिलासा दिला.

केवळ बंगालची सेवा करण्याची संधी यानंतर कांहीं वर्षें तरी त्यांना लाभलीनाहीं. १९४७ च्या १५ ऑगस्टला फाळणीच्या रक्तलांच्छित

प्रक्रियेनें हिंदुस्थानाचा 'भारत' बनला आणि दिल्लीला केन्द्रीय भारत सरकार अधिकारावर आलें. पं. नेहरूंच्या पंतप्रधानकीखालीं बनलेल्या या पहिल्या केन्द्रीय मंत्रीमंडळांत श्यामाप्रसादांचा समावेश करण्यांत पंडित नेहरूंनीं स्वतःचाच गौरव करून घेतला.

उद्योग व पुरवठा खातीं प्रारंभापासूनच त्यांच्याकडे देण्यांत आलीं होतीं. याहि जागेवरून त्यांनीं केलेल्या कामगिरीनें भारताच्या इतिहासावर आपलीं पदचिन्हें उमटवून ठेवलीं आहेत. ज्या पांचवार्षिक योजनेचा एवढा बोलबोला कॉंग्रेसनें केला त्या पांचवार्षिक योजनेची आंखणी करणाऱ्या नियोजन समितीच्या शिफारसींचें गुरुमुख श्यामाप्रसाद हेच आहेत हें फारच थोड्यांना माहीत असेल. औद्योगिक क्षेत्रांत भारत सरकारनें स्वीकारलेल्या 'संमिश्र अर्थव्यवस्थे'च्या (Mixed Economy) धोरणाचा पाया प्रथमतः श्यामाप्रसादांनींच घातला आणि तेंच धोरण आजहि चालू आहे.

आगगाड्यांचीं एंजिनें तयार करणारा कलकत्ता येथील पहिलाच स्वदेशी 'चित्तरंजन लोकोमोटिव्ह' कारखाना, सिंद्रीचा (बिहार) अद्वितीय खत–कारखाना, बंगलोरचा स्वदेशी विमानोत्पादनाचा कारखाना व तसेंच विजगापट्टमचा नौकाबांधणीचा मोठा भारतीय कारखाना हे जे स्वतंत्र भारताच्या औद्योगिक प्रगतींतील पिढ्यानपिढ्या उपयुक्त ठरणारे अविस्मरणीय उपक्रम आज आपल्यासमोर आहेत त्यांचें श्रेय भारताचे केंद्रीय उद्योगमंत्री या नात्यानें श्यामाप्रसादांच्या विधायक प्रतिभेला, विशाल दूरदृष्टीला आणि राष्ट्रीय नियोजन कौशल्यालाच द्यावें लागेल. याव्यतिरिक्त इतरहि कांहीं लहानमोठ्या उद्योगधंद्यांना त्यांनीं विशेष प्रयत्नपूर्वक प्रोत्साहन दिलेलें आहे, व त्याबद्दलची कृतज्ञता त्या त्या व्यवसायांतील लोक आजहि स्मरत आहेत.

तसेंच वर्गविग्रहाऐवजीं राष्ट्रीय समन्वयानें मजूर–मालक प्रश्न सोडवून उभयतांची कार्यशक्ति राष्ट्रनिर्मितीसाठीं उपयोगांत आणावें जें तत्त्व स्वतंत्र भारतानें स्वीकारलें त्याचाहि आविष्कार स्वतंत्र भारताचे पहिले

उद्योगमंत्री म्हणून काम पाहात असतांना श्यामाप्रसाद यांनींच प्रथम करून दाखविलेला दिसेल. मालकांना मिळणाऱ्या फायद्यांत मजुरांना वांटा देण्यासंबंधींचा जो प्रस्ताव करण्यांत आला त्याचे प्रमुख प्रवर्तक श्यामाप्रसादच होते.

अशा रीतीनें श्यामाप्रसाद नवभारताच्या निर्मितीची एकेक वीट अत्यंत आत्मीयतेनें, कौशल्यानें पण अबोलपणें रचीत असतांनाच एकाएकीं धरणीकंपाचा भयंकर धक्का बसावा त्याप्रमाणें महात्मा गांधींचा वध झाला. त्या भयंकर घटनेनें देशाच्या एकंदर राजकारणांत फारच मोठ्या उलथापालथी केल्या. त्याचे परिणाम इतरत्र काय घडले ह्याचा तपशील येथें पाहिला नाहीं तरी हिंदुत्वनिष्ठ अर्थात् विशुद्ध राष्ट्रीयवाद्यांच्या वेगानें वाढत असलेल्या बलवान आघाडीला या घटनेमुळें तडा गेला यांत कांही संशय नाहीं. त्यावेळीं घडलेली जाळपोळ विशेषतः मराठी प्रदेशापुरतीच मर्यादित होती तरी तिच्या झळा कमी अधिक प्रमाणांत साऱ्या देशालाच लागल्या. किंबहुना सारा विशुद्ध राष्ट्रवादी पक्ष त्यांत चांगलाच होरपळून निघाला. भावनाप्रधान माणसांच्या मनांवर गांधीवधाचे परिणाम फार जबरदस्त झाले आणि विशुद्ध राष्ट्रवादी पक्षांतील लोकहि त्याला सर्वस्वीं अपवाद नव्हते. गांधीवधाच्या निमित्तानें एकूण हिंदुत्वनिष्ठ पक्ष व विशेषतः हिन्दु महासभा ह्यांच्यावर किती निरर्गल भयंकर आरोप करण्यांत आले तो इतिहास कांहीं फारसा जुना नाहीं.

आणि तशा परिस्थितींत श्यामाप्रसाद दिल्लीच्या केंद्रीय मंत्रीमंडळांत मंत्रीपदावर होते. त्यांना स्वतःला महात्मा गांधींचीं कांहीं तत्त्वें व अनेक धोरणें मुळींच पटत नव्हतीं तरी त्यांना गांधींजींबद्दल अंतःकरणपूर्वक आदर होता. केंद्रीय मंत्रीमंडळांत श्यामाप्रसादांचा समावेश होण्यास सरदार पटेलांच्या बरोबरच गांधीजींचाहि आग्रह कारण होता. त्यामुळें गांधीवधाचा परिणाम श्यामाप्रसादांवर अतिशय तीव्र झाला. एक गोष्ट मात्र या बाबतींतहि लक्षांत घेण्यासारखी आहे कीं हा परिणाम तात्त्विक स्वरूपाचा किंवा मतपरिवर्तनात्मक नव्हता तर विशेषतः वैयक्तिक स्वरूपाचा व

व्यवहारी (Practical) प्रकारचा होता. यासाठीं एकच उदाहरण दिलें तरी पुरे होईल.

त्यावेळीं केन्द्राय गृहमंत्री या नात्यानें सरदार पटेल यांना भेटून श्यामाप्रसादांनीं स्पष्टपणें सांगितलें कीं, "मी हिन्दुमहासभावाला आहें. जर हिन्दु महासभेच्या सर्व लोकांना अटक करण्याची आपली आज्ञा असेल तर मी मंत्रीपदाचें त्यागपत्र देतों व आपण मलाहि अटक करा." हिन्दुस्थानांत त्या समयीं अहोरात्र चाललेलें धरपकडीचें सत्र आणि त्यांत महासभेच्या सरसकट साऱ्याच कार्यकर्त्यांवर आलेली संक्रांत लक्षांत घेतां मुंबई, वऱ्हाड व उत्तर प्रदेश इत्यादि कांहीं ठिकाणचे सभावाले त्या सत्रांतून कसे वांचलें, याचा उलगडा श्यामाप्रसादांनीं सरदार पटेलांच्या घेतलेल्या या भेटीमुळें होऊं शकतो. तसेंच, त्यांनीं गांधीवधाच्या घटनेला भिऊन अथवा तीमुळें हिन्दु महासभेला विटून किंवा हिन्दुत्वनिष्ठ विचारसरणीवरील त्यांचा विश्वास उडून ते हिन्दु महासभेबाहेर पडले, हें भ्रामक विधानहि खोडून काढण्यास ही घटना पुरेशी समर्थ आहे. श्यामाप्रसादांच्या हिन्दु महासभेकडे पाहण्याच्या दृष्टिकोनांत ३० जानेवारी १९४८ रोजीं घडलेल्या गांधीवधामुळें व त्या घटनेनंतर नव्हे तर १५ ऑगस्ट १९४७ या दिवशीं म्हणजेच तत्पूर्वी सुमारें सहा महिने झालेल्या भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीमुळेंच फरक पडला होता, असेंहि सप्रमाण सिद्ध करतां येईल.

१९५२ मध्यें काशी येथें देवरिया विभाग (जिल्हा) हिन्दुसभेचे चिटणीस श्री. जगन्नाथप्रसाद विशारद यांनीं श्यामाप्रसाद काशी येथें कांहीं कामानिमित्त आले असतां त्यांची गांठ घेतली व त्यांच्याशीं महासभेबाबत चर्चा केली. तींत श्यामाप्रसादांनीं महासभेबाबतचा स्वतःचा हा बदललेला दृष्टिकोन अगदीं स्पष्टरीतीनें विशद केला आहे. त्यांनीं त्या चर्चेंत सांगितलें :

> "स्वातंत्र्यपूर्वकाळांत 'मुस्लीम लीग'ला प्रत्युत्तर म्हणून 'हिन्दुसभे'ची आवश्यकता होती. त्यानंतर आतां स्वातंत्र्य काळांत अखंड भारतवासीयांनाहि आठ कोटि मुसलमानांचा नाश करणें शक्य नाहीं किंवा त्यांना विसरणेंहि शक्य नाहीं, म्हणून त्यांचाहि समावेश करून घेणें आवश्यक आहे."

१९४८ च्या जानेवारींतील त्या घटनेनंतरहि श्यामाप्रसाद महासभा कार्यकारिणीच्या बैठकांना राजरोसपणें उपस्थित असत हीहि गोष्ट याबाबतींत लक्षांत घेण्यासारखी आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ख्रिस्ति इत्यादि अहिंदु अल्पसंख्यांचाहि समावेश हिन्दु महासभेंत व्हावा असें त्यांना वाटूं लागलें व त्या आवश्यकतेचा प्रचार ते महासभेंत आग्रहपूर्वक करूं लागले. परंतु याबाबतींत तेथें त्यांना पुरेसें पाठबळ न मिळाल्यानेंच तें महासभेंतून बाहेर पडले, गांधीवधामुळें नव्हे हिन्दु महासभेंत असले तरी कांहीं कॉंग्रेसी नेत्यांचा त्यांच्यावर विश्वास होता. सरदार व गांधीजी त्यांच्या गुणांचें व कर्तबगारीचें मोल जाणीत होते आणि अर्थातच त्या दोघांशीं त्यांचा निकटचा परिचय झाल्यानें त्यांची सरदार व गांधीजीं यांविषयीं विशेष आत्मीय भावना होती. त्यामुळेंच गांधीवधाचें दुःख श्यामाप्रसादांना फार जाणवलें; त्याचा त्यांच्या तात्त्विक मतपरिवर्तनाशीं कांहीं संबंध नव्हता.

श्यामाप्रसादांनीं भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळांत मंत्री या नात्यानें राष्ट्रीय जबाबदारी स्वीकारली होती. ते भारताच्या मंत्रीमंडळांत गेले होते—पं. नेहरूंच्या नव्हे, याचा प्रत्यय प्रत्यक्ष नेहरूंनींहि त्यांच्या कार्यकालांत घेतलेला आहे. श्यामाप्रसाद हे जसे जबाबदार राष्ट्रनेते होते तसेच ते श्रेष्ठ अधिकाराची जोखीमहि यशस्वी रीतीनें सांभाळूं नि पार पाडूं शकतात हें त्यांनीं आपल्या अल्पकालीन कारकिर्दींत स्पष्ट सिद्ध केलेलें आहे. गाजावाजा, आरडाओरड, पोकळ डौल नि फुसका दिमाख यांपैकीं सर्वच गोष्टींचा श्यामाप्रसादांपाशीं पूर्वींपासूनच अभाव असल्यानें केंद्र-मंत्रीपदावर असतांनाहि सदा कार्यरत, नियोजक नि विधायक असेंच स्वरूप जाणत्यांना त्यांचें दिसून आलेलें आहे. ते पं. नेहरूंचे आवडते नसल्यानें त्यांच्या या पदावरील कामगिरीची जाहिरात फारशी कोठें झाली नसली तरी जाणत्यांना त्याची योग्य जाणीव होती. "सह्याद्रि" मासिकाच्या संपादकांनीं त्यांच्या या बाबतींतील वैशिष्टयाबद्दल काढलेले गौरवोद्गार येथें अुद्धृत केल्याशिवाय पुढें जावेंसें वाटत नाहीं. त्यांनीं लिहिलें आहे :

" शिक्षण, पात्रता, अनुभव, भारतीय सांस्कृतिक आणि राजकीय परंपरेबद्दलचें मूलग्राही ज्ञान आणि अभिमान, कारभारविषयक

निर्दोष पद्धतींवरील श्रद्धा आणि त्यांच्यासाठीं परिश्रम करण्याची तयारी आणि सर्वसाधारण जनतेच्या सुखदुःखांशीं अनौपचारिक आत्मीयतेनें समरस होण्याइतकी प्रांजल वृत्ति, यांमुळें त्यांच्या बरोबरीच्या इतर कार्यकर्त्यांशीं व मंत्र्यांशीं तुलना करतांना डॉ. श्यामाप्रसादांचें व्यक्तिमत्व सहज उठून दिसत असे. त्यांची कार्यशक्ति आणि वायफळ भाषणांचे दौरे काढण्याला नाराजी ही विचारवंतांच्या तत्काळ ध्यानांत येत असे. आणि स्वराज्य आलें म्हणजे काय झालें आणि स्वातंत्र्य पदरांत पडल्यामुळें प्रत्येक कार्यकर्त्यावरील जबाबदारीचा दाब किती पटीनें वाढला आहे याची यथार्थ जाणीव ज्या हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या माणसांना झाल्याचें प्रत्यंतर येई त्यामध्यें डॉ. श्यामाप्रसाद मूकरजी यांना अग्रस्थान सहजच द्यावें असें वाटे." ('सह्याद्रि,' जुलै १९५३)

## इतिहासाची पुनरावृत्ति

१९५० पूर्व बंगालमधील हिंदूंसाठीं भयानक आपत्तींचे पर्वत घेऊनच आलें. "एकसंध इस्लामी राज्यस्थापना हेंच पाकिस्तानाचें ध्येय आणि त्यासाठीं तेथील हिंदूंना योजनापूर्वक देशाधडीला लावणें व त्यांच्या मालमत्ता हिरावून घेणें हेंच त्याचें धोरण" असल्याचें प्रत्यंतर वर्षाच्या प्रारंभापासूनच येऊं लागलें. लक्षावधि हिंदु जीवाच्या व स्वत्वनाशाच्या भयानें पाकिस्तानांतून भारताच्या सीमेकडे धांवत सुटले. पण त्यापैकीं कित्येक वाटेंतच मारले गेले वा लुटले गेले. पाकिस्तानी पोलिसांनीं त्यांचें रक्षण करण्याऐवजीं पाकिस्तानी 'अन्सारां'च्या अत्याचारांत आपलेहि हात धुवून घेतले. भारताच्या सीमेपर्यंत येऊन पोहोंचले त्यांना भारतांत सुखरूप येण्याचीहि

शाश्वती उरली नाहीं. निरपराध हिंदूंच्या सरसकट कत्तली आणि हिंदु स्त्रियांवरील अमानुष अत्याचार शब्दांनीं वर्णन करण्याच्या पलीकडे गेले. आणि पाकिस्थान सरकारनें या भयंकर दुर्घटनांची वार्ता बाहेरच्या जगाच्या व विशेषत: भारतीयांच्या कानापर्यंत जाऊन पोहोंचूं नये म्हणून शक्य तो सर्व बंदोबस्त केला. अशा परिस्थितींत भारत सरकार काय करीत होतें ?

भारत सरकारांत बंगालला स्वत:चा म्हणतां येण्यासारखा असा एकच माणूस राहिला होता कीं ज्याच्यांकडे साऱ्या बंगालचे डोळे लागून राहावेत; आणि तो म्हणजे श्यामाप्रसाद.

भारताच्या केंद्रीय मंत्रीपदावरून काम करीत असतांनाहि त्यांचें लक्ष देशांतील साऱ्या घडामोडींकडे जसें अभ्यासपूर्वक होतें तसेंच तें स्वतःच्या बंगाल प्रांताकडेहि अर्थातच होतें. फाळणीचे परिणाम या आणि पंजाब प्रांतांना जितक्या भयंकर रीतीनें भोगावे लागत आहेत तितके ते दुसऱ्या कोणत्याच प्रांताला लागले नाहींत. बंगालचे दोन तुकडे होऊन पूर्व बंगाल पूर्व पाकिस्थान बनून तेथें तत्रस्थ हिंदूंच्या क्रूर कत्तलीचा व असह्य विटंबनेचा कारखाना उघडला गेला. वास्तविक फाळणीमुळें पाकिस्थानांत राहिलेल्या हिंदु 'अल्पसंख्यां' चें संरक्षण करण्याची जाखीम भारत सरकारची होती. तसें आश्वासन प्रत्यक्ष गांधीजींनीं, फाळणी योजनेला जनतेनें मान तुकवावी म्हणून आपलें बहुमोल वजन खर्च करतांना, दिलें होतें.

" महात्मा गांधींनीं असें स्पष्टपणें सांगितलें होतें कीं ज्या त्या भागांतील लोक त्या त्या भागांत स्थिर राहतील. त्यांच्या रक्षणाचें दायित्व त्या त्या सरकारांना उचलावें लागेल आणि पाकिस्थान जर त्यांचें रक्षण करीत नाहीं असें दिसून आलें तर भारताच्या सेना पाकिस्थानांत शिरून त्यांचें रक्षण करतील. " गांधीजींच्या या पत्राच्या आधारानेंच आपण बंगालमध्यें हिंडल्याचें श्यामाप्रसादांनीं सांगितलें आहे.

परंतु गांधीजींच्या केवळ पुण्याईवर अधिकार सांगणारे नेहरूप्रभृति त्यांच्या या साऱ्या राष्ट्राला प्रकटपणें दिलेल्या अभिवचनाची पूत

करण्याचें सोयिस्करपणें विसरले आणि स्वतंत्र सार्वभौम भारताला आपल्या रक्तमांसाच्या बांधवांचा चाललेला निर्घृण विध्वंस उघड्या डोळ्यांनीं पाहात बसण्याविना कांहीं गत्यंतर उरलें नाहीं. बरें याची कांहीं लाज या कॉंग्रेसी नेत्यांना वाटेल म्हणावें तर त्या बाबतींतहि घोर निराशा होती. इतकेंच नव्हे तर जखमेवर मीठ चोळावें तसें पं. नेहरूंनीं साऱ्या लोकमताला लाथाडून नि आपल्या मंत्रीमंडळांतील सन्मान्य सहकाऱ्यांचाहि बहुमोल सल्ला धिक्कारून भारताची सर्वतोपरी मानखंडना करणाऱ्या पाकिस्थान-पंतप्रधान श्री. लियाकतअली यांच्याशीं 'शांततेचा करार' केला. दिल्ली-करार म्हणून स्वतंत्र भारताच्या प्रतिष्ठेला, स्वाभिमानाला आणि पौरुषाला काळिमा फांसणारा हा करारच श्यामाप्रसादासारखा राज्यकार्यधुरंधर मंत्री भारताच्या केंद्रीय शासनांतून दूर होण्यास कारण झाला. श्यामाप्रसादांना हें पूर्णतया कळून चुकलें कीं पं. जवाहरलाल नेहरू ही व्यक्ति ज्या ठिकाणीं पंतप्रधानपदावर आहे त्या मंत्रीमंडळांत त्यांचा सहकारी मंत्री म्हणून काम करणें यापुढें अशक्य आहे. वैयक्तिक स्वाभिमान व प्रतिष्ठा प्रसंगीं बाजूला सारूनहि संमिश्र मंत्रीमंडळांत मुख्य मंत्र्याच्या आदेशाप्रमाणें काम करीत राहणें हें राष्ट्रीयदृष्टचा प्रशंसनीयच असलें तरी ज्या हेतूनें मंत्रीपदाचा भार उचलावयाचा तो स्वजनपरित्राणाचा स्वजनहिताचा, स्वजनांच्या स्वत्वरक्षणाचा हेतुच जर बाजूला सारला जात असेल तर तो मुख्य प्रधानाचा आदेशहि ठुकरावून, मंत्रीपदाचीं मौल्यवान वस्त्रें दूर भिरकावून स्वजनहिताचा हेतु साध्य करून घेण्यासाठीं तेथून बाहेर पडणें हेंच राष्ट्रीयदृष्टचा इष्ट नि श्लाघ्य ठरतें.

नेहरू-सरकारच्या पाकिस्थानाबाबतच्या सतत पडखाऊ असलेल्या धोरणाची परिणती अखेर नेहरू-लियाकत करारांत व्हावी याचें श्यामाप्रसादांना अतीव दुःख झालें. त्यांनीं ८ एप्रिल १९५० ला मंत्रीपदाचें त्यागपत्र सादर केलें. सरदार पटेल यांनीं हें त्यागपत्र थांबविण्याचे खाजगी व प्रकट प्रयत्न पुष्कळच केले. बंगालमधील श्यामाप्रसादांच्या स्नेह्यांकरवींहि त्यांचें मन वळविण्यासाठीं खटपट सरदारांनीं करून पाहिली. परंतु श्यामाप्रसादांचा निर्णय अढळ होता. अखेर

१९ एप्रिलला त्यागपत्र स्वीकारण्यांत आलें आणि श्यामाप्रसाद निर्वासितांच्या सेवेसाठीं सर्वस्वी मुक्त झाले.

पूर्वीं अखंड बंगालच्या हक्क–मंत्रिमंडळांतून बाहेर पडतांना जी परिस्थिति झाली तीच जवळ जवळ या वेळींहि घडली. हक्क–मंत्रीमंडळ संमिश्र नव्हतें तरी हिन्दु महासभेचे पदाधिकारी असूनहि त्यांना त्यांच्या सामर्थ्यसंपन्न व्यक्तिमत्वामुळें मानानें बोलावून अर्थमंत्रीपद देण्यांत आलें होतें. नेहरू–सरकारांतहि त्यांचा समावेश अशाच तऱ्हेनें झाला होता. हक्कांच्या सर्वंच धोरणाशीं त्यांचें जमत नव्हतें तरी ते तेथें आपलें वैशिष्टच टिकवूनच राहिले होते. तसेंच नेहरू–मंत्रीमंडळांतहि पार्लमेंटरी काँग्रेस पक्षाचे एक सदस्य होऊनहि त्यांनीं आपली तत्त्वनिष्ठा कधींहि सोडली नव्हती. आणि त्या दोन्ही ठिकाणीं जेव्हां त्यांना राष्ट्रीय प्रतिष्ठेला बाध येतो असें आढळलें तेव्हां ते तेथून बाहेर पडले. आणि दोन्ही प्रसंगीं त्यांनीं त्यागपत्राबाबत केलेलीं निवेदनें त्या त्या सरकारांनीं जनतेच्या दृष्टिआड ठेवण्याचा प्रयत्न कायद्याच्या बळावर केला पण लोकांनीं तीं स्वतंत्ररीतीनें छापून त्यांच्या हजारों प्रति देशभर प्रसृत केल्या.

## 'निर्वासितांचा मित्र'

नेहरू–मंत्रीमंडळांतील मंत्रीपद सोडतांनाच्या आपल्या निवेदनांत श्यामाप्रसादांनीं नेहरू–सरकारच्या पाकिस्थानधार्जिण्या धोरणावर विदारक प्रकाश टाकला आहे. त्यांनी लिहिलें आहे:

> "आमच्या पाकिस्थानाशीं असलेल्या वर्तनाबद्दल मला कधींच बरें वाटलें नाहीं. दुबळें, अडखळणारें नि सुसंगतिविहीन असेंच तें सदा राहात आलें आहे.

" बंगालचा हा प्रश्न प्रांतिय प्रश्न नव्हे. अखिल भारतीय स्वरूपाची समस्या त्यांतून निर्माण झालेली आहे. आणि साऱ्या राष्ट्राची आर्थिक नि राजकीय दोन्ही प्रकारची भरभराट व शांतता ही समस्या योग्य रीतीनें सोडविली जाण्यावर अवलंबून आहे.

" नुकताच झालेला करार (नेहरू-लियाकत करार) हा कांहीं माझ्या दृष्टीनें या मूलभूत समस्येची उकल करण्याचा मार्ग नव्हे. दुखणें फार खोलवरचें आहे आणि केवळ वरवरच्या मलमपट्ट्यांनीं त्याचें निवारण होणार नाहीं.

" आपण इतिहासाकडे डोळझांक करूं तर आत्मघातकी ठरूं. पाकिस्थानानें दिलेल्या रक्षणाच्या आश्वासनावर पूर्व बंगालमधील हिंदु जीवन कंठूं शकत नाहींत, हें तेथील घटनांनीं सिद्ध केलेलें आहे. हें पायाभूत प्रमेय म्हणूनच आपण स्वीकारलें पाहिजे. सध्यांच्या करारानें तेथील (पाकिस्थानांतील) अल्पसंख्यांना आपली सुरक्षितता व स्वाभिमान यांच्या रक्षणासाठीं पाकिस्थानी सरकाराकडेच पाहात बसण्यास सांगणें हें जखमेवर मीठ चोळणें आहे; तसेंच आपण त्यांना दिलेल्या आश्वासनाशीं ते विसंगतहि आहे. "

"भारतांतील अल्पसंख्यांच्या रक्षणाच्या मिषानें या करारानें भारतामधील मुसलमान या अल्पसंख्यांचा प्रश्न पुन्हा उकरून काढला आहे; आणि अशा रीतीनें प्रत्यक्ष पाकिस्थानाची निर्मिती करणाऱ्या त्या विघातक शक्तीचीं भुतें जागविण्याचा मार्ग मोकळा करून दिला आहे. या तत्त्वाची तर्कशुद्ध परिणति आमच्यापुढें नवे प्रश्न येऊन उभे राहण्यांत होईल; आणि कांटकोरपणें बोलावयाचें तर हें सारें आपल्या घटनेविरुद्ध आहे."

पूर्वबंगालमधील दुष्काळाच्या आपत्तींत श्यामाबाबू जसे आपल्या प्रिय प्रांतभूमीच्या दुःखनिवारणासाठीं अविश्रांत श्रमले तसेच, याहि प्रसंगीं त्यांचेच स्वदेशबांधव असलेले परंतु केवळ "पुढाऱ्यांच्या राजकीय सौदेबाजी"-मुळें निर्वासित बनलेले पूर्वबंगालमधील दुर्दैवी हिंदु हाच त्यांचा आतां

दा. क्र. ५८४८

सेवाविषय बनला, तेंच त्यांचें कार्यक्षेत्र बनलें. याचीच अपेक्षा वंगवासी जनता त्यांच्याकडून तिच्या आपत्प्रसंगीं करीत होती; आणि श्यामाप्रसादांनीं निर्लोभ, निःस्पृह, निर्भय वृत्तीनें गौरवास्पद मंत्रीपदाचें गौरवास्पद त्यागपत्र देऊन जेव्हां कलकत्त्यांत पाऊल ठेवलें–केंद्रीय मन्त्री अशी बिरुदावळी मिरवीत नव्हे, तर वंगभूमीचा विश्वासू संरक्षक नि वंगवासियांचा पूजनीय तारणहार म्हणून–तेव्हां वंगीय जनतेनें त्यांचें जे अपूर्व स्वागत केलें त्याचा देवांनाहि हेवा वाटला असावा. भारताच्या गळ्यांतील लाल म्हटले जाणारे पं. नेहरूहि जी स्पृहणीय पदवी मिळवूं शकले नाहींत ती “निर्वासितांचा मित्र” ही पदवी सिंधमधून निर्वासित झालेले साधु वास्वानी यांनीं श्यामाप्रसादांना अर्पण केली ती त्यांच्या निर्वासितांबद्दलच्या आत्यंतिक तळमळीमुळेंच.

पाकिस्थानांतील असाहाय्य अल्पसंख्याकांप्रमाणेंच तेथून आलेल्या निर्वासितांचा प्रश्न श्यामाप्रसादांनीं तितक्याच आत्मीयतेनें, जिव्हाळ्यानें व निकरानें शेवटपर्यंत हाताळलेला आहे. त्याबाबतच्या त्यांच्या भावना किती तीव्र होत्या हें संसदेंतील त्यांच्या त्या विषयावरील चर्चेच्या प्रसंगांनीं अनेकदां स्पष्ट केलें. ‘ टचुनीशिया, कोरिया आदीसाठीं शेंकडों गॅलन अश्रु ढाळण्यांत येत आहेत. चालूं द्या ते ! पण पूर्व पाकिस्थानांत छळ चाललेल्या अल्पसंख्यांसाठीं थोडे तरी अश्रु शिल्लक राहूं द्यात.” हे जसे त्यांचे संसदेंतील उपरोधक उद्गार पाकिस्थानांतील अल्पसंख्यांबद्दलचे आहेत, तसेच काँग्रेस श्रेष्ठींना उद्देशून ते असेंहि म्हणाले आहेत कीं,

> “पाकिस्थान ही कांहीं निर्वासितांनीं केलेली मागणी नव्हती; वा युद्धानेंहि पाकिस्थान बनलेलें नाहीं. उलट निर्वासितांच्या बलिदानानेंच भारताचें स्वातंत्र्य अस्तित्वांत आलें आहे.”—“सार्वमत घेऊन कांहीं पाकिस्थानाला तुम्ही मान्यता दिली नाहींत. तो तुम्ही ठरविलेला निर्णय आहे. तुमचीं आश्वासनें तुम्ही पाळलीं पाहिजेत, नाहींतर तें पाप ठरेल आणि पापाचें प्रायश्चित्त देशाचा नाश होण्यांत भोगावें लागेल.”

## समसमां संयोग

हिन्दु महासभा सोडल्यापासून, १९४९ नंतर श्यामाप्रसादांना स्वतःचा असा राजकीय पक्ष नव्हता. भारतीय घटना समितीच्या बैठकींतून त्यांच्या घटनाशास्त्राच्या ज्ञानाबरोबरच त्यांची लोकशाही निष्ठा नि विशुद्ध राष्ट्रीयता वेळोवेळीं प्रकट झाली होती. असा पुरुष आपल्या निष्ठांसाठीं एकाकीच झगडत राहावा हें इष्ट नव्हतें. हिंदुत्वनिष्ठांची संख्या पुष्कळ वाढली होती तरी त्यांची शक्ति संघटित करून राजकीय भूमिकेवरून ती देशाच्या कारणीं लावील अशा कुशल व कर्तबगार पुढाऱ्याची परिस्थिती वाटच पाहात होती.

आणि अशा वेळीं डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जीशिवाय अन्य नांव तिच्यापुढें येणें शक्य नव्हतें.

२८ एप्रिल १९५१ हा दिवस आधुनिक भारताच्या इतिहासांत क्रांतिकारी म्हणून समजला जाईल. स्वातंत्र्योत्तर नवभारताच्या निर्मितीसाठीं देशांतील लक्षावधि नवयुवकांच्या गुप्त (Potential) कार्यशक्तीला आवाहन करून एका नव्या पक्षाची मुहूर्तमेढ त्या दिवशीं रोवली गेली. आणि अवघ्या सहाच महिन्यांच्या आंत साऱ्या जगांत मतदारसंख्येच्या दृष्टीनें अद्वितीय असलेल्या सार्वत्रिक निवडणुकांत साठ वर्षांची पुण्याई पाठीशीं सांचविलेल्या कॉंग्रेस पक्षावर कित्येक ठिकाणीं मात करून या पोरवयाच्या पक्षानें घवघवीत यश संपादन केलें.

" जेथें प्रत्येक व्यक्तीला समान संधी व स्वातंत्र्य प्राप्त होईल आणि जें भारताला सुसंपन्न, शक्तिशाली व सुसंघटित करून त्याला एक प्रगतिशील व आधुनिक असें जागरूक राष्ट्र बनवून त्याचा विश्वशांतीच्या प्रयत्नासाठीं राष्ट्रसंघांत योग्य प्रकारें प्रभाव पाडूं शकेल असें भारतीय संस्कृति व मर्यादा यांच्यावर अधिष्ठित झालेलें एक राजनैतिक, सामाजिक व आर्थिक जनतंत्र निर्माण करणें" हा जनसंघाचा उद्देश आहे.

प्रत्यक्ष बंगाल व नंतर मध्यप्रदेश, मध्यभारत, पंजाब, आदि प्रांतांतून जनसंघाच्या शाखा स्थापन झाल्या. आणि भारतीय जनसंघाची विधिपूर्वक प्राणप्रतिष्ठा करण्यासाठीं १९५१ च्या नोव्हेंबरमध्यें (दि. २१) दिल्ली येथें पहिलें अखिल भारतीय अधिवेशन भरविण्यांत आलें. याच अधिवेशनानें डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांची भारतीय जनसंघाच्या अध्यक्षपदीं रीतसर स्थापना केली आणि अधिवेशनांत निवडणुकीचें घोषणापत्रहि (जाहीरनामा) संमत करण्यांत आलें.

"भारताचें पुन्हा एकीकरण करणें हा जनसंघाचा उद्देश" असल्याचें सांगून नागरिक स्वातंत्र्य आणि लोकशाही या तत्त्वांवर त्याचा विश्वास असल्याचें श्यामाप्रसादांनीं दिल्ली येथें भरलेल्या जनसंघाच्या या अ. भा. अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून बोलतांना सांगितलें. 'भारताचें हित हेंच मुख्य धोरण डोळ्यासमोर ठेवून जागतिक राजकारणांत भारतानें भाग घेतला पाहिजे" असेंहि ते म्हणाले. "जातीय व धार्मिक भूमिकेवरून राजकीय पक्ष निघणें देशाला अपायकारक असलें तरी भारतांत असणाऱ्या सर्व जातींच्या आणि धर्मांच्या लोकांना संरक्षण देणें हें मोठ्या राजकीय पक्षाचें कर्तव्य ठरतें. देशाशीं एकनिष्ठ असणारी व्यक्ति किंवा समाज त्याची जात-धर्म कोणतींहि असली तरी त्याला आर्थिक राजकीय व सामाजिक अधिकार (हक्क) समानतेनें मिळाले पाहिजेत" अशी व्यापक बैठक जनसंघानें स्वीकारली असल्याचें विशद करून भारतांतील सर्व जनतेला भारताच्या पुरातन संस्कृतीनें एकसूत्रांत गोंवून तिच्यांत ऐक्य निर्माण करणें हें जनसंघाचें धोरण राहील असें त्यांनीं उद्घोषित केलें.

१९४५ मध्यें हिन्दु महासभेचें निवडणूक-घोषणापत्र जसें श्यामाप्रसादांच्या हातून तयार झालें तसें जनसंघाच्या निवडणूक-घोषणापत्राचेंहि दायित्व त्यांच्याकडेच होतें म्हणावयास अडचण नाहीं.

सर्व वैध मार्गांनीं, अखंड भारत निर्मिण्यासाठीं प्रयत्नशील राहणें आणि एकमेव, अविभाज्य व एकमुखी भारतीय संस्कृतीच्या आधारावर

राजकीय, सामाजिक, आर्थिक लोकशाहीची उभारणी करणें हे भारतीय जनसंघाचे उद्देश या घोषणापत्रांतूनहि नमूद केलेले आहेत.

जनसंघाला व्यावहारिक बैठक देण्याचें महत्त्वाचें कार्य श्यामाप्रसादांनीं केलें. जनसंघ ज्या घटकांनीं बनला त्यांची निष्ठा व कार्यशक्ति असामान्य होतीं. त्याला जो नेता मिळाला त्याची कळकळ व कर्तृत्व अलौकिक होतीं. असा समसमां संयोग क्वचितच् घडतो. तो सुदैवानें येथें घडून आला होता; पण दुर्दैवानें तो अत्यल्पकाळ देशाच्या उपयोगी आला.

अखंड भारताचा ध्येयवाद डोळयापुढें ठेऊन भारतीयांच्या अंतःकरणांतील खरेंखुरें भारतीयत्व जागें करण्याच्या उद्देशानें जनसंघ अवतरला. खंडप्राय भारतांतील पहिल्याच सार्वत्रिक निवडणुकांपूर्वीं अवघे चारच महिने विधिपूर्वक स्थापना झालेला हा नवजात पक्ष वयानें अगदीं पोरसवदा असला तरी शुद्ध राष्ट्रभक्ति, पद्धतशीर संघटना, त्यागाची तयारी आणि शिस्तीला मान्यता या गुणांनीं तो इतर अनेक ज्येष्ठ पक्षांपेक्षाहि श्रेष्ठ ठरला आणि सुदैवानें त्याला जो पहिलाच अखिल भारतीय नेता लाभला पण तोहि वयानें लहान असून देशांतील इतर अनेक वयोवृद्ध पुढाऱ्यांपेक्षांहि विद्वत्ता, सौजन्य, चातुर्य व दूरदृष्टि इत्यादि अनेक गुणांनीं अधिक मोठा आणि देशांतील इतर तरुण नेत्यांपेक्षांहि उत्साह, निष्ठा व सहृदयता या बाबतींत अधिक तरुण असलेला.

भारतीय जनसंघाच्या अध्यक्षपदावर त्यांची एकमतानें व एकमुखानें निवड झाली त्याला अजून दोन वर्षेंहि पुरीं झालीं नव्हतीं. २८ एप्रिल १९५१ मध्यें बंगालमध्यें जनसंघाची स्थापना झाली आणि त्यानंतर जनसंघाचा अखिल भारतीय मेळावा नोव्हेंबरांत भरला त्यांत त्यांना अध्यक्ष म्हणून निवडण्यांत आलें. अवघ्या सहा महिन्यांच्या अल्पावधींत काँग्रेससारख्या बलाढ्य व सर्व सूक्तासूक्त साधनांनीं सज्ज असलेल्या सरकाराश्रित संस्थेशीं टक्कर देऊन ज्यानें आपलें अखिल भारतीयत्व तत्त्वतः, व्यवहारतः व वैधपणेंहि सिद्ध करून दाखविलें त्या जनसंघाच्या यशाला श्यामाप्रसादांचें असामान्य व्यक्तिमत्वच कारण ठरलेलें आहे. कोठें

५०६३०

अनुयायी आहेत पण पुढारी नाहीं तर कोठें श्रेष्ठ प्रतीचा नेता आहे पण योग्य अनुयायांचीच वाण आहे; आणि एकाद्या पक्षापाशीं या दोन्ही गोष्टी व त्यांच्या जोडीला साधनसंपन्नताहि असून सुसंगत व विशुद्ध राष्ट्रीय तत्त्वज्ञानाची बैठक मात्र नसल्यानें स्वत्वसंपन्न राष्ट्रीय प्रगतीच्या दृष्टीनें तोहि पक्ष फारसा उपयुक्त ठरूं शकला नाहीं. परंतु श्यामाप्रसादांच्या नेतृत्वामुळें जनसंघांत नेता व अनुयायी यांचा अपूर्व असा संयोग झाला होता; विशुद्ध राष्ट्रीय तत्त्वज्ञानाच्या बैठकीवरच तो पक्ष उभा असल्यानें त्या बाबतींत तर उणीव नव्हतीच.

पण या देशाचें दुर्दैव इतक्यांतच संपविण्याचें दैवाच्या मनांत नसावेंसें वाटतें !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नों. नं. १८१०२

## लोकशाहीचा विश्वासू प्रतिनिधि

केवळ निवडणुकी लढविण्यासाठीं भारतीय जनसंघाची स्थापना झाली नव्हती हें कोणीहि समजूं शकेल. तथापि ध्येयहीन कॉंग्रेसच्या राष्ट्रघातकी धोरणाला विरोध करणारी अशी तीच एक प्रमुख राजकीय संस्था असल्यानें साहजिकच तिला निवडणुकीच्या आखाड्यांत उतरावें लागलें. या निमित्तानेंहि पुन्हा श्यामाप्रसादांनीं देशभर संचार केला. प्रांताप्रांतांत ठिकठिकाणीं उभ्या केलेल्या जनसंघाच्या उमेदवारांच्या यशासाठीं सतत हिंडावें लागल्यामुळें त्यांना स्वतःच्या मतदार संघाकडे लक्ष देण्यास, मतदारांची व्यक्तिशः गांठ घेण्यास सवडच मिळाली नाहीं. ते ईशान्य कलकत्ता मतदार संघांतून संसदेसाठीं उभे होते आणि त्यांना विरोध करण्यासाठीं कॉंग्रेसनें मुसलमानांशीं हातमिळवणी करून सार्‍या बर्‍यावाईट

साधनांनिशीं कंबर कसली होती. त्यांच्या स्वतःच्या मतदारसंघांत ७० हजार मुसलमान मतदार होते. त्यांना मुल्ला-मौलवींकडून असे आदेश होते कीं, 'आजच्या दृष्टीनें आपल्याला काँग्रेस टिकविणें हितकारक असल्यानें काँग्रसला मतें द्या.' पण इतकें करूनहि तेथील मतदारांनीं श्यामाप्रसादांना प्रचंड बहुमतानें निवडून देऊन त्यांच्याविषयींचा आपला आदर व निष्ठा व्यक्त केलीं.

आग्नेय कलकत्ता मतदार संघातर्फे निवडला गेल्यामुळें त्या कांहीं हजार मतदारांचा प्रतिनिधी म्हणून जरी हा वाग्वीर संसदेच्या सभागृहांत येऊन बसला तरी अखिल भारतांतील लोकशाही प्रवृत्तींचा, नागरिक स्वातंत्र्याचा नि विशुद्ध राष्ट्रीयवाद्यांचा विश्वासू प्रतिनिधि म्हणूनच त्याचें तेथें स्वागत झालें. भारतीय संसदेच्या कामकाजांत ज्याचें नांव इतिहासाला सुवर्णाक्षरांनीं नमूद करून ठेवावें लागेल असा हा अद्वितीय संसद-सदस्य शिष्टाचार, वादविषयाचा अभ्यास, आणि परमतहिष्णुता या सर्वच बाबतींत खरोखरी आदर्श होता. "आपल्या अमोघ वक्तृत्वाची प्रचंड गदा हातीं घेऊन दिल्लीच्या लोकसभेंत बुरुजासारखा उभा असलेला हा महाकाय भीमपुरुष साऱ्या भारताच्या कौतुकाचा नि आदराचा विषय होऊन बसला होता" असें श्री. प्र. के. अत्र्यांनीं केलेलें वर्णनहि अपुरें आहे. त्या "बुरुजासारख्या भीमकाये" आंतील अंतःकरण सहृदयतेनें सदा ओथंबलेलें नि कळवळयाच्या हातांनीं विरोधकाचेहि अश्रु पुसण्यासाठीं धांवून जाणारें होतें याचा अनुभव अनेकदा आलेला आहे.

श्यामाप्रसादांच्या निधनामुळें भारतीय संसद "विधवा झाली" असे उद्‌गार एका खासदारानें त्यांच्या मृत्यूची वार्ता ऐकतांच काढले. संसदेच्या अनेक सभासदांनीं संसद गाजविणाऱ्या या पराक्रमी वक्त्याबद्दल नानातऱ्हांनीं आपला आदर व दुःख व्यक्त केलीं आहेत.

संसदेचें अधिवेशन चालू असलेला कोणताहि दिवस घ्या, सभागृहांत श्यामाप्रसाद भाषण करावयास उभे राहिले, असें कळतांच सभागृहाबाहेर भटकणारे व रेंगाळणारे काँग्रेसीसुद्धां सारे सभासद धांवत पळत आंत

येऊन मोठ्या उत्सुकतेनें आपापल्या जागीं बसावयाचे. तो भव्य पुरुष आपल्या साध्या वेषांत उभा राहून असाधारण वक्तृत्वाचे लोटच्या लोट आपल्या स्वच्छ नादगंभीर वाणीनें व उदाहरणांनीं आणि आंकड्यांनीं वजनदार झालेल्या, पांडित्य, तर्कशुद्धता व तरल मार्मिक विनोद यांनीं नटलेल्या, स्तिमित करणाऱ्या व परिणामकारक पद्धतीनें त्या विशाल सभागृहांत पसरवून देऊं लागला कीं सारें सभागृह त्यांत वाहवत जाऊं लागावयाचें. मग त्या तशा प्रसंगीं त्यांचे अनुयायी नि पक्षसदस्य असतील त्यांनीं 'हिअर' 'हिअर' नि 'उत्तम' 'उत्तम' असे धन्योद्गार काढले तर त्यांत नवल नव्हतें, परंतु कित्येक वेळां कॉंग्रेसी पक्षाचे सभासदसुद्धां जेव्हां बेभान होऊन 'हिअर' 'हिअर' च्या आरोळ्या मारूं लागत तेव्हां साक्षात् वाग्देवताच या पुरुषाच्या रूपानें सभागृहांत उभी राहिली आहे असें वाटल्यावांचून राहात नसे.

भारतीय संसदेंतील त्यांच्या भाषणांत विस्मरणीय असें कोणतें होतें कीं इतरांचा 'अविस्मरणीय' म्हणून उल्लेख करावा ? तथापि पंतप्रधान पं. नेहरूंबरोबर उडालेल्या त्यांच्या अनेक चकमकी त्यांच्या विलक्षण कोटिक्रमाच्या, हजरजबाबीपणाच्या नि निःस्पृह सडेतोडपणाच्या म्हणून जशा सांगतां येईल तशीच त्यांच्या मधुर व्यक्तिमत्वाचीं, उदात्त सहृदयतेचीं नि आदर्श सभ्यपणाचींहि अनेक उदाहरणें संसदेंतील म्हणून सांगतां येतील. ज्या भारतीय जनसंघाचे प्रतिनिधी म्हणून श्यामाप्रसाद संसदेंत गेले त्याला तेथें बलशाली बहुसंख्येची जोड नव्हती तरी श्यामाप्रसादांनीं हळूहळू आपल्या प्रभावानें तेथें एक संयुक्त विरोधी आघाडी उभी केलीच होती. 'जातीय' म्हणन शिव्या देणाऱ्या कम्युनिस्टांसारख्या पक्षसदस्यांनींहि अनेकदां अभावितपणेंच नव्हे तर समजून उमजून त्यांना विरोधी पक्षाचे नेते म्हणून मान्यता दिली यांत त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्वाचाच विजय होता.

## संग्रामाच्या आघाडीवरून

भारतीय जनसंघाचे अध्यक्ष म्हणून कार्य करीत असतांना आणि त्याच संस्थेचे प्रतिनिधि म्हणून संसद गाजवीत असतांनाच काश्मीरचा प्रश्न चिघळूं लागला. दूरदृष्टी व स्पष्टदृष्टी हे राजकारणी नेत्याचे जे दोन परमावश्यक गुण त्यांची देणगी श्यामाप्रसादांना चांगली लाभली असल्यामुळें त्यांना या प्रश्नाबाबतच्या नेहरू-सरकारच्या धोरणांतील राष्ट्रीय धोका स्पष्ट दिसूं लागला. व लगेच त्यांनीं आपलें प्रखर टीकास्त्र त्यावर सोडलें. नेहरू व त्यांचें सरकार या अस्त्रानें अनेकदां घायाळ झाले असले तरी संसदेंतील प्रचंड बहुमताची संजीवनी त्यांच्या पाठीशीं नित्यच सिद्ध असल्यानें त्यांचें राजकीय जीवन पुनःपुन्हा संजीवित होत राहिलें. या काश्मीर-प्रश्नासंबंधीं श्यामाप्रसादांची भूमिका इतकी तर्कशुद्ध व घटनाशास्त्रपूत होती कीं नेहरू प्रभृतींना दंडेलीविना दुसऱ्या कोणत्याच मार्गानें तिचा प्रतिकार करतां आला नाहीं. यांतूनच जम्मूचा प्रश्न उद्भवला. ही तर अन्यायाखालीं दडपल्या जाणाऱ्या व जुलुमाखालीं भरडल्या जाणाऱ्या दीन जनतेची आर्त किंकाळी होती. अब्दुल्ला-नेहरूंच्या अपवित्र युतीचा तो दृक्प्रत्यय श्यामाप्रसादांसारख्या जागरूक नेत्याला आल्याशिवाय कसा राहील ? त्यांनीं जम्मूंतील जनतेचा आवाज उचलून धरला आणि साऱ्या देशभर तो आपल्या गरजत्या वाणीनें घुमविला. अन्यायाचा प्रतिकार हें तर त्यांचें ब्रीदच. त्यासाठीं तर त्यांनीं स्वतःला वाहून घेतलेलें. जम्मू-प्रश्न हा त्यांच्या जिव्हाळ्याचा बनला आणि प्रजा परिषदेच्या चळवळीला पाठिंबा देण्यासाठीं भारतीय जनसंघ, हिन्दु महासभा व रामराज्य परिषद यांनीं संयुक्तपणें चळवळ करण्याचें ठरविलें. अर्ज-विनंत्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं किंबहुना वाटाघाटीसाठींहि सरकारची तयारी नाहीं असें दिसून आल्यावर या राष्ट्रीय अन्यायाची दाद लावून घेण्यासाठीं दि. ६ मार्च १९५३ ला निघालेल्या मिरवणुकीच्या अग्रभागीं असतांनाच श्यामाप्रसादांना दिल्ली येथें अटक झाली. अ. भा. हिन्दु महासभेचे अध्यक्ष बॅ. एन. सी. चतर्जी, रामराज्य परिषदेचे सरचिटणीस श्री. नंदलाल शर्मा व इतर एकोणीस जणहि त्यांच्या बरोबरच पकडले गेले. त्याच दिवशीं दिल्लीला लागू करण्यांत आलेली

सभा-मिरवणुकीची बंदी मोडल्याच्या आरोपावरून या सर्वांवर खटले भरण्यांत आले. पुढें श्यामाप्रसादांच्या वतीनें करण्यांत आलेल्या 'हेबियस कॉर्पस' अर्जामुळें सुप्रीम कोर्टानें त्यांची सुटका करविली. तथापि इतर अनेक सत्याग्रही कारागृहांत असून तेथें त्यांचा अनन्वित छळ चालला आहे असें कळल्यामुळें त्यांनीं आपल्याला कारागृहांत पाठवावें असा आग्रह धरला पण सरकारनें तो मानला नाहीं.

दिल्ली व पठाणकोट येथें जम्मू प्रजा परिषदेच्या चळवळीला पाठिंबा देण्यासाठीं सुरू झालेला सत्याग्रह दिवसानुदिवस संख्या व इतरहि सर्व दृष्टींनीं विस्तृत होत होता आणि सरकारी दडपशाहीचे अमानुष अत्याचारहि त्याचबरोबर तीव्रतर होत चालले होते. भरमसाट लाठीहल्ले नि अश्रुधूर हें तर भारताच्या राजधानींतील प्रतिदिवशींचेंच दृश्य होऊन बसलें होतें. आणि तिकडे प्रजापरिषदेनेंहि जम्मूंत चालविलेली चळवळ व ती दडपण्यासाठीं अब्दुल्लाशाहीनें वापरलेली क्रुर, अमानुष जुलुम-जबरदस्ती उग्रतर रूप धारण करीत होती. जम्मूंतील भीषण परिस्थितीबाबत तेथील वृत्तबंदीच्या काळ्या पडद्याआडूनहि ज्या वार्ता येत होत्या तींत लाठीहल्ला, अश्रुधूर, यांच्याबरोबर गोळीबार व स्त्रियांवरील अत्याचारांचीहि माहिती तिकडून येत होती. दिल्ली-पंजाबप्रमाणेंच जम्मूंतील कारागृहांतहि सत्याग्रह्यांचे अनन्वित हाल चाललेले श्यामाप्रसादांच्या कानांवर येत होते. संसदेंत या प्रश्नाला वाचा फोडण्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ गेले होते. अखेर जम्मूंतील परिस्थिती तेथें समक्ष जाऊन स्वतःच्या डोळ्यांनींच पाहावयाची असें त्यांनीं ठरविलें.

जम्मू–काश्मिर राज्यांत प्रवेश करण्यासाठीं सरकारी परवाना लागतो हें त्यांना माहित होतें पण तें त्यांना मान्य नव्हतें. भारतीय नागरिक स्वातंत्र्याची ती पायमल्ली आहे व संसद-सदस्याच्या दृष्टीनें तर तिची मुळींच आवश्यकता नाहीं, असें त्यांचें स्पष्ट मत होतें. म्हणून तसें आगावू प्रकट करून त्यांनीं जम्मूंत दि. ११ मे दिवशीं प्रवेशपत्राविनाच प्रवेश केला. आणि अब्दुल्ला सरकारनें त्यांना नेहरूंच्या संगनमतानें आगाऊच ठरलेल्या कारस्थानाप्रमाणें काश्मीर संरक्षक निर्बंधान्वयें

पकडून श्रीनगरला स्थानबद्ध करून ठेवलें. तेथील निशात बागेंतील एका सामान्य बंगल्यांत अन्यायाविरुद्ध चाललेल्या राष्ट्रीय संग्रामाच्या आघाडीवर स्वतःच्या आप्तजनांपासून शकडों मैल दूर, योग्य औषधोपचार, पुरेशी व्यवस्था नि शुश्रूषा यांच्या अभावीं अकल्पीतपणेंच दि. २३ जूनला पहांटे ३ वाजून ४० मिनिटांनीं त्यांना मृत्यूच्या स्वाधीन व्हावें लागलें.

## आध्यात्मिक अधिष्ठान

बंगालमधील लोकनेत्यांच्या जीवनाला आध्यात्मिक अधिष्ठान विशेषत्वानें लाभलेलें दिसतें. हातीं घेतलेलें कार्य अपुरेंच टाकून इहलोकाची यात्रा अकालींच संपवावी लागणाऱ्या नेताजी सुभाषचंद्र बोस व योगी श्री अरविंद यांच्या बरोबरच भारतकेसरी श्यामाप्रसादांचेंहि नांव घ्यावें लागेल. लोकाग्रणींच्या अकालमृत्यूचा हा अभिशाप वंगभूमीला जूनाच आहे. या अभिशापाबरोबरच या भूमीला एक वरहि असा दिसतो कीं ज्यामुळें तेथील लोकनेत्यांनीं आपापल्या राजकीय, सामाजिक इत्यादि कार्यांबरोबर आध्यात्मिक विचार-सरणींचेहि पाठ बंगाली जनतेला दिले. कविवर्य रवीन्द्रनाथ ठाकूर हे साहित्य क्षेत्रांतील श्रेष्ठ पुरुष काय अथवा नेताजी सुभाषचंद्र हे राजकीय आघाडीवर लढणारे सेनापति काय आध्यात्मिक विचारसरणीनें प्रस्फुरित झालेले होते. श्यामाप्रसादांच्या जीवनांतील शैक्षणिक व राजकीय कार्या-बरोबरच आध्यात्मिक वृत्तीनें त्यांनीं धार्मिक क्षेत्रांत घेतलेली भूमिकाहि अवश्य लक्षांत घेण्यासारखी आहे.

बौद्ध धर्मतत्त्वांचें पुनरुज्जीवन करण्यासाठीं १८९१ सालीं स्थापन झालेल्या महाबोधी सोसायटीचें अध्यक्षपद श्यामाप्रसादांकडे १९४३ मध्यें आलें. आणि या बाबतींत विशेष सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे याहि

बाबतींत श्यामाबाबूंनीं आपल्या पित्याचीच परंपरा पुढें चालविली होती. सर अशुतोष मुखर्जी हे या महाबोधी सोसायटीच्या अध्यक्षपदावर १९१६ पासून १९२४ पर्यंत सतत आठ वर्षें होते. पाली भाषेचा अभ्यास कलकत्ता विद्यापीठांत सुरू करून त्यासाठीं प्रसिद्ध बौद्ध पंडित धर्मानंद कोसंबी यांना त्या भाषेच्या अध्यापनासाठीं मुद्दाम तेथें आणविण्याचें कार्य सर अशुतोष यांनीं याच अनुषंगानें केलें; आणि जपानमधून यागाकामी सोगेन यांना आणवून बौद्ध मतप्रणालीसंबंधीं कलकत्ता विद्यापीठांत त्यांनीं त्यांचीं व्याख्यानेंहि करविलीं होतीं. १९४३ पासून महाबोधी सोसायटीचें अध्यक्षपद स्वीकारल्यापासून श्यामाप्रसादांनीं त्या क्षेत्रांत केलेलें काम सामान्य जनतेच्या फारसें कानापर्यंत येऊन पोहोंचलें नसलें तरी नुकतेंच १९५२ च्या नोव्हेंबरांत बुद्ध सांचीच्या नवीन बांधलेल्या चेतीयगिरी विहारांत सारीपुत्त व मोग्गलायन या दोन प्रमुख बुद्धशिष्यांच्या अस्थी-स्थापनेमुळें मात्र श्यामाप्रसादांचा या संस्थेशीं असलेला संबंध जनतेच्या चांगला लक्षांत राहिला. या अस्थी लंडनहून परत आणविल्यावर कांबोडिया, ब्रह्मदेश या देशांत त्यांची जी यात्रा निघाली होती तीबरोबर श्यामाप्रसाद स्वतः उपस्थित होते.

या अस्थिस्थापनेच्या प्रसंगींच सांचीला भरलेल्या आंतरराष्ट्रीय बौद्ध सांस्कृतिक परिषदेला जगांतील मोठमोठे बौद्ध विचारवंत व तत्त्वज्ञानी आले होते. अस्थिसमारंभाप्रमाणेंच या परिषदेलाहि पंतप्रधान पं. नेहरू श्यामाप्रसादांच्या आग्रहाच्या निमंत्रणावरून उपस्थित होते. या ज्या परिषदेंत आपल्या वैचारिक गोंधळाची आंतरराष्ट्रीय नेतृत्वाच्या पंडितजींनीं प्रांजळ कबुली दिली त्याच परिषदेंत भारतीय मार्गदर्शकत्वाच्या भूमिकेवरून श्यामाबाबूंनीं सांस्कृतिक ऐक्याचा व्यवहार्य आशावाद श्रद्धापूर्वक प्रकट केला.

"नवमानववंशाच्या निर्मितीनें पृथ्वीतळावर नवा प्रकाश, नवें चैतन्य व नवीन जीवन प्रकट करण्याच्या उद्देशानें नियोजित झालेल्या" श्री अरविंद आंतरराष्ट्रीय विद्यापीठ योजनेशींहि श्यामाप्रसादांचा संबंध आला तो त्यांच्या ठिकाणच्या आध्यात्मिक निष्ठेमुळेंच. योगी श्री अरविंद यांनीं सतत चाळीस वर्षें पांदेचरीला एकान्तांत राहून जी साधना केली तिची

प्रत्यक्ष कार्याच्या दृष्टीनें परिपूर्ति होण्यासाठीं सर्व जगांतील विद्यार्थ्यांकरितां एक आंतरराष्ट्रीय विद्यापीठ स्थापन करावें असा विचार पुढें आला. या योजनेची चर्चा करण्याकरितां भारतांतील व परदेशांतीलहि अनेक श्रेष्ठ शिक्षणतज्ज्ञांना एकत्र बोलावण्यांत आलें होतें आणि त्या चर्चेच्या अध्यक्ष-पदीं श्यामाप्रसाद यांची नियुक्ती श्री अरविंद आश्रमाच्या संचालिका 'माताजीं' च्या विशेष सूचनेवरून झाली होती.

२४ एप्रिल १९५१ ला झालेल्या या तज्ज्ञांच्या मेळाव्यांत श्यामा-प्रसादांनीं जसा उदात्त ध्येयवाद प्रकट केला तसाच तो साध्य करून घेण्यासाठीं असलेल्या व्यावहारिक अडचणींचीहि त्यांनीं स्पष्ट कल्पना तेथें जमलेल्यांना दिली. "नवीन आध्यात्मिक पुर्नजन्माची मागणी जग आग्रह-पूर्वक करीत आहे व हें नियोजित विद्यापीठ ती मागणी खात्रीनें पुरवील" असें उत्साहानें सांगत असतांनाच त्यांनीं हेंहि स्पष्ट केलें होतें कीं, "जें काम हातीं घ्यावयाचें आहे तें फार मोठें आहे. साऱ्या जगांतून त्याला पाठिंबा मिळेल यांतहि शंका नाहीं. मात्र कामांतील अडचणी व गुंतागुंती आपण कमी लेखून चालणार नाहीं. श्री अरविंदांनीं ज्या तऱ्हेनें आपलें जीवन व्यतीत केलें तशा जीवनाचा नुसता काल्पनिक अनुभव नव्हे तर तसें जीवन प्रत्यक्षांत आचरणारे स्त्रीपुरुष जमविल्याशिवाय ह्या तऱ्हेच्या संस्था टिकणार नाहींत."

## अलौकिक व्यक्तिमत्व

वेगवेगळ्या असंख्य कार्यांशीं, संस्थांशीं व पक्षांशीं त्यांच्या बहुरंगी जीवनांत त्यांचे निकटचे संबंध आले. ते ज्या ज्या संस्थेंत गेले तिथें तिथें त्यांचें स्थान सर्वोच्चच राहिलें. कलकत्ता विद्यापीठाशीं त्यांचा संबंध सेव्य–सेवक असा नव्हता, ते तें काम स्वतःचेंच म्हणून करीत होते. तरीहि

१९२४ मध्यें त्यांची सीनेटवर निवड झाल्यापासून त्यांच्या अंगच्या वाद-पटुत्वामुळें व कार्यकुशलतेमुळें विद्यापीठांत त्यांचा प्रभाव पडूं लागला होता. १९३४ मध्यें तर ते त्या विद्यापीठाचे कुलगुरुच झाले. १९३८ पर्यंत ते या स्पृहणीय जागेवर होते. परंतु यावेळपर्यंत कलकत्ता विद्यापीठाव्यतिरिक्त त्यांना दुसरें जीवन नव्हतें. त्यांचें सारें व्यक्तिमत्व या विद्यापीठाच्या कार्यांतच सामावून गेलें होतें. एकदा हातीं घेतलेलें कार्य संपूर्ण तन्मयतेनें करण्याची त्यांची वृत्तीहि या परिस्थितीला कारण होती.

परंतु कायदेकौन्सिलाशीं त्यांचा जो संबंध आला त्यामुळें त्यांच्या जीवनांत क्रांति घडली. अर्थात् प्रथम हा संबंध उत्पन्न झाला तोहि विद्यापीठामुळेंच, विद्यापीठासाठींच. १९२९ सालीं ते विद्यापीठ मतदार-संघामार्फत कौन्सिलांत निवडले गेले तेव्हांपासून विद्यापीठाचे संरक्षक, त्याच्या वतीनें बोलणारे, त्याचे खरेखुरे प्रतिनिधि म्हणून ते तेथें होते. आणि ही भूमिका पार पाडतां पाडतांच त्यांना भारतांतील अँग्लो–मुस्लीम कूटनीतीला तोंड द्यावें लागलें व त्यांनीं तें यशस्वीपणें दिलेंहि.

हिन्दु महासभेंतील त्यांचा प्रवेश एक सन्मान्य निमंत्रित या नात्यानें झाला. प्रथम कार्यकर्ता व नंतर नेता असा क्रम त्यांना तेथें पत्करावा लागलेला नव्हता. त्यांच्या समर्थ व्यक्तिमत्वामुळेंच महासभेचे कार्यकर्ते नेते व त्यांच्याकडे आकृष्ट झाले होते.

हक्क-मंत्रीमंडळांत अर्थमंत्रीपदावर नेऊन बसविण्यास तरी त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या प्रभावाशिवाय दुसरें कोणतें कारण होतें ? हिन्दु महासभा हा त्यांचा पक्ष राजकीयदृष्ट्या अपरिहार्य ठरण्याइतका बलाढ्य त्यावेळींहि नव्हता.

पुढें-४३ च्या दुष्काळांत तरी त्यांच्याकडे पक्ष वा संस्था अशा दृष्टीनें दुष्काळनिवारणाच्या कामीं पुढाकार घेण्याची अशी कोणती जबाबदारी वा अधिकार तरी होते ? तेथेंहि त्यांच्या व्यक्तिमत्वामुळेंच बंगाली जनतेनें आपला तारणकर्ता म्हणून त्यांच्याकडे धांव घेतली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्थापन झालेल्या पहिल्या केंद्रीय भारत सरकारांत त्यांचा जो आग्रहपूर्वक समावेश झाला त्याचें तर निव्वळ कारण त्यांचें प्रभावी व्यक्तिमत्व हेंच होतें. 'हिन्दु महासभेचा म्हणून मंत्रीमंडळांत येतों' असें त्यांनीं सरदारांना बजावलें असलें तरी तें त्यांचें बोलणें त्यांच्या पक्षाभिमानाला, शिस्तीला व त्यांच्या मोठेपणाला साजेसेंच होतें.

भारतीय जनसंघाच्या अध्यक्षपदीं झालेली त्यांची निवड हा तर त्यांच्या आकर्षक नि बलाढ्य व्यक्तिमत्वाचाच उघड उघड पुरावा होता.

या थोर पुरुषाच्या व्यक्तिमत्वाचीं अशीं अनेक उदाहरणें सांगतां येतील.

आणि या त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्वाचें वैशिष्टच असें कीं, तें स्वयंसिद्ध (self-made) होतें. एखाद्या महान् संस्थेच्या निकट साहचर्यामुळें, एखाद्या अलौकिक महापुरुषाच्या सतत सान्निध्यामुळें वा कोणा एखाद्या विलक्षण घटनेच्या संपर्कामुळेंहि तें घडलेलें नव्हतें, तर बालपणीं थोर पित्याकडून घडविल्या गेलेल्या सुसंस्कारांतून जन्म घेऊन त्यांच्या व्यक्तिमत्वानें स्वतःचें पोषण-वर्धन स्वतःच्या शैक्षणिक साधनेनेंच केलेलें होतें.

हें व्यक्तिमत्व चंद्राप्रमाणें शांत तेजानें विलसणारें असलें तरी पर-प्रकाशी नव्हतें, शर्करेप्रमाणें मधुर असलें तरी वीट आणणारें नव्हतें, अग्नीप्रमाणें तेजस्वी असलें तरी दाहक नव्हतें. सिंहासारखें पराक्रमी पण आक्रमक नसलेलें, साधुप्रमाणें शालीन असलें तरी स्वाभिमान न सोडलेलें, कविप्रमाणें रसिक असलें तरी हळवें नसलेलें आणि शास्त्रज्ञाप्रमाणें मर्मज्ञ असलें तरी समाजविन्मुख न झालेलें असें त्यांचें व्यक्तिमत्व वैशिष्टचपूर्ण होतें. बोलकें परंतु बोलभांड नव्हे, अभ्यासू असलें तरी ग्रंथकृमी नव्हे आणि विनोदी असूनहि उथळ नव्हे अशी त्याची विशेषता होती.

ते कोणाहि बंगाल्यासारखे भावनाप्रधान होते तरी भावनाविवश नव्हते नि, महाराष्ट्रीयासारखे आग्रही होते पण हट्टी नव्हते. हिन्दु महासभेच्या

मदुरा–अधिवेशनांत स्वा. सावरकरांच्या सैनिकीकरणाच्या प्रस्तावाला त्यांनीं जितक्या निर्भीडपणें व मनःपूर्वक विरोध केला तितक्याच निर्भयतेनें व कळकळून त्यांनीं स्वा. सावरकरांची त्याबाबतची भूमिका अभ्यासानें पटतांच सैनिकीकरणाच्या बाजूनें जोरदार प्रचार करावयासहि मागें पाहिलें नाहीं.

खऱ्या कर्मयोग्याप्रमाणें द्वेषरहित विरोध, स्वार्थरहित निष्ठा व अपेक्षारहित प्रेम त्यांचें अलौकिक व्यक्तिमत्व शोभवीत होतीं. कार्या-साठींच प्रेम नि त्यासाठींच राग त्यांच्या ठिकाणीं अनुभवास येई. आपल्यामागें आपल्या एकनिष्ठ दुय्यमांची, पट्टशिष्यांची, राजकीय वारसांची परंपरा ते निर्माण करूं शकले नाहींत याचें प्रमुख कारण त्यांचें अल्पवय नि अचानक, अकल्पित मृत्यु हें असलें तरी अभिनिवेशराहित्य हेंहि त्याचें एक प्रमुख कारण म्हणून सांगावें लागेल.

त्यांच्यापाशीं पक्षनिष्ठा होती पण पक्षस्वार्थ नव्हता. कॉंग्रेसमधल्या 'थोर' नेत्यांनींहि घादांत असत्याच्या प्रचारानें निवडणुका जिंकण्याचा प्रयत्न केला पण श्यामाप्रसादांनीं त्याचा कधींहि अवलंब केला नाहीं. ते केंद्रीय मंत्रीपदावर असतांना त्यांना कॉंग्रेसचीं कित्येक काळींबेरीं व नेहरू सरकारचीं अनेक रहस्यें माहित झालेलीं असतील हें अगदी साहजिक आहे. परंतु त्यांच्य त्यांचाकडून उपयोग निवडणुकी जिंकण्यासाठीं कधीं घडला नाही. वा इतर रीतीनेंहि त्याचा परिस्फोट कधीं झालेला नाही. एकतर स्वतःसाठीं त्यांना तसें करण्याची गरजहि नव्हती व तो त्यांचा स्वभावहि नव्हता.

त्यांचें हृदय कवीचें नव्हे तर तत्त्वज्ञानाचें होतें. ते सहृदय होते पण त्या हृदयाच्या सर्वस्वी आधीन होण्याची भीति त्यांच्या बाबतींत कधींहि वाटली नाहीं. कारण भावना व बुद्धि यांचा योग्य समन्वय त्यांच्या ठिकाणीं झालेला होता. थोर अंतःकरणाची अपार भावुकता आणि तल्लख मेंदूची तीक्ष्ण तार्किकता यांचा हृदयंगम संगम, उचितप्रमाण तोल आणि व्यवहार्य सहकार्य हें तर या महापुरुषाच्या तेजस्वी व्यक्ति-मत्वाचें डोळ्यांत भरण्यासारखें वैशिष्टय होतें.

राजकीय नि सामाजिक, वैयक्तिक नि सार्वजनिक कोणत्याहि भूमिकेनें, अगदीं प्रखर शोधज्योतीच्या प्रकाशांतहि अस्सल रेशमाच्या शुभ्र वस्त्राप्रमाणें विशुद्ध असलेलें चारित्र्य ही या वीरपुरुषाची प्रेरकशक्ति होती. सुंदर, सुशिक्षित, सद्‌गुणी सुधादेवींशीं श्यामाबाबूंचा झालेला संसार सुखाचा नि यशाचा झाला यांत शंका नाहीं. अनुतोष व देवतोष हे दोन सुपुत्र आणि आरती व सविता या दोन सुकन्या हीं त्याची प्रतीकेंच आहेत. तथापि अवघ्या बत्तिसाव्या वर्षी, तारुण्याच्या ऐन उमेदींत, पहिलें लग्नहि व्हावयाच्या वयांत त्यांची सहधर्मचारिणी त्यांना कायमची सोडून परलोकांत चालती झाली. परंतु दुसरें लग्न करण्याचा विचारहि त्यांच्या मनाला शिवला नाहीं. आपल्या चार मुलांच्या जीवनांतच त्यांनीं आपलें गृहसौख्य पाहिलें आणि राष्ट्राच्या अफाट संसारांतून स्वतःचें संसारसुख अनुभविलें. प्रेमळ मातेचे शुभाशीर्वाद आणि थोर घराण्याची वाडवडिलांची पुण्याई त्यांच्या पाठीशीं उभी होती.

यामुळें कोठेंहि, कोणत्याहि प्रसंगांत पुढें व्हावयाला त्यांना कधीं भीति म्हणून वाटली नाहीं. ही अकुतोभयताच त्यांना कोणत्याहि पक्षाच्या माणसांत मोकळेपणानें वावरण्यांत, त्यांच्याशीं प्रांजळपणें चर्चा करण्यांत साहाय्यक ठरली. आपला मुद्दा ते जितक्या आग्रहानें मांडीत तितक्याच आत्मीयतेनें व सहानुभूतीनें ते दुसऱ्याचाहि ऐकून घेत. त्यांच्या पारदर्शक व्यक्तिमत्वाचा असा गुण होता कीं कोणाहि परस्परविरोधी गटांतील व्यक्तींनीं त्याच्यापाशीं येऊन आपलीं गाऱ्हाणीं मांडावींत आणि त्याचा यथाशक्य निकाल होईलच असा निरास खुशाल बाळगावा.

" स्थिरचर व्यापुनि अवघें दशांगुळें उरलेल्या " परब्रह्माप्रमाणें श्यामाप्रसादांचें सर्वव्यापी व्यक्तिमत्व ज्या ज्या कार्यांत, संस्थेंत वा पक्षांत वावरलें त्या त्या कार्य–संस्था–पक्षांचा सारा व्याप आत्मीय सहजपणें सांभाळून, त्यांचीं सारीं कार्यक्षेत्रें यशस्वी कार्यशीलतेनें व्यापूनसुद्धां त्याचवेळीं इतर कामांसाठीं नि दुसऱ्या संस्थांच्या जबाबदाऱ्या शिरावर घेण्यासाठीं शिल्लकच उरत होतें.

ते ज्या पक्षांत असतील त्या पक्षाबद्दलची निष्ठा त्यांच्या ठिकाणीं अवश्य असे; तथापि त्या निष्ठेला खिरटचा प्रेमाचीं, संकुचित अहंकाराचीं वा आंधळ्या अभिनिवेशाचीं कुंपणें कधींच पडलीं नाहींत. "त्यजेदेकं कुलस्यार्थे" या न्यायानें केंद्र-मंत्रीपद स्वीकारतांना अध्यक्षांची संमती घेऊन पक्षासाठीं वैयक्तिक प्रतिष्ठा दूर ठेवणारे श्यामाप्रसाद देशाकरितां पक्षहि बाजूला सारण्यास सिद्ध असल्याचें त्यांनीं स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हिन्दु महासभे-विषयींच्या आपल्या भूमिकेनें स्पष्ट केलें होतें. आणि त्यांची जी इच्छा आतां अखेरची ठरली आहे कीं सारे हिंदुत्वनिष्ठ पक्ष एक करावेत ती इच्छाहि याच मनोवृत्तींतून निर्माण झालेली नाहीं का ?

त्यांच्या अनुपम वक्तृत्वाची साक्ष देण्यास कलकत्ता, मुंबई, दिल्ली येथील सार्वजनिक व्यासपीठें जशीं सदैव उभीं आहेत तशींच बंगालचीं विधिमंडळ-सभागृहें, आणि भारताचें संसद-सभागृह केव्हांहि पुढें होईल. स्वपक्षाचे गुण वेधक रीतीनें पुढें मांडणारें, आणि प्रति-पक्षाच्या मर्मावर अचूक बोट ठेवणारें, पांडित्यानें भरदार झालेलें नि कठोर तर्कवादानें तीक्ष्ण बनलेलें राष्ट्रभक्ति, समाजनिष्ठा इत्यादि बाबतींतील भावनांनीं ओथंबलेलें नि प्रभावी बुद्धिवादानें आक्षेपकांचीं तोंडें बंद करणारें, क्वचित् संथ जलप्रवाहाप्रमाणें सतत नि अखंड वाहणारें तर केव्हां तुफान वादळांत दुथडी भरलेल्या नदीच्या महापुराप्रमाणें भीतिप्रद असणारें व श्रोत्यांना आपल्या बलाढ्य ओढीबरोबरच ओढून नेणारें असें तें वक्तृत्व ज्यांनीं त्यांच्या मुखानेंच ऐकलें ते खरोखर धन्य होत. बिनतोड कोटिक्रम, भेदक उपरोध, गंभीर विनोद आणि अंत:करणाला जाऊन भिडणारी चेतावणी हें त्यांच्या अमोल वक्तृत्वाच्या शस्त्रागारांतील सदा पाजळलेलीं शस्त्रें होतीं. सिंहगर्जनेप्रमाणें असणारा नादगंभीर आवाज हें त्यांच्या वक्तृत्वाचें एक आकर्षक भूषण होतें तसेंच त्यांची धीरगंभीर आकृति त्यांच्या पौरुषाची, पराक्रमाची नि परहितनिरतत्वाची साक्ष देणारी होती.

पण आतां ती मानवी आकृति पंचमहाभूतांनीं आपल्या ठिकाणीं कायमची बिलीन करून टाकली आहे.

नवस्वातंत्र्यप्राप्त भारताच्या कोंवळया लोकशाहीचें हें बळकट कुंपण निर्घृण काळानें तोडून टाकलें आहे. आतां या देशांतील हुकुमशहांना निरंकुश झाल्यासारखें वाटत आहे नि शत्रु असून मित्रत्वाच्या खोटचा मिशांनींच वावरत असलेल्या राष्ट्रघातक्यांना मोकळें रान सांपडल्याप्रमाणें भासत आहे. 'तुम्ही या देशावर राज्य करण्याला लायक नाहींत' असें तोंडावर सांगणारा तो निःस्पृह राष्ट्रनेता आणि 'हुकुमशहांतल्या हुकुमशहांनाहि न्यायाधीष्ठित जनशक्तीसमोर कधींना कधीं वांकावेंच लागेल' असें प्रकटपणें बजावणारा तो निर्भय लोकाग्रणी आतां मानवी रुपानें दिसणार नाहीं.

त्यांचीं सुभाषितें सत्य करण्याची जोखीम आतां त्यांच्या अनुयायांवरच आहे.

REFBK-0007949